# बंडवाले नानासाहेब

पु. पां. गोखले



# बंडवाले नानासाहेब

पु. पां. गोखले

समाजभूषण बाबुराव गोखले स्मारक समिती,
पुणे विभाग

*Bandawale Nanasaheb (Marathi)*
*P. P. Gokhale*

**प्रकाशक**
समाजभूषण बाबुराव गोखले
स्मारक समिती, पुणे विभाग
२७३, शनिवार पेठ,
पुणे ३०

© सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशन दिनांक
५ डिसेंबर १९९८

**मुद्रक**
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ
पुणे ३०

मूल्य पंचवीस रुपये

इंग्रजांच्या पारतंत्र्यातून
भारत देश सुटावा म्हणून
ज्यांनी आपल्या सर्वस्वाचा
होम केला त्या हुतात्म्यांस
ही वंदना.

## धन्यवाद !

'बंडवाले नानासाहेब' हे १८५७ सालच्या स्वातंत्र्य-समराचे नेते. हे दुसरे नानासाहेब पेशवे. पहिले नानासाहेब म्हणजे बाळाजी बाजीराव. त्यांनी १७६१ त पानिपत गाजविले तर दुसऱ्या नानासाहेबांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध तडाखे वाजविले. दुसरे नानासाहेब हे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे दत्तक पुत्र 'धुंडीराज बाजीराव भट पेशवे' होत. या बहाद्दुराने इंग्रजांविरुद्ध जोराचा उठाव केला व इंग्रजांना 'सळो की पळो' करून सोडले. मोडेन पण वाकणार नाही, हा मराठी बाणा अक्षरश: त्याने खरा केला. त्याने वनवासात गुप्तपणे दिवस काढले व प्रत्येक वेळी इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन त्यांना हात चोळीत बसविले. त्याच्या नावाने इंग्रजांनी सामान्य जनांना नानासाहेब समजून फाशी दिले आणि त्यांनीही आनंदाने फासाला कवटाळले.

का? तेच सांगण्यासाठी हे 'बंडवाले नानासाहेब' या नावाचे कथा चरित्र आहे. तो इतिहास भावी उमलत्या पिढीला कळावयास हवा. कारण तो देशाला अभिमानास्पद व स्फूर्तिदायक आहे. नवीन पिढीतील तरुणांनी त्याचे वाचन, चिंतन व मनन करून त्यांच्यापासून धडा घ्यावा व आपला मराठी पीळ नवतेजाने राष्ट्राच्या सेवेस लावावा.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे स्वातंत्र्यसमर हे जसे ब्रिटिश कागदपत्रांच्या आधाराने लिहिले आहे, त्याप्रमाणेंच विष्णुभटजी गोडसे यांनी ग्वाल्हेर, झाशी आणि काल्पी येथे झालेल्या १८५७ च्या उठावातील प्रसंग पाहिले होते आणि ब्रह्मावर्तातील घडामोडी प्रत्यक्ष पाहणाऱ्यांच्या तोंडून ऐकल्या होत्या. त्यामुळे 'माझा प्रवास' या त्यांच्या पुस्तकाला ऐतिहासिक पुराव्याचे महत्त्व आहे. नारायण केशव बेहऱ्यांचे १८५७ संबंधीचे पुस्तकही लक्षात भरण्यासारखेच आहे. त्या उठावात भाग घेणाऱ्या मौ. फजलीहक खैरावादी यांनी अंदमानचे काळेपाणी भोगत असता लिहून गुपचूपपणे बाहेर पाठविलेल्या व त्यांचा सुपुत्र मौ. अब्दुल हक याने 'सौतुल हिंद' या नावे प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाला जेवढे महत्त्व आहे, तेवढेच कानपूर येथील श्री. हर्डीकरांनी लिहिलेल्या 'नानासाहेब पेशवा' या हिंदी चरित्रालाही आहे. सर विल्यम् रसेल यांच्या लंडन टाइम्समधील 'माय डायरी' लाही तितकेच महत्त्व आहे. कारण तो बहुधा इंग्रजी सेनेबरोबर असला तरी क्रांतिकारकांची बाजू त्याने समजून घेतली होती. या सर्व आधारांच्या जोरावरच प्रस्तुतचे 'बंडवाले नानासाहेब' हे कथाचरित्र साकारले आहे. 'नामूलं लिख्यते किंचित् नानपेक्षितमुच्यते ॥'' या सुभाषिताला धरून प्रसिद्ध होत असलेले हे कथाचरित्र भारतीय स्वातंत्र्याच्या रजतमहोत्सवाच्या सुप्रसंगी संपन्न होत आहे, ही योगायोगाची तशीच अभिमानाचीच घटना घडत आहे. सदर घटनेस ज्यांचा ज्यांचा म्हणून हातभार लागला, त्यांना त्यांना धन्यवाद देणे मी माझे कर्तव्य समजतो.

१५ ऑगस्ट १९७२

**- पु.पां.गोखले,**
**कराड**

# अंतरंग


पुणे सुटले! पोर भेटले ०१
नानाची मुंज ०२
नानासह छबेलीला शाळा ०३
बाजीरावांचे वारसा-पत्र ०४
आभाळ फाटले ०६
पालथ्या घड्यावर पाणी ०७
धिक्कार मन साहिना ०९
खलबतखाना रंगला १०
संकेतातून सिद्धिसंदेश १२
नानासाहेबांची यात्रा १४
वह्नि तो चेतवावा रे! १६
मिळाली 'ओ'-सरी ! हातपाय पसरी १८
नाना, उठावाचे पुढारी व्हा! २०
चलो दिल्ली! २१
इंग्रजांचा गंगाप्रवास २२
घोडेस्वारांनी हात दाखविला २३
कानपूर मुळावर आले! २४
प्लासीची शंभरी साजरी झाली! २५
सत्तीचौऱ्यावरील चमत्कार २७
नानासाहेब गादीवर आले ३०
अशुभाचे निराकरण ३२
नवी विटी, नवे राज्य! ३३
तीर्थक्षेत्रे रक्तक्षेत्रे झाली!! ३६
पाण्डुनदीवरील नामी विजय ३९
अहिरवाँ येथील अखेरी ४०
नाव गेली!नाव गेले ४१
राक्षसी महत्त्वाकांक्षा ४२
नाना 'आकाशी-पाताळी' ४२
नानांचा नायनाट ४४
नीलचे अनाचार-अत्याचार ४५
कठिण समय येता कोण कामास येतो ४७
पोलादा निश्चयाने निकराची लढाई ४९
यमुना परिसरात गनिमी छापे ५१
लखनौचा विजय नवलाखाचा ५३
कानपूर जिंकले ५५
कानपूर हरले! वैभव गेले!! ५८
सूडाचा चूड नानासाठी!! ५९
निपट नाही तरी क्रांती ओसरली ६१
राणीचा जाहिरनामा! नव्हे एक भुलावण ६४
हा मार्ग बरवा मानापमाना ६५
नानांच्या नशिबाचे शिक्कामोर्तब ६६
मरणांत खरोखर जग जगते ६७
नेपाळातील पेशवाई ६८
लोकभ्रमातही अढळ श्रद्धा ७१
नानांची हजामत ७२
नैमिषारण्याचे कैलाशन बाबा ७३
मीरा सरायचे बाबा ७३
पितरतिथीला रक्तदान ७४
तोतयाचे दुसरे बंड ७५
हरिजी भाई ७७
अप्पाराम ७८
जमनादास ७९

# १. पुणे सुटले ! पोर भेटले



बाजीराव रघुनाथ भट. पुण्याचे पेशवे. इंग्रजांनी त्यांची पेशवाई १८१८ त संपविली. धाडले त्यांना विठूरला. विठूर हे नाव साहेबांनी ब्रह्मावर्ताला ठेवले होते. ब्रह्मावर्तांची जहागीर सर्वतंत्र बाजीरावाकडे होती. शिवाय बाजीरावास सहकुटुंब - सहपरिवार राहण्यासाठी सालीना आठ लाखांचे पेन्शनही इंग्रजांनी दिले होते.

बाजीरावाने ब्रह्मावर्ताला पुण्याचा शनिवारवाडाच थाटला. गोरगरिबांचा समाचार, प्रजेला न्यायदान, विद्वान् व कलावान् यांना मानसन्मान व धनदान आणि सारे देवधर्म सुरळीत चालू झाले.

यावेळी बाजीराव पंचेचाळीस वर्षांचे होते. आपल्याला मुलगा नाही हे बाजीरावांचे दु:ख होते. औरस नाही तर नाही; दत्तक तरी मुलगा असावा म्हणून बाजीराव शोध घेऊ लागले. तेव्हा त्यांचे लक्ष गोविंदाकडे गेले. हा गोविंदा महादेव नारायण भट यांचा मुलगा. महादेव भट हे त्यावेळी नगर (पण आता कुलाबा) जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात अन्नधान्याचा व्यापार करणारे. वेणु हे त्यांचे गाव.

कुटुंब गरीब पण पेशव्यांच्या वंशावळीतील. बाजीरावांचे बरोबर दक्षिणेतून उत्तरेत जी कुटुंबे गेली, त्यांत ते कुटुंब होतेच. महादेव भटांना १९ मे १८२५ रोजी झालेला गोविंदा आपला करावयाचा असे ठरविले बाजीरावांनी. त्यावेळी नशीब म्हणत होते -

'एकादे फुल बैसते प्रभुपदी राष्ट्रापदा वारण्या ।
अन् जाते सुकुनी धुळीस मिळते की अस्मिता तारण्या ।।"

बाजीरावांचा एक औरस मुलगा वारला होता. दत्तक तरी अकाली जाणार नाही कशावरून? म्हणून बाजीरावांनी महादेव भटांच्या कुटुंबातूनच तीन दत्तक घेतले व त्यांची नावे धुंडिराज, सदाशिव व गंगाधर अशी ठेवली. श्रीमंतांची पोरे! लोक त्यांना नानासाहेब, दादासाहेब व बाळासाहेब म्हणू लागले.

⌘⌘

## २. नानाची मुंज

गोविंदाला दत्तक घेतल्यावर त्याला आपल्या कुलदैवताचे म्हणजे गणपतीचे एक नाव धुंडिराज ठेवले. त्याचेच रूपांतर लोकबोली धुंडूपंत, धोंडोपंत असे झाले. एवढ्या लाडिकपणाने धुंडिराज पेशवे कुटुंबात एकजीव झाला.

आपले वय झाले, याची जाणीव बाजीरावास होऊ लागली. तेव्हा त्यांनी नानाची मुंज करावयाचे ठरविले. नानाला आईच्या पोटीचे नऊ महिने धरून पाचवे वर्ष लागताच, बाजीरावांनी मुंजीची घाई केली. ८ फेब्रुवारी १८२९ रोजीची मुंज. तिची निमंत्रणपत्रिका बाजीरावांनी छ २ रजब ३ जानेवारी १८२९ लाच ठिकठिकाणी धाडली. ही पहा ती :

श्री

अखंड लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री...चे सेवेसी. सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान यांचे नमस्कार विशेष. तीसा अशरेन मयातेन व अलफ. चिरंजीव राजश्री धोंडोपंतनाना याचा व्रतबंध माघ शुक्ल पंचमी रविवारला निश्चित केला आहे. तरी आपण सहपरिवार येऊन


मांडवशोभेची वृद्धि करावी. कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहे. कळावे, अधिक काय लिहावे ?

(मोहोर) - बाजीराव रघुनाथ

(वामनाजी खंडेराव भालेराव ग्वाल्हेर यांच्या दफ्तरातून)

⌘⌘

## ३. नानासह छबेलीला शाळा



बाजीराव विद्येचे व कलांचे चहाते होते. ते नाना आणि त्याची भावंडे यांना शहाणे केल्याशिवाय कसे राहतील? मुलांच्या शिक्षणाला सुरुवात करावयाची तर आपली म्हटलेल्या मुलीलाही शिकवले पाहिजे, असे बाजीरावांनी ठरविले.

कोण ही पेशव्यांची मानलेली मुलगी? अहो ती तांब्यांची मनु. बाजीरावांचे भाऊ चिमाजीअप्पा काशीला नव्हते का ठेवले इंग्रजांनी पेशवाईची अखेरी साधल्यावर? हाँ, त्या चिमाजीअप्पाजवळ मोरोपंत तांबे हे आश्रयास होते. चिमाजी अप्पा देवाघरी गेले अन् मोरोपंत

आपली बायको भागीरथीबाई व सुकन्या मनकर्णिका यांना घेऊन काशीतून बाजीरावांच्या पायाशी आले. मनु बाजीरावांची एवढी लाडकी झाली की ते तिला आपलीच मुलगी समजू लागले. त्यांनी तिचे नावच छबेली ठेवले. नाना वगैरे मुले तिला आपली ताईच समजू लागली.

बाजीरावांनी आपल्या पेशवे कुटुंबाच्या इतमामास व पराक्रम परंपरेस साजेसे शिक्षण छबेलीसह आपल्या मुलांना मिळावे अशी योजना केली. शिक्षण बौद्धिक होते, मानसिक होते, शारीरिकही होते. निरनिराळ्या विद्याकलांचे जाणकार आपापले विषय शिकवीत. लवकरच नानाने व त्याच्या भावंडांनी मराठी, हिंदी, ऊर्दू, फारशी भाषा शिकून घेतल्या. इतिहास, राज नीती, साहित्य यांचेही पाठ त्यांना मिळाले. व्यायाम, घोडरपेट व शस्त्रविद्या यांचा सराव त्यांना रोजच करावा लागे. युद्धाचे डावपेच, व्यूहरचना, रणकौशल्य, कूटनीती यांच्या कथा रामायण- महाभारत आणि त्यांच्या पुढच्या इतिहासातून मुलांच्या कानावर नियमाने घालण्यात येत. मनु तांबे व तात्या टोपे हे नानाचे बालमित्र. तिघांची इयत्ता एक. मुलामुलींना एकत्र आणि एकच शिक्षण द्यावयास सातारा येथे प्रतापसिंह महाराजांनी सुरुवात केली होती तर ब्रह्मावर्तास पेशव्यांनी. तीही एकाच कालखंडात! विलक्षण योगायोगच नव्हे, का हा?

## ४. बाजीरावांचे वारसापत्र

सन १८४० मध्ये बाजीरावांची प्रकृती खालावली. ब्रह्मावर्तच्या स्पेशल कमिशनरने उत्तर प्रदेशच्या लेफ्टनंट गव्हर्नरला विचारले की- 'बाजीराव परलोकवासी झाले, तर काय बंदोबस्त करावयाचा?' उत्तर आले- 'खजिन्याला आणि मूल्यवान् वस्तूंच्या भांडारांची कुलुपे मोहोरबंद करून पक्का पहारा ठेवावयाचा.'

पण बाजीराव अगोदरच सावध होते. १८३९ मध्येच त्यांनी आपले इच्छापत्र लिहून काढले होते. ते पक्के करून २० एप्रिल १८४१ रोजीच त्यांनी सही करून टाकली. त्याच्या प्रती त्यांनी

पेशव्यांच्या अंकित संस्थानिकांनाही सूचनार्थ पाठविल्या. हे पहा ते इच्छापत्र -

श्री

(गोल मोहोर)

मृत्युपत्र सरकार श्रीमंत महाराज राजश्री बाजीराव रघुनाथ पंतप्रधान सुरू सन अर्बेन मयातेन व अलफ शक १७६१ विकारी नाम संवत्सर मुताबिक सन १८३९ ईसवी सरकार, दौलतमदारा, इंग्लिस्थान सरकार कंपनी, इंग्लिस्थानचे सरकार (आदि) सर्वास माहित आणि जाहीर होण्यासाठी लिहिले जात आहे की चिरंजीव राजश्री धोंडोपंतनाना, सर्वांत जेष्ठ पुत्र व चिरंजीव गंगाधरराव तिसरे कनिष्ठ पुत्र व सदाशिवराव दुसरे पुत्र होते, त्यांचे पुत्र पांडुरंगराव, - नातू ही आमची चिरंजीव संतति आहे. आमच्या पश्चात धोंडोपंतनाना हे जेष्ठ पुत्र मुख्य प्रधान पेशवाईचे व येथील (ब्रह्मावर्त) चे दरोबस्त राज्याचे व दौलतीचे व देशमुखी आदि वतनांचे व द्रव्यादिकाचे आणि जे काही आमचे आहे त्या सर्वांचे खावंद अधिकारी व मालक आहेत. त्यांनी वंशपरंपरा पेशवाई आदि राज्याधिकार व उपरोक्त दौलतीचा उपयोग करावा व करतील आणि त्यांचे कनिष्ठ बंधु गंगाधरराव व पुतणे पांडुरंगराव सदाशिव याना व त्यांच्या पुत्रपौत्रादिकांना वंशपरंपरा बन्धुत्वाच्या अनुसार संरक्षण व सेवकादि प्रजेचे पालन न्यायानुसार धोंडोपंतनाना तसेच त्यांचे पुत्रपौत्रादिक वंशपरंपरेने करतील आणि गंगाधरराव पांडुरंगराव यथाक्रम सेवकादि प्रजाजनांनी धोंडोपंतनाना मुख्य प्रधानांच्या आज्ञेनुसार एकनिष्ठेने व्यवहार आणि सेवा करणे जरूर आहे. (जर) आम्हाला एकादा औरस पुत्र झालाच तर तो येथे लिहिल्या प्रमाणे मुख्य प्रधानाचे पेशवापद, इकडचे सगळे दरोबस्त राज्य, दौलत व देशमुखी इत्यादि वतन व धनदौलत इत्यादि सर्वांच्या, जे काही आमचे आहे त्या सर्वांना वंशपरंपरागत खाविंद, व अधिकारी व मालक (होईल). त्याला बंधुवर्गाचे संरक्षण व सेवकादि प्रजेचे पालन यथान्याय केले पाहिजे. धोंडोपंतनाना आदि सर्वांना पुत्रपौत्रादि वंशपरंपरा त्याच्या आज्ञेत वागले पाहिजे. हे मृत्युपत्र अक्कलहुशारीने

लिहून ठेवले आहे. छ ४ सवाल मार्गशीर्ष शुक्ल पंचमी मुताबिक तारीख ११ डिसेंबर. अधिक काय लिहिणे?

साक्षी -- मेनसनसाहेबांची सही इंग्रजी.

१ साक्षी -- रामचंद्र व्यंकटेश सुभेदार -

हे पत्र आमच्या समक्ष लिहिले गेले आहे आणि श्रीमंत पंतप्रधानच्या स्वाक्षरीने पूर्ण झाले आहे. याच्यावर आमच्या समक्ष मोहोर करण्यात आली आहे. ता. ३० एप्रिल १८४१ - दस्तुरखुद्द.

१ साक्षी -- नारायण रामचंद्र सुभेदार

१ साक्षी -- बापूजी सखाराम गोडबोले

१ साक्षी-- विनायक बल्लाळ गोखले

१ साक्षी -- रामचंद्र गणेश भिडे

या वारसापत्राचे सगळे साक्षीदार त्याकाळचे ब्रह्मावर्तातील प्रमुख व्यक्ती होत्या. कर्नल मेनसन बाजीरावांच्या दरबारातील कंपनीसरकारचे रेसिडेंट होते. रामचंद्र व्यंकटेश सुभेदार बाजीरावांचे प्रमुख व्यवस्थापकच होते.

या वारसापत्राने उत्तर प्रदेशच्या लेफ्टेनंट गव्हर्नरने १८४० चा हुकूम रद्द करून नानास सहाय्य देणेस मेनसन यास फर्मावले.

⌘⌘

## ५. आभाळ फाटले !!

नाना व दुसरीही मुले वाढत होती; प्रगती करीत होती. बाजीरावांनी त्यांचे विवाहही केले. आता संसारातील आपली कर्तव्ये सरत आली, अशा समाधानात बाजीराव होते. तोच दैव आडवे आले ! त्यांचा दुसरा दत्तक मुलगा सदाशिव कैलासवासी झाला ! सुनेचे मांडीवर महादेव भटांच्याच वंशातला सीताराम या नावाचा मुलगा बसवला. आपण मुलावाचून कष्टी तर सूनही तशीच असणार. आपला नवा नातू पांडुरंग या नावाने नांदू लागला, तसे बाजीराव त्याला रावसाहेब या लाडक्या नावाने हाका मारू लागले. तेच नाव मग सगळ्यांच्या तोंडी झाले.

देवधर्म करून बाजीरावांनी तेहत्तीस वर्षे इंग्रज सरकार कडून दर साल आठ लाख रुपये पेन्शन घेतले. आता त्यांचे वय सत्याहत्तर वर्षांचे झाले. २८ जानेवारी १८५१ तारीख उगवली. त्या दिवशी बाजीरावांनी या जगाचा निरोप घेतला. पेशव्यांच्या कुटुंबावर दुःखाची गडद छाया पसरली !!

आजवर नाना निश्चिंत होता. आता त्याची जबाबदारी वाढली. इंग्रजांनी नानास बाजीरावांच्या खासगत संपत्तीचा वारस मानले पण पेन्शन बाजीरावांपुरतीच होती, असा निर्णय घेतला. शिवाय, नाना आणि पेशव्यांकडील लहानथोर सगळी मंडळी जनसामान्य ठरली व इंग्रजी कायदे त्यांना लागू झाले.

पेशव्याकडील मग पुष्कळ कुटुंबे दक्षिणेत परतू लागली. तरीही 'श्रीमंत महाराजा ब्रह्मावर्त' ही बाजीरावांची पदवी नानाने धारण केली. इंग्रज सरकारने ती पदवी तर मानली नाहीच पण ब्रह्मावर्त येथील कारभारच कानपूरच्या कलेक्टरकडे सोपविला व नानादिकांचा पत्रव्यवहारही त्याच कलेक्टरामार्फत झाला पाहिजे, असा दंडक घातला. आपल्या परिवाराचा योगक्षेम अशा अपमानित अवस्थेत कसा चालवायचा?

⌘⌘

## ६. पालथ्या घड्यावर पाणी

आल्या प्रसंगाला तोंड दिलेच पाहिजे. नाना जाणकारांचा सल्ला घेऊ लागला. इंग्रजी राज्य म्हणजे कायदा व सुव्यवस्था!! तेव्हा नाना नावाजलेले वकील हुडकू लागला. हरभुजजी रुस्तुम मोदी हे कलकत्याचे वकील त्यांनी गाठले. इंग्लंडचे सुप्रसिद्ध जॉन लॅग यांचाही धावा नानाने केला. अशा कायदेपंडितांनी सांगितल्यावर हुकूम नानाने ईस्ट इंडिया कंपनीकडे पाठविलेले विनंतीपत्र कायदा आणि तर्क यांना धरूनच होते. बाजीरावांचे पेन्शन नानाला न चालू ठेवण्यासाठी सरकारने सांगितलेल्या सबबी साफ खोडून काढल्या होत्या त्या विनंतिपत्रात!! "ता. १३ जून १८१७ रोजी बाजीरावांशी

इंग्रजांनी जो तह केला त्यात ३४ लक्ष वसुलाचा मुलूख इंग्रजांनी आपल्या हाती घेतला आणि त्याच्या बदला आठ लाख रुपये पेन्शन इंग्रजांनी पेशव्यांना सुरू केली. ती मालकी हक्काच्या मानधनापोटी! जोपर्यंत इंग्रज मुलूख आपल्या हाती ठेवणार तोपर्यंत मग पेन्शन चालू राहिलीच पाहिजे! म्हैसूरच्या टिपू सुलतानाचे वंशजास आणि दिल्लीच्या बादशहाचे वंशजास जर पेन्शन मिळू शकते, तर पेशव्यांच्या वंशजास का नाही? हिंदुधर्माप्रमाणेच औरस पुत्राइतकेच अधिकार दत्तक पुत्रासही असतात. हिंदु कायद्यातील जाणकार सन्डरलण्ड यांना हवे तर सरकारने सल्ला विचारावा. बाजीरावांचे दत्तक बन्धु अमृतराव यांना सरकारने पेन्शन दिलेच होते की! ग्वाल्हेरचे जयाजीराव शिंदे, इंदूरचे यशवंतराव होळकर, घोलपूरचे भगवंत बहादूरसिंह हे सगळे दत्तकच. त्यांना सरकार पेन्शन चालू ठेवतेच की!!

पेशव्यांनी आपल्या वारसांना पुष्कळ संपत्ति ठेवली आहे, हे माझे पेन्शन बंद करण्यासाठी एक कारण पुढे केले आहे. पण ही काडीची आग माडीला नाही का? तहात बाजीरावांनी हात राखून खर्च करू नये अशी शर्त तरी होती काय? सरकार आपल्या सेवानिवृत्त गोऱ्या अधिकाऱ्यांना तरी हात राखून खर्च करण्याबद्दल प्रश्न विचारू शकते काय?''

कंपनीसरकारकडून नानाला उत्तर आले की 'बाजीरावांच्या पेन्शनवर नानांचा काही अधिकार नाही.'

मग नाना स्वस्थ थोडाच बसणार? सातारचे राजे प्रतापसिंह यांच्यावरील अन्याय दूर व्हावा म्हणून रंगो बापूजी गुप्ते इंग्लंडात शिष्टमंडळ घेऊन गेले होतेच. तीच वाटचाल आपण करावयाची असे नानाने ठरविले. राजा पिराजी भोसले आणि मुहम्मदअल्ली ऊर्फ अजीमुल्ला खाँ यांचे शिष्टमंडळ नानाच्यामार्फत विलायतेकडे गेले. राजा पिराजी भोसले यास वाटेतच जहाजात असतानाच देवाघरी बोलावणे झाले. तरीही अजीमुल्लाखां यांनी विलायत गाठली! इंग्लिश राजकारणी पुरुषांच्या गाठीभेटी त्यांनी घेतल्या. नानावर

झालेला अन्याय इंग्लिश जनतेपुढे मांडला. व्यवहारकुशलतेच्या जोरावर तेथे त्यांनी आपली वजनदारी वाढवली. लोक त्यांना भारतातील 'बडे बापके बेटे' च मानू लागले. 'राजा असावा तर असा!' असा त्यांचा गौरव घरोघरी होऊ लागला.

अजीमुल्लाखांनी शेवटी ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकमंडळाची व्यक्तिश: आणि सामूहिक गाठ घेतली. नानासाहेब पेशव्यावर झालेला अन्याय त्यांच्यापुढे उघडा नागडा मांडला. पण दरसाल आठ लाख रुपये कंपनीच्या खजिन्यातून द्यावयाचे, त्यांच्या जीवावर आले. खरेखोटे कागद करून कलकत्त्याच्या व्यापाऱ्यांना आणि अयोध्येच्या बेगमेला कंपनीने लुटले तर ते लुटारू इंग्लंडच्या कल्याणाकरिताच लुटारू बनले असा निर्णय करून इंग्रजी राजवटीने क्लाइव्ह, वॉरन् हेस्टिंग्जसारख्या दगाबाजांना माफीत काढले होते. ही जुनी उदाहरणे ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी अजीमुल्लाखाँला सुनावली. मग तो कळून चुकला की आपले सारे प्रयत्न म्हणजे पालथ्यां घड्यावर पाणी होय.

⌘ ⌘

## ७. धिक्कार मन साहिना!

अजीमुल्लाखाँ यांचा संताप अनावर झाला. आपले प्रयत्न सारे पाच वर्षांचे. पण रंगो बापूजी गुप्ते यांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी बारा वर्षांवर खटपट केली, पार्लमेंट गदगदा हलविले, ब्रिटिश अर्थसंकल्पही डळमळावयाचा बेत आणला. तरी त्यांच्याही प्रयत्नाला वाटाण्याच्या अक्षताच लागल्या. दिल्लीची बादशाहीसुद्धा जिच्या धोरणबाजीवर तग धरून, त्या मराठेशाहीचा पाणउतारा म्हणजे भारतराष्ट्राचाच अपमान. अजीमुल्ला आणि रंगो बापूजींनी मानला. 'अपमानशल्य ते विषसमचि जीवना' दोघांनाही वाटले.

पण उपाय काय? उपाय? इंग्रजी राजवटीचेच भारतातून समूळ उच्चाटन!!!

उत्तरेत नानासाहेब पेशवे आणि दक्षिणेत रंगो बापूजी यांनी इंग्रजांविरुद्ध उठावाचे पुढारीपण घ्यावे अशी आखणी झाली. इंग्लंडातून ते शिष्ट प्रथम फ्रान्समध्ये दाखल झाले. हिंदुस्थानातील फ्रेंच वसाहत जी चंद्रनगर तेथून उठाववाल्यांना सर्व सहाय्य मिळण्याची आश्वासने शिष्टांनी मिळवली. फ्रान्समधून भारतीय शिष्ट तुर्कस्थानात आले आणि त्यांनी खलिफाशी गुफ्तगुं केले. हिंदुस्थानच्या वाटेवर अजीमुल्ला खाँ माल्टा येथे पोहोचले. तेथे त्यांच्या कानांवर आले की क्रिमियामध्ये लढाई सुरू होऊन इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांच्या संयुक्त आघाडीचा धुव्वा उडाला! युद्धस्य कथा रम्या. पण कानाच्या पेक्षा डोळ्यांनी त्या बघाव्यात, म्हणून अजीमुल्ला सेवेस्टोपल येथे स्वत: गेले. तेथे इंग्रजांना पळता भुई थोडी झालेली, खांसाहेबांनी स्वत: पाहिली! मग काय?

आला त्यांना आत्मविश्वास. ज्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही, ते इंग्रजांचे साम्राज्य मुळापासून उपटून काढणे अवघड नाही असे त्यांच्या मनाने घेतले. लंडनटाईम्सच्या बातमीदाराला चाचपले त्यांनी आणि मनाशी पक्की खूणगाठ बांधली.

हिंदुस्थानात येऊन अजीमुल्लाखाँ थेट ब्रह्मावर्तास गेले. आपले धनी नानासाहेब पेशवे यांचे कानावर आपली सेवा आणि मत त्यांनी घातले. नानासाहेबांच्या संतापाने उसळती ज्वाळा बाहेर टाकली. 'क्रिमियन वॉर सुरू आहे ना? मग आताच पेटवू या रणकुण्ड! इंग्लंडची अडचण तेंच हिंदुस्थानचे संधिसाधन !!'

⌘ ⌘

## ८. खलबतखाना रंगला

ब्रह्मावर्ताला नानासाहेब पेशवे, त्यांचा पुतण्या रावसाहेब, तात्या टोपे, अजीमुल्ला खाँ, रंगो बापूजी गुप्ते, दिल्लीचा बादशहा बहादूरशहा आणि मंडळी पेशव्यांच्या वाड्यातील खलबतखान्यात जमली. नानासाहेबांनी आपला बेत सगळ्यांना सांगितला. बहादूरशहा म्हणाले- 'बेत ठीक आहे. संधीही नामी आहे. आपण उठावाला तयार आहोत.

पण आपल्याच देशबांधवांचा आपणास पाठिंबा नको का.'

'तो खासच मिळेल.' तात्या टोपे सांगू लागले. 'इंग्रजी राज्य हा परमेश्वरी प्रसाद आहे, असे लोक वरकरणी बोलतात. ते खरे नाही. लोकांत इंग्रजी राज्यामुळे सगळीकडे असंतोष आहे.'

'तो कसा काय?' रावसाहेबांचा प्रश्न.

नानासाहेब पेशवे म्हणाले- अरे, इंग्रजांनी येथे शाळा सुरू केल्या. पण मेकॉलेने त्या कशासाठी सुरू केल्या? या देशातील पेहरावपेशानी भारतीय राहिले, तरी मनाने इंग्रज होण्याकरताच ना? सत्तर हजार लोकांच्या सह्यांनी कंपनी सरकारकडे मग अर्ज नाही का गेला, की - माय बाप, शाळा चालवा पण त्यात बायबल शिकवू नका, म्हणून!! ईस्ट इंडिया कंपनीचा सरसंचालक मँगिल्सने भर पार्लमेंटात नाही का सांगितले की भारतातील हिंदुमुसलमानाला ख्रिश्चन बनविण्याकरताच परमेश्वराने इंग्रजांना हिंदुस्थानात राज्य दिले आहे. या साऱ्याच्या पोटी आमची प्रज्ञा मारण्याचा हेतू आहे. प्रज्ञाहतास्तु रिपवो सुहता भवन्ति ! महाभारताने आपल्याला इशाराच दिला आहे तेव्हा मरणासि जो तयार तोच अरी करील ठार!' हे आपणही ओळखलेच पाहिजे. 'विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी.' असे रामदासांनीही शिकवले आहे.

अजीमुल्ला खाँ :- राजकीय दृष्ट्याही असंतोष काही कमी नाही. इंग्रजाची सही सही नक्कल उठवून आपण फार शहाणे आहोत, असे दाखविणारांचा एक बेअकली वर्ग आपल्यात निर्माण झाला आहे, हे खरे. पण डलहौसीने जी संस्थाने जप्त करून इंग्रजी राज्य वाढविले त्याला काही ताळ, तंत्र किंवा तत्त्व आहे का? सतीबंदीचा कायदा, विधवांच्या पुनर्विवाहाचा कायदा आणि असेच कायदे करून धर्मात ढवळाढवळ इंग्रजांनी केली, ती बाजूस सारू; पण गावोगावची पंचायत पद्धतीच नष्ट करून, प्रजेला कस्पटासमान नाही का लेखले इंग्रजांनी? यातून सामान्य माणूससुद्धा इंग्रजी राज्यावर चिडलेलाच आहे.

रंगो बापूजी गुप्ते यांनी आणखीही एक रहस्य सांगितले. ते

म्हणाले - सैन्यात तरी संतोष आहे कोठे? कानावर पेन्सिल ठेवायची नाही, कपाळाला अबीर-बुक्का-गंध लावायचे नाही, या किरकोळ निर्बंधाबद्दल म्हणत नाही मी! पण अवजड कामे करावयाची आणि संकटाला तोंड द्यायचे भारतीयांनी व चैन करायची, श्रेय मिळवायचे गोऱ्या साहेबाने! कॅप्टन, जनरल यांच्या जागा बावळट पण कुर्यात हुकूम करू शकणाऱ्या गोऱ्याला अन् जीवाच्या करारावर त्याचे हुकूम पाळावयाचे काळाचीही नरडी फोडू शकणाऱ्या जवानांनी! काळ्या शिपायाला पगार रुपये पाच तर गोऱ्याला पन्नास!! सहाय्यक सैन्य इंग्रजांनी इथल्या संस्थनिकांना दिले तर मोबदल्यात त्या सैन्याच्या वार्षिक पगाराइतके वार्षिक शेतसारा देणारा मुलूख इंग्रजांनी कायमचा उपटला. जमीनदारांपैकी इनाम कमिशन नेमून प्रत्येक पंचवीसामागे एकवीस खलासच केले!!

नानासाहेब पेशवे- तात्पर्य, सगळीकडे पेटलेल्या भारतीय असंतोषाला आपण संघटित केले तर आपल्या उठावाला लोकपाठिंबा मिळेलच मिळेल. आपल्या उठावाला पुढारी हवा. दिल्लीचे बादशहा बहादूरशहा हे आपले नेते. मोंगलाईची मिजास संपली तरी लोकांत बहादूरशहाविषयी नितान्त आदर आहे. त्यांनाच आपणा सर्वांपेक्षा इंग्रजी राजवटीची इतिश्री करावयाची आहे. त्यांच्याच एका पूर्वजाने इंग्रजांना येथे वखार घालावयाची परवानगी दिली. पण तागडीच्या संरक्षणासाठी तलवार उभी करणाऱ्या या घुसणखोराने, त्या तलवारीचा उपयोग तख्त मिळवण्यात केला! 'असुनि खास मालक घरचे म्हणति दास आम्हा' हे बदललेच पाहिजे. देऊ या इंग्रजांना पिटाळून!!

सगळेजण कबूल झाले. 'आमची संमति म्हणजे आम्ही उचललेला बेलभंडाराच' अशी ग्वाही प्रत्येकाने दिली

⌘ ⌘

## ९. संकेतातून सिद्धी-संदेश

हिंदुस्थानातील राजेरजवाड्यांशी नानासाहेब पेशव्यांचा पत्रव्यवहार दिवसानुदिवस चाललाच होता. ग्वाल्हेर नरेश जयाजीराव यांच्या आई

बायजाबाई, होळकर, भुज-नागपूर-चांदा-जयपूर-जोधपूर-कोलाबबंदर-झालाबाद-रिवा-बडोदा-हैदराबाद-शोरापूर-कोल्हापूर-सातारा इत्यादी ठिकाणच्या राजांना पत्रे पाठवून नानासाहेब पेशवे त्यांना उठाव.साठी अनुकूल करून घेतच होते. नानांना सर्वप्रथम साथ मिळाली जम्मुनरेश गुलाबसिंहाची! लखनऊच्या एका व्यापारी पेढीमार्फत उठावाच्या खर्चाची किंमती जबाबदारी गुलाबसिंहांनी घेतली. याच गुलाबसिंहामार्फत नाना पेशव्यांनी रशियापर्यंत संधान लावले होते आणि ते फलदायीही झाले होते.

धोंडोपंत- नाना- भट पेशवे मग हत्तीवरून आपले वकील थाटामाटाने राजेरजवाड्यांकडे पाठवू लागले. त्यांच्या बरोबर सैन्याच्या छोट्या छोट्या तुकड्याही नानासाहेब पाठवीत. भारतीय सैनिकांनी देशभक्तीने प्रेरित होऊन इंग्रजांविरुद्ध शस्त्र उपसावे अशीही खळबळजनक झलक नाना पेशव्यांनी दिली सोडून! त्यासाठी प्रचार रक्तकमल पाठवून होई. सैन्य प्रमुखाच्या हाती ते प्रथम देण्यात येई आणि मग एका सैनिकाकडून दुसऱ्या सैनिकाकडे असे फिरे. बंगाल-पंजाबमधील सर्व सैनिकांचे हाती रक्तकमल चक्कर मारल्याशिवाय राहिले नाही. अयोध्येचे राज्य इंग्रजांनी खालसा केल्यापासूनच रक्तकमलाचा संकेत भारतीय सैनिकांना समजू लागला होता. रक्तकमल छावणी छावणीतून आपला संदेश इतक्या बेमालूमपणे देई की त्याची दाद ना फिर्याद गोऱ्या साहेबांना !!

गावागावांतून जनसामान्याला क्रांतियुद्धात सामील होण्यास बोलावणारा संकेत चपात्यांचा होता. एका गावचा चौकीदार दुसऱ्या शेजारच्या गावचे चौकीदारास चपात्या पोहोचवी, आणि सांगे की अशाच चपात्या बनवून भोवतालच्या गावात पोहोचवा. एक्या ताटी पोट भरू पाहणारे आपण भाऊ भाऊ जीवास जीव देऊ, अशी अन्नाची शपथ त्या चपात्यांच्या वाटपाने जनमनात तयार झाली.

कन्याकुमारीपासून केदारेश्वरापर्यंत आणि सोमनाथापासून जगन्नाथापर्यंत सर्व हिंदुस्थानभर शेकडो साधू, पंडित, फकीर, ज्योतिषी पदयात्राच पदयात्रा करू लागले. पूजापाठ, प्रवचन, पुराण, कीर्तन,

धर्मोपदेश, भविष्य सांगण्याचा सपाटाच त्यांनी चालविला. मद्रासी सैनिकांचे बळावर इंग्रजांनी प्लासी जिंकली, त्या त्यांच्या वस्तादगिरीची शंभर वर्षे भरत आली, असा प्रचारच त्या सगळया तंत्रातून घरोघरच्या स्वयंपाकघरापर्यंतसुद्धा झाला.

दैव अनुकूल आहे, तेव्हा जिवाभावाने आपण उठाव करू आणि शत्रूचा शेवटचा रक्ताचा थेंब पडेपर्यंत जरूर तर आपल्याही रक्ताचा शेवटचा थेंब सांडून, पारतंत्र्याच्या चिखलातून निर्मळ स्वातंत्र्यलक्ष्मीची पूजा आपण साधू. चला, वेळ दवडू नका, असा संदेश त्या साधुसंचाराने, चपातींच्या वाटपाने आणि रक्तकमलांच्या भेटीने, सगळीकडेच तांबड फोडून राहिला.

⌘ ⌘

## १०. नानासाहेबांची यात्रा

प्रत्यक्ष राजकारणी माणसे. ती उठावाचा प्रचार करीतच होती. शिवाजीच्या काळी रामदासांचे मठ प्रचाराने लोक जागे करीत होते; तर राजकारणी मनसुबे रचून ते साकार करीत होते. तोच कित्ता नानासाहेबांचे साथीही गिरवीत होते. अयोध्येमध्ये मौलवी अहमदमुल्ला शहा याने आपल्या अनुयायांचा एक ताफाच्या ताफा तसार केला आणि सोडला प्रचाराला! इंग्रजी राज्य संपलेच पाहिजे, हा त्यांचा होता घोष व धोशा! मौलवींच्या प्रार्थना सभेला लोक जमत मुंग्यासारखे वारुळावरच्या ! पाटण्याचा पीर अल्ली घरोघर जाऊन उठावाचा प्रचार करी. या पीर अल्लीचे गुप्तगूं होते, कानपूरच्या मजी उज्जमाबरोबर. या उत्थानप्रचारकांना पोटापुरते वेतनही देण्यात येत असे. अयोध्येचा राजाचा मंत्री नकीखाँ उर्फ टिकिटराय हेतुपुरःसर उत्थानाचा प्रचारक स्वयंस्फूर्तीने झाला होता. तो बंगाली सैनिकांना इंग्रजी राज्यावर चाल करण्यास सांगत होता. दक्षिणेत रंगो बापूजींचे हस्तक आणि नरगुंदकर भाव्यांचे गुप्त हेर इंग्रजी राज्याचे विरुद्ध प्रचार करीत राहिले. या सर्व थरातील क्रांतीच्या सैनिकांना संघटित राखून एक दिलाजोमाने उठविले पाहिजे म्हणून त्यांची देखभाल करण्याकरता नानासाहेब पेशव्यांनी 'यात्रेला

जाण्याचे ठरविले.

आपण दक्षिणोत्तर भारतातील तीर्थयात्रा करणार आहोत, असे नानासाहेबांनी इंग्रज सरकारास कळविले. पेन्शनला मिळालेला इंग्रजांचा नकार नानासाहेब विसरला आणि तीर्थक्षेत्रांच्या यात्रेला लागला, असा कयास इंग्रजांनी बांधला. यात्रेला परवानगी मिळाली. 'करावयाचे बोलू नये जबानीने!' हे रामदासी सूत्र नानासाहेबांनी अवलंबिले होते. तीर्थयात्रेतील देवदर्शनापेक्षाही देशातील अनेक मातबरांमधील देवांचे दर्शन नानासाहेब पेशव्यांना घ्यावयाचे होते. कारण त्या भेटीतूनच भारतीय राज्यक्रांतीचे अंतिम स्वरूप मुक्रर करावयाचे होते. नाना यात्रेला निघाले. हत्ती, उंट, घोडे आवश्यक तेवढे बरोबर होते. तात्या टोपे, अजीमुल्ला खाँ, बाळासाहेब, रावसाहेब यांच्यासह नाना निघाले ब्रह्मावर्ताहून! सरळ पंजाबमधील अम्बाला येथे त्यांची वारी झाली. वाटेत प्रत्येक इंग्रजांच्या लष्करी छावणीचे 'डोळे भरून' निरीक्षण करण्यास नाना चुकले नाहीत.

नाना मेरठच्या मुक्कामात सार्जंट मेजर चार्ल्स याला भेटले. तेथील चौदाव्या पलटणीचे कर्नल ड्रेगन्स कॅप्टन चेंबरलेन याने नानांची घोड्यावरील स्वारी पाहिली. अरे! तो थक्कच होऊन गेला. 'लष्करी नेता असावा तर असा असावा' असे तो उद्‌गारला.

लखनऊला नानांना जाणेच होते. तेथे ब्रह्मावर्ताचा स्पेशल कमिशनर म्हणून पूर्वी काम केलेला मूरलंड होता. १७ एप्रिल १८५७ रोजी तो भेटला. तेव्हा त्याने निमंत्रण दिले नानांला. दुसरे दिवशी निमंत्रणाप्रमाणे नाना मूरलंडला भेटण्यास कानपूरला गेले. पण रविवार! साहेबांचा सुट्टीचा दिवस. साहेब भेटणार कसा? नाना आल्याची वरदी साहेबांकडे गेली. मूरलंडकडून निरोप आला 'माफ करा (एक्सक्यूज!)'

'धिक्कार मन साहिना!' बाजीरावांचे पेन्शन नानाला चालू ठेवावे अशी शिफारस करणारा मूरलंड. एवढ्या सलगीच्या दोस्ताने रविवारची सबब सांगून भेट नाकारल्यावर नानांचे बन्धू बाळासाहेब यांनी मूरलंडला कळविले की - 'नाना, लखनऊच्या नबाबाचे भेटीस

दिल्लीकडे गेले. दिल्लीस बादशहा बहादूरशहाला खडी,तालीम देऊन लाल किल्ला ताब्यात घेतला आणि त्यावरील इंग्रजांचे युनियन जॅक उतरून टाकले! मग त्यांनी बहादूरशहास हिंदुस्थानचा बादशहा केल्याची द्वाहीही फिरवली

⌘ ⌘

## १२. मिळाली 'ओ'-सरी! हातपाय पसरी !



युरोपातील क्रिमियन वॉर सुरू झाल्याचा फायदा घेण्याचे नानांच्या डोक्यात येताच, इंग्रजांच्या बँकेत नानांची पाच लाख पौंड ठेव होती, ती एका वर्षात नानांनी फक्त दहा हजार पौंडांवर आणली. एवढा पैसा नानांनी भारतीय स्वातंत्र्य युद्धाचा डोम्ब उठविण्यासाठी खर्च केला.

ब्रह्मावर्ताच्या ईशान्येस अकरा मैलांवर कानपूर. तेथील सैनिकांत नव्या काडतुसाला गाई-डुकरांची चरबी लावल्याच्या वार्ता फैलावल्या होत्याच. त्यातून मेरठ-दिल्लीचे उठाव इतके लोकांतून

फैलावले की दिल्लीला बहादूरशहाची राजवट झाल्याचे समाधान सर्वांनी मानले. १४ मे पासून १८ मे अखेर लोक शान्तच शान्त होते. पण १९ मे रोजी सैन्य प्रमुख सर ह्यूजव्हिलर् याला म्हणजेच होलासाहेबास कळून चुकले की सैन्यातील शान्तता ही प्रक्षोभापूर्वीची समुद्रशांतता आहे. कारण होलासाहेबाला ठाऊक होते की कानपूर सैनिकांच्या संतोषाचे फुफाट्यात आहे तसेच इंग्रजीविरोधी उठावाच्या आगीतही आहे. अजून कशाचीच झळ लागली नाही, तोवर संरक्षणाच्या व्यवस्थेस होला-साहेब लागला. युरोपियन सैनिकांच्या बराकीशेजारील इस्पितळात त्याने ते सैनिक बचावण्याचे ठरविले. त्याला चोहोबाजूंनी उंचच उंच पण मातीच्या बळकट भिंती होत्या. त्यावर बंदुका रेखून आणि रोखून ठेवल्या. होलासाहेब देशी शिपायांतही मान्यता पावला होता, म्हणून त्याला इस्पितळापेक्षा अधिक सुरक्षित आश्रयस्थान निवडण्याची आवश्यकता वाटली नाही. प्रयागहून जवळच्या जवळ केव्हाही कुमक मागवता येईल असाही त्याचा आत्मविश्वास होता. लखनऊस हेन्री लॉरेन्सकडून होलासाहेबाने काही सैनिकही मागवून ठेवले. शिवाय आपला मित्र नानासाहेब पेशवे यांच्याकडेही होलासाहेबाने संरक्षणार्थ सैन्य मागितले.

कानपूरचा कलेक्टर हिलसॅडन याने सरकारी खजिना सैनिकांच्या गराड्यात आणून सुरक्षित ठेवण्याचा विचार केला. खजिना नबाबगंजला होता. कलेक्टरने खजिना आणण्यासाठी नाना पेशव्यांच्याकडून हत्ती मागवले, ते घेऊन कलेक्टर सहा मैल खजिना हलविण्यासाठी चालून गेला. पण काय? पहारेकऱ्यांनी त्याला खजिन्याकडे ढुंकनसुद्धा बघू दिले नाही !!

"अशा हट्टाला पेटाल, तर सोमवारपासून गोऱ्या शिपायांकडेच खजिना व शस्त्रागार पहाऱ्यासाठी सोपवीन." कलेक्टरने खडसावले.

'आमच्या जीवात जीव आहे तोपर्यंत हे होणार नाही. खजिना व शस्त्रागार आम्हा भारतीयांचेच आहे.' कलेक्टरला उत्तर मिळाले.

'जास्त गडबड कराल, तर इंग्रजी राज्य आता आठवडेकरी

आहे, असे समजा!'

काय करतो कलेक्टर? कारण बातमी होती, की २४ मे १८५७ हा ईदचा दिवस; त्याच दिवशी कानपूर इंग्रजांवर उलटणार. त्यामुळे २२ मे पासून इंग्रजांच्या बायकामुलांसह सगळ्यांच्या तोंडचे पाणी पळाले होते. इतके की दरसालाप्रमाणे महाराणी व्हिक्टोरियाचा वाढदिवस साजरा करण्याचे भानही त्यांस राहिले नाही! काही युरोपियन तर भारतीय पोशाखातच वावरू सवरू लागले. कलेक्टर हिलर्सडन् याने नानासाहेब पेशव्यांना संरक्षण मागितले. दोनशे घोडेस्वार, चारशे पायदळ, दोन तोफा पाठवल्या नानांनी. नवाबगंज येथील खजिना आणि शस्त्रागार यांच्या संरक्षणाची व्यवस्थाही तात्या टोपेंच्या मार्फत नानांनी केली. नानांनी दोन हजार सैनिक भरती करावे; त्या सैनिकांचा पगार इंग्रजी खजिन्यातून दिला जाईल, अशीही व्यवस्था झाली.

नानांनी इंग्रजांनी मागितलेली सर्व मदत दिली.

'अपकारिषु यः साधुः सः साधुः सद्भिरुच्यते ।'

⌘ ⌘

## १३. 'नाना, उठावाचे पुढारी व्हा!'

नानासाहेब पेशवे इंग्रजांना मदत करू लागले, ते खपले नाही देशी शिपायांना. ते संतापले. नानांना तरी त्रास काय कमी होता? स्वजनापवाद आगीशिवायच शरीराला जाळत असतो. दोन क्रमांकाच्या घोडेस्वारांच्या पलटणीचा अधिकारी टीकासिंह याने नाना व शिपाईमंडळी यांची बैठक घडविली. तीत सैनिकांची संघटना बांधण्याची कामगिरी नानांनी ज्वालाप्रसादाकडे सोपविली. बिजनपूरचा रहीमखाँ आणि बांदा येथील मददअल्ली या स्वतःचे नोकरांकडेच घोडेस्वारांची इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्याचे कार्य नानांनी दिले. सुभेदार शोभासिंह आणि ट्रूपर शमसुद्दीन यांनी २ जून रोजी हवालदार गोपालसिंह आणि नाना, बाळासाहेब आणि अजीजमुल्ला यांचा खलबतखाना गंगेच्या 'सूखा मल्लाव' घाटावर

थाटला. शिवाजी महाराजांचा गनिमी कावा नानांच्या हाडीमांसी कसा मुरला होता, हे शिपाईमंडळींना त्या सर्व घडामोडीतून कळून चूकले.

कानपूरची बडी धेंडेही उठावाच्या वार्तांनी घामाघूम झाली होती. कानपूरच्या बाबू ईश्वरप्रसादांनी मातबरांचे एक शिष्टमंडळ कानपूरच्या कलेक्टराकडे नेले ! पाचशे लोकांचे एक संरक्षक दल उभारण्यास आणि आपल्या जीविताचे व संपत्तीचे रक्षण करण्यास त्यांनी कलेक्टरची परवानगी मागितली. हिलर्सडनने ती परवानगी ताबडतोब दिली आणि त्या दलाचा पगार व्यापारीवर्गानेच भागवावा असा हुकूम केला.

४ जून १८५७ च्या रात्रौ टीकासिंहने आपल्या पिस्तुलाचे तीन बार केले. घोडेस्वारांची पलटण बराकीबाहेर पडली आणि नबाबगंजकडे रवाना झाली. सुभेदार भवानीसिंह आडवा आला तर त्याच्या इंग्रजभक्तीबद्दल त्यास घायाळ करण्यात आले. क्रमांक एकचे पायदळ उठावात सामील होण्याबद्दल कुचराई करीत होते. त्यात उठाववाले दोन घोडेस्वार घुसले. तेव्हा ते पायदळही लष्करी पोशाख चढवूनच उठावात सामील झाले, आणि मग सारेच नवाबगंजला जाऊन उठावाचा डेराच उभारून बसले.

खजिन्यावर पहारा करणाऱ्या नानांच्या सैनिकांनी उठाववाल्यांचे स्वागत केले, मग झालीच विध्वंसाला सरुवात! सरकारी कचेरीला आग लागली; तुरुंगातील कैदी मोकळे झाले; त्रेपन्न व छपन्न क्रमांकाच्या सेना मग ८ जून रोजी उठावात सामील झाल्या.

होलासाहेबाने त्यांच्यावर तोफ डागली. परिणामतः नवाबगंजचा उठाव अधिक जोरकस झाला. उठाववाले नानासाहेब पेशव्यांपर्यंत पोहोचले. त्यांनी नानाला 'उठावाचे पुढारीपण पत्करा' अशी विनंती केली. नानांनी ती मानली. आणि? क्रांतिकार्याला कानपुरात पद्धतशीर सुरुवात झाली.

⌘ ⌘

## १४ चलो दिल्ली!

इंग्रजांविरुद्ध बिथरलेल्या सैनिकांनी खजिन्यातील एक लाख रुपये ता. ५ जून रोजी उपसले आणि आपसांत वाटून घेतले. उठाववाल्यांनी सरकारी शस्त्रागारातील मोठ्या तोफा, बंदुका, दारूगोळा, तंबू, कनाती अशा कितीतरी उपयुक्त सामानावर हात मारला. तेव्हा कमिशनर रेली यास इंग्रज सरकारचा हुकूम झाला की शस्त्रागारच दारूगोळ्याने उडवून लावले तरी चालेल पण उठाववाल्यांचे हाती काही लागू नये! या हुकमाची तामिली करून द्यावयास उठाववाले मूर्ख, बेसावध अगर आंधळे बहिरे का होते? त्यांनी रेलीला शस्त्रागाराकडे फिरकून तरी दिले पाहिजे ना?

व्यापऱ्यांच्या व महाजनांच्या संरक्षणार्थ उभारलेल्या पाचशे नवजवानांच्या दलाने कोतवालीवर धरणे धरले व आपल्या तनख्याची मागणी केली. व्यापाऱ्याकडून पैसे आणवून कोतवालीत ते नवजवानांच्या हातात पडले. लगेच सारे नवजवान उठाववाल्या क्रांतिकारकांत जाऊन मिसळले सुद्धा!

असे होताच नानासाहेब पेशव्यांचा एक नोकर लालपुरी एका हत्तीवर बसून उठाववाल्यांचा झेंडा फडकावीत फडकावीत सगळ्या शहरभर पुकार करीत गेला की, 'इंग्रजी राज्याने म्हटले राम । परक्यांचे येथे काय काम ?'

मग सगळे उठाववाले हत्तीवर खजिना लादून आणि शस्त्रागारातील सर्व सामग्री हाती घेऊन 'चलो दिल्ली' करू लागले. नाना, अजीमुल्लाखाँ, तात्या टोपे वगैरे पुढारीही या दिल्ली मोर्चात होते. मग ब्रह्मावर्तही रावसाहेब पेशव्याने स्वतंत्र झाल्याचे जाहीर केले.

⌘ ⌘

## १५. इंग्रजांचा गंगाप्रवास

कानपूरहून ऐंशी मैलांवर फत्तेगड आहे. जुलै महिन्यात फत्तेगडच्या सैनिकांनी इंग्रजांविरुद्ध उठाव केला. तेव्हा कर्नल स्मिथने

तीन नावांमध्ये युरोपियन स्त्रीपुरुष घालून गंगाप्रवाहातून त्या नावा कानपूरकडे चालविल्या. गंगेच्या दोन्ही तटांवरून मग त्या नावांवर गोळ्या झडू लागल्या. त्यातूनही एक नाव त्या माऱ्यातून पुढे झटकली. ती ब्रह्मावर्तापासून सात मैल दूर बसलेल्या चन्दीमाता घाटासमोर आली! तिच्यावर तोफेचा मारा सुरू झाला. फत्तेपूर-चौरासीचे जमीनदार जस्सासिंह यांनी या नावेचा पिच्छा पुरवला. ब्रह्मावर्ताच्या शुक्लदेव घाटासमोर ती नाव येताच, त्या घाटावरूनही मारा होऊ लागला. तेव्हा नावेतील इंग्रजांनी सबुरीची विनंती करणारे पांढरे निशाण फडकावले! मग जस्सासिंहांनी त्या नावेतील सर्व इंग्रज रावसाहेब पेशव्यांचे समोर उभे केले.

रावसाहेबांनी त्या सर्वांना दयाळूपणेच वागविले. त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था केली आणि रात्रभर 'बड्या साहेबांच्या बंगल्यात' आरामशीर झोप दिली. दुसरे दिवशी सकाळी ती सर्व मंडळी कानपूर येथे नानासाहेब पेशव्याकडे धाडण्यात आली. त्यांची व्यवस्था करताना, पुरुषांना नानांनी 'सवादा-कोठी' दाखवली आणि बायकामुलांना 'बीब्बीके घरा' त बंदिस्त ठेवले.

⌘ ⌘

## १६. घोडेस्वारांनी हात दाखवला

घोडेस्वारांची एक तुकडी ग्रँड ट्रंक रोडवरून चालली होती. चोबेपुरास ती पोहोचली. एका घोडेस्वाराने बिगुल वाजविला. इंग्रज अधिकाऱ्याने विचारले - 'बिगल वाजवायला कोणी हुकूम दिला?-

'नानासाहेब पेशव्यांनी!' उत्तर आले.

तात्काळ इंग्रज अधिकारी उमजले की पलटण नानांच्या उठावात सामील झाली आहे. अन हूँ काय? इंग्रज अधिकाऱ्यांनी आपापल्या घोड्यांना टांच मारलीच! भारतीय घोडेस्वार त्यांच्या पाठीमागे लागले. इमलिहा गावाजवळ एका इंग्रज अधिकाऱ्याला झटापटीनंतर ख्रिस्तचरणी धाडण्यात आले.

चौबेपूरचा जमीनदार माखन पाण्डे इंग्रजांच्या साहाय्यास

धावला. उठाववाल्यांपैकी काही घायाळ झाले, काही जखमी झाले तर काहींना स्वर्गी जावे लागले. पण शेवटी, मारलेल्या इंग्रज अधिकाऱ्याचे मुंडके घेऊन उठाववाले ब्रह्मावर्तास रावसाहेब पेशव्याकडे दाखल झाले. हकीकत ऐकून रावसाहेबांनी माखन पाण्डेला धरून आणण्यासाठी सैनिक पाठविले. पण तो होता कुठे जाग्यावर ? मुठीत जीव घेऊन तो केव्हाच पळून गेला होता !!

⌘ ⌘

## १७. कानपूर मुळावर आले !!



दिल्लीला गेलेले उठाववाले आता परतले. दूरदृष्टीनेच तसे झाले. यावेळी दिल्लीत सारी क्रांतिकारक सामर्थ्ये एकवटली होती. त्यामुळे इंग्रजांनी सगळीकडून दिल्लीवर हल्ला केला की उठाव एकदमच कोसळावयाचा ! म्हणून इंग्रजांची शक्ती वाटून, विभागून विखरून राखण्याचे धोरण आवश्यक होते.

भौगोलिक दृष्टीनेही कानपूर हे ठाणे महत्त्वाचे होते. ते इंग्रजांच्या

कब्जात गेले तर कलकत्त्यापासून दिल्लीपर्यंत इंग्रजांचा संचार सुखरूप नसला तरी सुरक्षित होता. पंजाबमधून आणि ग्रँड ट्रंक रोडवरून दिल्लीला इंग्रज शह देऊ शकले. लखनऊही त्यांनी पायातळी चेचले असते. ती संधी त्यांना लाभू द्यायची नाही, म्हणून कानपूरचे उठाववाले कानपूरला परत आले.

ही बातमी व्हीलर उर्फ होलासाहेबाला लागली. ७ जूनला सकाळी त्याला नानांचे पत्रच मिळाले. इंग्रजावर हल्ला होणार ही कल्पना येताच, व्हीलरने हजारावर इंग्रजांना इस्पितळाच्या बंदिस्तीत जमा केले. त्यात साडेपाचशे स्त्रिया-मुलेच होती. इस्पितळाभोवती मोर्चे बांधण्यात आले. सीमा भिंतीवरही संरक्षक तोफा राखण्यात आल्या. भोवताली तीन तीन भरलेल्या बन्दुका तयार असलेले पहारेकरी ठेवण्यात आले.

उठाववाले सुभेदार टीकासिंहाच्या नेतृत्वाने चालून आले. वाटेत इंग्रजच काय, पण इंग्रजी पोषाख घातलेला भारतीय भेटला तरी त्याला देवाघरी धाडण्यात आले. तारीख ७ जूनचे दुपारपर्यंत इंग्रजांच्या डेऱ्याला घेरण्यात आले. उठाववाले व इंग्रज एकमेकांवर गोळ्यांचा वर्षाव करू लागले. त्या धुमश्चक्रीत इंग्रजी बायकामुलांनी जो हलकल्लोळ माजवला त्याला तोडच नव्हती!

नबाबगंजच्या शस्त्रागारातील सामग्रीचा उपयोग करूनच टीकासिंहाने मातबर लढाई चालविली होती. कानपुरात आणि परिसरात पत्रके चिकटविण्यात आली होती. हिंदी व उर्दू. हिंदुमुसलमानांनी इंग्रजांना हिंदुस्थानातून काढून लावण्यासाठी नानासाहेब पेशव्यांना हात द्यावा, अशी विनंती त्या पत्रकात होती. काजी-मौलवी आणि वैदिक-पुजारी सर्वजण नानाला यश देण्याबद्दल परमेश्वराची प्रार्थना करीत व करवीत होते. किनाऱ्यावर मैदानावर ८ जूनला सामुदायिक प्रार्थना झाली. तीत अजीमुल्लाखाँ, हुलाससिंह नन्हे नबाब, अजीजन यांनी भाषणे करून इंग्रजी राज्याची इतिश्री झालीच पाहिजे, असा संदेश दिला.

कानपूर-परिसरातील जमीनदार, वजनदार व्यक्ती आणि

जनसामान्य, नानासाहेब पेशव्यांचीच बाजू उचलून धरीत होते. रसूलाबादचे चौधरी मनसुबअल्ली फत्तेहपूरच्या जस्सासिंहाच्या उत्साहाने उठाववाल्यांच्या सैन्यभरती करू लागले. अयोध्येचे नवजवान क्रांतिसेनेत भरती होऊन नवचैतन्य निर्माण करू लागले. नानाभाऊंचे मोतीसिंह, फत्तेपूरचे गुरुदत्तसिंह, संचेडीचे दुर्गाप्रसाद, नारचे राजा दरियावचंद, शिवराजपूरचे सतीप्रसाद चौहानीचे देवीसिंह, ब्रह्मावर्ताचे चौधरी, पनचे गंगागंज काकादेव, रसूलाबाद-नरबल-शिवराजपूर, जाजमऊ वगैरे ठिकाणचे जमीनदारांसह सामान्य लोक नानासाहेब पेशव्यांचे उत्स्फूर्त साथीदार झाले. त्यामुळे कानपूर हे क्रांतिकेंद्र प्रभावीपणे इंग्रजांच्या मुळावर आले !!!

⌘ ⌘

## १८. प्लासीची शंभरी साजरी झाली !

व्हीलर उर्फ होलासाहेब कमी सावध नव्हता. त्याने पंजाबचा लेफ्टनंट गव्हर्नर सर जॉन लॉरेन्स, अयोध्येचा चीफ कमिशनर सर हेन्री लॉरेन्स, प्रयागपर्यंत पोहोचू शकणारा जनरल नील अशा सर्वांस पत्रे लिहून कुमक मागविली. पण उठाववाल्यांचा जोरच एवढा होता की वरील सर्वांना तो बेचैन करीत होता. आपले आपल्याला झाले थोडे, तेथे व्हीलरचे हवे कशाला घोडे? अशीच उत्तरे सगळीकडून आली. लखनऊ उठाववाल्यांच्या कात्रीत होते. तेव्हा तेथून कुमक मिळण्याची आाशा करण्यात अर्थच नव्हता.

कानपुरात इंग्रज तर कच्च्या मातीच्या तटाच्या आश्रयाने जीव धरून राहिले होते. उठाववाल्यांच्या आगीत त्यांना एकच हवा होता - मदतीचा हात! कृपेचा हात!! दोनशे तरी गोरे शिपाई बाहेरून दिमतीला येते, तर कानपूरचे इंग्रज जीव धरून पळून तरी जाऊ शकले असते!

कच्च्या मातीच्या घेऱ्यातून उठाववाल्यांना ते इंग्रज सामना देत होते. दहा दिवस उठाववाले दिवसाच सरबत्ती करीत पण पुढे अकरा दिवस त्यांनी रात्रंदिवस सरबत्ती चालू ठेवली! जखमींची वास्तपुस्त

करायलाही कोणी रिकामा नव्हता. कच्च्या बराकीत म्हातारी, मुले व स्त्रिया गुजराण करीत. एक दिवस त्यांच्या डोक्यावरील छप्पर जळून खाक झाले! आगवाऱ्यापासूनही त्यांना संरक्षण राहिले नाही. अन्नपाण्याचा तुटवडा एवढा पडला की माणसे अर्धपोटी राहू लागली आणि बाहेरून रसद येण्याची आशाच नव्हती !! गोळीबारांच्या झक्काझक्कीत पडलेली प्रेते पुरावयास घेऱ्याच्या आत जागाच नव्हती ! तेव्हा घेऱ्याच्या बाहेर असलेल्या एका विहिरीत, रात्री अपरात्री व तेही चोरून मारून, प्रेतांची वासलात लावण्यात येई.

उठाववाल्यांना कानपूरच्या एका वेश्येनेही सहाय्य करावे, याचे होलासाहेबाला आश्चर्य वाटले. सतरंजी मुद्दालमध्ये राहणारी ही बाई! हिने स्त्रियांची एक तुकडीच उठाववाल्यांपैकी शम्सुद्दीनच्या दिमतीला दिली. या तुकडीतील तरुणी घोड्यावर स्वार होऊन उठाववाल्यांना इंग्रजांवर हल्ला करण्यात प्रोत्साहनच प्रोत्साहन देत. आणि उठाववाल्यांना अन्नपाणी वेळच्या वेळी पुरवीत. त्यांच्या सेनानायिकेचे नाव अजीजन !!

तेवढ्यांत २३ जून उगवली. प्लासीच्या लढाईची शंभर वर्षे आज भरली! बंगालचा नबाब सिराजद्दौला याचा पराभव करून इंग्रजांनी तलवारीच्या जोरावर १७५७ साली आपल्या तख्ताचा पाया घातला. तेव्हा इंग्रजी राज्याची शंभरी आजच पुरी करावी, अशा इषिमीने उठाववाले हल्ला करीत होते. घेऱ्यातील इंग्रजानांही त्या दिवसाची पक्की आठवण होती. आज तरी आपण शेवटचा रक्तबिंदू सांडेपर्यंत हार खावयाचीच नाही, या जिद्दीने तेही लढले. पराक्रमाची शर्थ झाली. पण त्या संगरतांडवात विजयश्री कोणाच्याच हाती आली नाही.

तथापि अन्न नाही, पाणी नाही अशी अवस्था किती दिवस निभणार? तेव्हा नाईलाजाने २५ जून रोजी व्हीलर उर्फ होलासाहेबाने घेऱ्यावर पांढरे निशाण फडकावून शरणाई दिली. २६ जूनच्या सकाळी दोन्ही पक्षांची सलोख्यासाठी बैठक बसली. इंग्रजांतर्फे मूर, व्हिटलिंग व रोशे हे होते. नानासाहेब पेशव्यांचे तर्फे अजिमुल्लाखाँ व

ज्वालाप्रसाद होते. इंग्रजांनी खजिना, किल्ले व्यवस्था, तोफा वगैरे सर्व नानांच्या स्वाधीन करावे. प्रत्येक इंग्रजाने एक एक बंदूक व साठ गोळ्या आपल्या सुखरूपतेची तरतूद म्हणून बरोबर घेऊन चालते व्हावे. त्यांना गंगापार जाण्यासाठी नावांची व्यवस्था नानांनी करावी व इंग्रजांनी प्रयाग गाठावे, असा निर्णय घेण्यात आला.

⌘ ⌘

## १९. सत्तीचौऱ्यावरील चमत्कार

अजीमुल्लाखाँने नानासाहेब पेशव्यांस सलोख्याच्या शर्ती कळविल्या. नानांनी व्हीलरला कळविले की चाळीस नावा तयार आहेत. रात्रीच्या रात्रीच इंग्रजांनी प्रयागास प्रयाण करावे!

व्हीलरने ते मान्य केले नाही. रात्रीच्या अंधकारात इंग्रजांनी प्रवास करणे त्यास रुचले नाही. दुसरे दिवशी सकाळी रवाना व्हावे म्हणून नानांचे गुरू टॉड यांचे वजन व्हीलरने नानांवर टाकले. नानांनी टॉडला सांगितले की- 'रात्रीच्या अंधारापेक्षाही लोकक्षोभाची आग इंग्रजांना दिवसाढवळ्या जाचेल! मलाही ती आवरण्यासारखी नाही. तेव्हा माझा सल्ला ऐकावा.' व्हीलरला ते पटेना. तेव्हा टॉड्च म्हणाला - 'ज्याचे करायला जावे बरे; तोच जर म्हणतो माझेच खरे, तर आपण तरी काय करणार ?'

प्रयाग इंग्रजांच्या ताब्यात होते, पण ते क्रांतिकारकांपासून घेताना इंग्रजांनी जे अत्याचार केले होते, त्यांचा सूड लोक घेऊ पाहात होते. क्रांतिकारकांचा नेता लियाकतअली कानपूरला येऊन पोहोचला होता. २६ जून रोजी ज्वालाप्रसाद प्रभृती नानांच्या लोकांनी घेऱ्यातील इंग्रजांचे संरक्षण केले. तीन इंग्रजांनी हत्तीवरून जाऊन गंगेतील नावांचे निरीक्षण केले. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून मुलाबाळांकरता तट्ट्या लावून नांवामध्ये सावली करण्याची त्यांची सूचना नानांच्या लोकांनी ताबडतोब अंमलात आणली.

जून २७ रोजी सकाळी प्रथम घायाळ, जखमी, स्त्रिया व मुले हत्तीवरून आणि पालख्यांतून नावेवर पोचविण्यात आली. बाकी सर्व

मंडळी पायीपायीच नावांवर जाऊन बसली. सौ. व्हीलर आपल्या दोन मुलींसह हत्तीवर बसून नावेत गेल्या.

इंग्रजांनी कानपूर मोकळे केले. नावा चालू झाल्या. घाटातील हरदेव मंदिराजवळ तात्या टोपे, अजीमुल्ला खाँ, टीकासिंह उभे होते. त्यांनी निरोप दिला. सत्तीचौराघाटाजवळ नावा आल्या. आणि? कोणासही कल्पना नव्हती- एकदम बिगुल वाजला. नावाडी घाबरून गेले. त्यांनी नावेतून उड्याच टाकल्या! कर्नल माब्रे टॉमसन् याने आपल्या नावेतूनच पळून जाणाऱ्या नावाड्यांवर गोळ्या झाडल्या! काशी व प्रयाग येथे अंगावर काटे उभे राहावेत असे जे अत्याचार केले होते, त्यांची ताजी आठवण असणारे क्रांतिकारक सत्तीचौराघाटावर जमले होते. त्यांचा तोल आता सुटला!! त्यांनी इंग्रजांवर गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. घोडेस्वारांनी गंगेत घोडे घालून इंग्रजांवर हल्ला केला. ओठावरचा जार न वाळलेल्या मुलांसह अनेक आया गंगामाईच्या पोटात उड्या मारून गडप झाल्या. गोळीबारातून बचावलेल्या मर्दांची गर्दन घोडेस्वारांनी सामना करून गंगार्पण केली. गंगामातेचे हिमधवल पाणी रक्तरंजित झाले!!!

नाना सबादा-कोठीत होते. त्यांना ही वार्ता कळताच, त्यांनी आपल्या अश्रूंनी मृतांचे तर्पण केले. परिणामत: सव्वाशे बायका-मुलांचे प्राण वाचले. नानांनी त्यांची निगा केली. त्या हत्याकाडांतून एक नाव निसटली होती तीत टॉम्सन्, सूर, डेलीफास असे मातबर इंग्रज होते. त्यांच्यावर गंगेच्या दोन्ही तटांवरून गोळीबार चुकला नव्हता. मूरला नेमकी गोळी लागून तो तत्काल ख्रिस्तवासी झालाच होता. या नावेच्या मागे क्रांतिकारकांनी एक नाव घातली होती. दोन्ही नावांतून एकमेकींवर गोळ्या झडत होत्या. दोन्हीकडे नुकसानीच नुकसानी झाली होती, दुसरा दिवस उगवला, तेव्हा क्रांतिकारकांना कळले की आपली नाव उथळ पाण्यात अडकून पडली आहे!

तरीही, इतक्यात क्रांतिकारकांची आणखी एक नाव तेथे येऊन थडकली. आता इंग्रज दोन्ही बाजूंनी संकटात सापडले. गंगेच्या दोन्ही किनाऱ्यांवर लोकांची गर्दी उसळली होती, म्हणून लांबून त्यांचा मारा

तर जवळून नावांतील क्रांतिकारकांचा मारा! तेव्हा इंग्रजांपैकी चौदाजणांची एक तुकडी हाती बंदुका सरसावून किनाऱ्यावरील गर्दीशी सामना करू लागली. दुसरी तुकडी नावेवरूनच मागून येणाऱ्या क्रांतिकारकांच्या नावेतील मंडळींशी सामना देऊ लागली. किनाऱ्यावरील लोकांची गर्दी गोळीबाराने पांगवून माब्रे टॉम्सन् प्रभृती परतले. पण त्यांना स्वतःची नावच सापडेना!! मग त्यांची तारांबळ काय विचारावी? त्यांची नाव क्रांतिकारकांनी ताब्यात घेऊन सुमारे ऐंशी स्त्रीमुलांसह कानपूरकडे परतविली होती व तेथे त्या मानवी प्राण्यांची व्यवस्था नानांनी आपुलकीने केली.

माब्रे टॉम्सनच्या तुकडीवर दोंदियाखरच्या रावराजा रामबक्षसिंहाने हल्ला चढविला. तेव्हा त्यांना पळता भुई थोडी झाली! तीन मैल अंतर तोडल्यावर घामाघूम झालेल्या त्या मंडळींनी एका मंदिरात आश्रय घेतला. तेथे गार पाणी पिऊन स्वस्थ बसणार, इतक्यात त्या मंदिराला रामबक्षसिंहाच्या लोकांनी चोहोबाजूंनी घेरले. चार इंग्रज देवळाच्या तोंडाशी संगिनी घेऊन पहारा करू लागले. देवळात शिरण्याचा प्रयत्न करील, तो पहारेकऱ्यांच्या गोळीने देवाघरी पावता होऊ लागला! लोकांनी मग देवळाच्या तोंडासमोर सुकी लाकडे रास करून पेटवली आणि त्या आगडोंबात दारूचा वर्षाव केला! मग मात्र इंग्रजांना मंदिरात काळ काढणे कठीण होऊन बसले! तेव्हा जिवावर उदार होऊन ते मंदिराच्या बाहेर पडले आणि लोकांची नजर चुकवून गंगा किनारी दाखल झाले. चौदापैकी ते सातच भरले. पण त्यांच्यापैकीही तिघांना किनाऱ्यावरील समाजाच्या गोळीबाराला बळी पडावे लागलेच! बाकी चौघांनी गंगेतच उड्या टाकल्या. दूरवर पोहून गेल्यावर मौरवाचे तालुकदार दिग्विजयसिंह यांनी त्यास आश्रय दिला. क्रांतिकारकांचा निरोप आला की टॉम्सन प्रभृतींना कानपूरला पाठवून द्यावे, पण दिग्विजयसिंहाने तो मानला नाही. शरण आले त्यांना मरण द्यावयाचे नाही; त्यांचा तारणहारच होऊन राहावयाचे, हे व्रत दिग्विजयसिंहाने शेवटपर्यंत पाळले.

⌘ ⌘

## २०. नानासाहेब गादीवर आले

कानपूर स्वतंत्र झाले. नानांच्या राज्याची ग्वाही फिरवण्यात आली. २७ जून १८५७ रोजी कानपूर येथील दोन क्रमांकाची घोडेस्वारांची पलटण, त्रेपन्न व छपन्न क्रमांकाच्या पायदळ पलटणी, पहिला व दुसरा क्रमांक सांगणाऱ्या अयोध्येच्या स्वदेशी सेना, आजमगड येथून आलेली सतरा क्रमांकाची पलटण यांनी आणखी पाच मातबर पलटणीसह आणि नौगावच्या अठरा क्रमांकाच्या तोफखान्यासह नानाला एकवीस तोफांची लष्करी सलामी दिली! कानपूर परिवारातील जमीनदार, दरकदार मंडळीही नानांचे राज्य मानू लागली. बाळासाहेब-रावसाहेबांना सतरा सतरा तोफांच्या तर टीकासिंह व तात्या टोपे यांना अकरा अकरा तोफांच्या सलाम्या झाल्या. एक लाख रुपये लष्करात वाटण्यात आले.

नहर शेजारील मैदानावर २८ जानेवारी रोजी दरबार झाला. त्यात तोफखान्यावरील सैनिकांचा विशेष गौरव करण्यात आला. दरबाराच्या आरंभी बादशहा बहादूरखान यांचे जयजयकारात एकशेएक तोफांची सलामी झाली व नानाला त्यांचे पंतप्रतिनिधी म्हणून सन्मानिण्यात आले. त्यानंतर नानांची जंगी मिरवणूक झाली. मिरवणुकीच्या वाटेवर ठिकठिकाणी पानसुपारी होऊन नानांचा गौरव झाला. नानावर पुष्पवृष्टी तर इतक्या ठिकाणी झाली की फुले जणू आकाशातूनच पडत होती !!

ब्रह्मावर्तास नानांच्या राज्यारोहणाची तयारी झाली. ३० जूनचा मुहूर्त होता. सायंकाळी पाच वाजता तो समारंभ संपन्न झाला. वेदघोषांनी वातावरण पवित्र होते. नानांच्या कपाळी राजतिलक लोकमान्यतेने लागला. दक्षिणेतील पदभ्रष्ट पेशवा उत्तरेत सिद्धपद झाला. या वेळी नानांनी आपल्या साहाय्यक स्नेह्यांना आणि सैनिकांना मुक्त हस्ताने बक्षिसे दिली. काही कर्तबगारांना नानांनी सोन्याची कडी घातली. अजीमुल्लाखाँला नहरचा महसूलच बहाल केला.

राज्यारोहणानंतर नानांची ब्रह्मावर्तात स्वारी फिरली. हजार

घोडेस्वार आणि पायदळ स्वारीच्या बिनीवर होते. चौघडा, ताशे, नगारे, शिंगे इत्यादी मंगल वाद्ये वाजत होती. या लोकयात्रेस अधिकाधिक जनसंमर्द लोटला गेला. चोपदारांच्या ललकाऱ्या आणि लोकांचे जयजयकार होतच होते. वंदनहार, तोरणे, कमानी यांनी ब्रह्मावर्त नटून राहिले होते. नागरिक फुले, गुलाल, बुक्का आनंदाने उधळीतच होते. नानांच्या पालखीभोवती बाळासाहेब व रावसाहेब पेशवे हत्तीवर अंबारीत विराजमान होतें.

⌘ ⌘

## २१. अशुभाचे निराकरण



एक आठवडाभर इंग्रजांना हाकलण्याच्या तयारीत ब्रह्मावर्ताच्या राज्यारोहणामुळे शिथिलता आली. त्याचा फायदा इंग्रजांनी उचलण्यास कमी केले नाही. का करू नये? कानपुरातील मुसलमानांच्या कानात पेशव्यांच्या विरुद्ध विष पेरले गेले. कानपूरचा प्रमुख कारभारी बाबा भट कमालीचा शिस्तखोर होता. एक दिवस

गोहत्या करणारा एक मुसलमान त्याच्यापुढे उभा केला असता, त्याचे दोन्ही हात छाटून टाकण्याचा हुकूम बाबा भटाने केला! झाले! मुसलमान खवळलेच!! नानांचे शासन कानपुरातून उठवून 'नन्हे नवाबां'चें शासन कानपुरातून करावयाचा निश्चय मुसलमानांनी केला. कानपूरच्या घोडदळात मुसलमान अधिकारीच प्रबळ होते. इंग्रजांना हाकलून देण्याच्या क्रांतिकार्याला हिंदु-मुस्लिम तेढीचे असे गालबोट लागले.

अयोध्येचे नवाब नसिरुद्दीन हैदरचे मंत्री मनमुद्दौला यांचे चिरंजीव म्हणजे 'नन्हे नबाब' महंमद अल्लीखाँ आणि दुल्हा खाँ अशी त्या दोन नन्हे नबाबांची नावे होती. कानपूरचा मुसलमान समाज त्या कोट्यधीशांना आपले नेते मानू लागला. नन्हे नबाब वीर पुरुषच होते. इंग्रजांच्या घेऱ्यावर हल्ला करणाऱ्या घोडेस्वारांच्या पलटणीची जबाबदारी त्यांनीच सांभाळली होती. त्यांच्या कुशल नेमबाजीबद्दल नानास मोठेच कौतुक होते. इंग्रजांच्या पराभवानंतर कानपूरचे कारभारी नन्हे नबाबांनाच करावयाचे नानांनी ठरविले होते.

कानपुरातील हिंदु-मुसलमान तेढीची कुणकुण लागताच नाना कानपुरास आले. मूसलमान नेत्यांची त्यांनी गाठ घेतली. त्यांची समजूत घातली. मुसलमानावर अन्याय चुकूनसुद्धा होणार नाही, असे आश्वासन नानांनी दिले आणि हिंदुमुस्लिम संघर्ष थोपविला.

⌘ ⌘

## २२. नवी विटी, नवे राज्य!

इंग्रजी सत्तेची समाप्ती करताना बजबजपुरी माजली होती. तिला आळा घालून नानांनी आता आपली नवी राज्यव्यवस्था स्थापली. आपल्याजवळील प्रत्येक गुणी माणसाला त्याच्या पात्रतासिद्धीप्रमाणे नानांनी काम दिले. त्यांनी तात्या टोपे यांना आपला पंतप्रतिनिधीच केले. नानांच्या मुख्य केंद्रीय कार्यालयाची जबाबदारी मुनशी म्हणून चंद्रिकाप्रसादाकडे होती. नानांचा भाऊ बाबा भट चतुर, विद्वान् आणि संघटनाकुशल होता. त्याच्याकडे शासनाधिकाऱ्याचे नियंत्रण

सोपविण्यात आले. फौजदारी आणि महसूली खाती खास बाबा भटाकडेच होती. अजीमुल्लाखाँ यास कानपूरचे कलेक्टर करण्यात येऊन, ज्वालाप्रसादला कलेक्टरचा सहाय्यक नेमण्यात आले. नानासाहेबांचे दुसरे बन्धू बाळासाहेब यांच्याकडे सर्व अर्थखाते सोपविण्यात आले.

इंग्रजी सैन्यातून बाहेर पडलेले सैनिक, जमीनदारांची माणसे आणि राजकीय उठाववाले अशा लढावू वृत्तीच्या माणसांची नानांकडील गणना वीस हजारांपेक्षा अधिक होती. त्यांना शिस्त लावण्यात आली. पायदळाच्या व घोडदळाच्या प्रत्येक तुकडीवर एकेक इंग्रजी कर्नलच्या तोडीचा हुकमतदार नेमण्यात आला. त्याच्या हाताखाली मेजरच्या तोडीचे दोन दोन अधिकारी नियुक्त करण्यात आले. प्रत्येक सेनेत एकेक क्वार्टर मास्टरही राही. त्यांच्याकडे शस्त्रागार व दारूखाना यांचा हिशोबही सोपविण्यात आला. मुलकी न्यायालये, लष्करी न्यायालये आणि फौजदारी न्यायालयेही निर्माण करण्यात येऊन त्यांच्या न्यायावर शिक्कामोर्तब करण्याचीही व्यवस्था नीट लावण्यात आली.

सेनांचे संघटन शिस्तशीर बांधण्याचे काम नानांनी ज्वालाप्रसादाकडे सुपूर्त केले. सेनापतीचे अधिकार त्यास देऊन सुभेदार दसगंजनसिंह आणि गंगादीन यांना कर्नलचे अधिकार प्राप्त झाले. सैन्याला कवाईत शिकविण्याची आणि युद्ध चालविण्याची शास्त्रशुद्ध दीक्षा मिळत राहावी म्हणून ही खबरदारी घेण्यात आली. कर्नलचे मासिक वेतन ५०० रुपये व भत्ता २५० रुपये ठरविण्यात आला. त्याच मानाने इतरही अधिकाऱ्यांचे वेतनभत्ते मुक्रर करण्यात आले. युद्धामध्ये कामाला येतील त्यांच्या एका पिढीच्या वारसाला पेन्शनही मिळेल अशीही घोषणा देण्यात आली.

समाजाचे स्वास्थ्य व जीवन शांततेने चालावे म्हणून एक कोतवाल-चावडी आणि आरक्षकांची कचेरीही खोलण्यात आली. प्रारंभी काजी बसीउद्दीन यास कोतवालीचे अधिकार मिळाले. मागाहून लोकमतास मान देऊन नानांनी हुलासिंग यास कोतवाली

दिली. जरूर तेवढ्या आरक्षक चौक्यांचीही व्यवस्था होत गेली.

गावकामगारापासून सगळ्याच कारभार कुशलांना शिस्तीचे नियम कडक रीतीने पाळण्याचे बंधन कोणत्याही कारणासाठी शिथिल व्हावयाचेच नाही, शीलवन्त अधिकारी लोकसेवाभिमुख राहिलेच पाहिजेत असा दण्डकच ठेवण्यात आला. नागरिकांची जी संपत्ती लोक़ांच्या हाती लागली असेल ती त्यांनी स्वतंत्र सरकारी खजिन्यात भरावी, असे फर्मानही काढण्यात आले.

क्रांतिकारकांची शासन व्यवस्था फारच व्यापक व सुसंघटित होती, अशी कर्नल विल्यम्स आणि नानकचंद यांच्या दैनंदिन्यांत नोंदही आहे. शासनसमर्थतेच्या दृष्टीने नानासाहेब पेशव्यांनी आभा धनुर्धारी यास बक्षी; शिवचरण यास बंदीखाना-बंदोबस्ती; विलासराय यास शिरस्तेदार; लालचंद कायस्थ यास रोबकारीनवीस; भगवानदीन कायस्थ यास लेखापरीक्षक; तुळसीराम कायस्थ यास सियाहनवीस लक्ष्मणप्रसाद कायस्थ यास आबकारी बंदोबस्ती आणि मुहम्मद हबीब, रहीमबक्ष व गुलाम रसूल यास मुहरीर, अशा नेमणुका केल्या.

दक्षिण हिंदुस्थानातही सोमदेव शर्मामार्फत नानासाहेब पेशव्यांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला की, 'हिंदु व मुसलमान यांस हे स्पष्टपणे सांगणे जरूर आहे की इंग्रजांनी येथे आपणात घुसून आपल्यापैकी प्रत्येकाला कुचकामी करण्याचे कार्य केले आहे, तेव्हा ज्या कोणाला काही कर्तृत्व करावेसे वाटत असेल, त्यांनी आपल्या लोकांची संघटना करून या (इंग्रज) लोकांना परलोकवासी केले पाहिजे. त्यांचे (इंग्रजांचे) नोकर, त्यांची सेना, त्यांच्या राज्यकारभारातील अंमलदार, आपणास सहकार देणार नसतील तर त्यांचीही इंग्रजासारखीच वाट लावली पाहिजे. हे सर्व साधतांना व आपण राज्यकारभार चालवितांना रयतेला कसलाही जाच होताच कामा नये. जमीनदारांनी आपला चौथाई वसूल रयतेला एकदम माफ करणे आवश्यक आहे. इंग्रजांच्या नोकरापैकी जे आम्हास साहाय्यक होतील त्यांना इंग्रजांचे वेळेपेक्षा दुप्पट वेतन मिळावे. जमीनदाराजवळ तेवढी तरतूद नसेल तर थोडेच दिवसांत त्यांना उत्तरेकडून पुरवठा होईल.

रयतेला कष्ट देणाऱ्यांच्यावर कडक देखरेख राखण्यात यावी. इंग्रजास जिवंत पकडून आणील अगर त्यास नेस्तनाबूद करील त्यास पाचशे रुपयांपासून पन्नास हजार रुपयांपर्यंत कामाच्या पात्रतासिद्धीप्रमाणे बक्षिसे देण्यात येतील. जो भारतीय स्वातंत्र्याशी दगाबाजी करील त्यास बारा वर्षे सक्त मजुरीपासून देहान्तापर्यंत यथान्याय सजा करण्यात येईल.'

शासनव्यवस्थेच्या सामान्यपणे अशा स्वरूपामुळे दक्षिण-उत्तर हिंदुस्थानचे लोक नानांच्या राज्यावर सुतराम खूष होते. प्रयाग, फत्तेपूर, हमीदपूर, इटावा, सितापूर, अयोध्या, बांदा, कर्वी, बुंदेलखंड, झांशी, ग्वाल्हेर, इतकेच नव्हे तर पुणे, नरगुंद; सातारा, कोल्हापूर येथे नानांच्या क्रांतीचे आनंदभराने सक्रिय स्वागत झाले. महाराष्ट्रातील वृत्तपत्रात, प्रसिद्ध होऊन चुकले की येत्या नवरात्रात नानासाहेब पेशवे स्वतः पुण्यात येतील आणि दसऱ्याला महाराष्ट्राचा व दक्षिणचा राज्यकारभार आपल्या हाती घेतील.

⌘ ⌘

## २३. तीर्थक्षेत्रे रक्तक्षेत्रे झाली!!

मेरठ, दिल्ली वगैरे ठिकाणच्या क्रांतिकारक घटनांच्या वार्तांनी कलकत्ता चुळबूळू लागला होता. पण त्यानंतर दूरदूरहूनही इंग्रजविरोधी उठावाच्या बातम्या येऊ लागल्या, तसे गव्हर्नरजनरल लॉर्ड कॅनिंग हादरलेच! दिल्लीपासून बंगालपर्यंतची आठशे मैलांची भूमी इंग्रजांच्या नावाने असली तरी कबजात नव्हतीच !

इंग्रजांचे सैन दोन लक्ष अडतीस हजारांचे असले तरी त्यांत ब्रिटिश लढवय्ये फक्त तेरा हजारच होते. कलकत्त्याजवळ फक्त दोन सैन्येच होती. त्रेपन्न क्रमांकाची पलटण फोर्ट विल्यम्‌मध्ये होती आणि चौऱ्याऐंशी क्रमांकाची पलटण नुकतीच रंगूनहून येऊन चिन्सुरा येथे दाखल झाली होती. आग्रा आणि कलकत्ता यांच्यां दरम्यान दानापूरला तेवढे गोरे सैन्य होते.

दिल्लीपासून बिहारपर्यंत तीन दिशांनी आक्रमण करण्याची योजना कॅनिंगने आखली. इतिहासाची किल्लीच दिल्ली होय हे

कॅनिंग चांगले जाणत होता, म्हणून सिमल्यास असलेल्या सेनाप्रमुख एन्‌सनला त्याने प्रोत्साहिले की, पंजाबमधील सारी लष्करी शक्ती एकवटून दिल्लीचा कब्जा करावा, बुन्देलखंड व त्याचा परिवार ताब्यात घेण्याबद्दल मुंबईचा गव्हर्नर एल्फिन्स्टन यास कॅनिंगने आवाहन केले. इराणहून नुकतीच मुंबईस आलेली सेना रवाना होऊन चंदेरी, झांशी आदी मध्यभारताच्या ठाण्यावर हल्ले चढविण्याची व्यवस्था झाली. महू येथील सर ह्यू रोजच्या सैनापत्याखालील सेना साहाय्यक झाली. दक्षिणेकडून होणाऱ्या या हल्ल्याबरोबर पूर्वेकडील हल्ला करण्यासाठी कॅनिंगने ब्रह्मदेशाहून एक पलटण आणवली. तिच्या सहाय्यार्थ मद्रासहून दोन पलटणी आल्या.

त्याचबरोबर चीनकडे जाणारी इंग्रजी सेनाही कॅनिंगने मध्येच परत फिरवून कलकत्त्यास बोलवून घेतली. या सगळ्या तिहेरी हल्ल्याचे नेतृत्व कॅनिंगने कर्नल नीलकडे सोपविले.

कलकत्त्याहून क्रूरकर्मा नील एक हजार गोरे सैन्य घेऊन निघाला. काशीस पोहोचल्यावर त्याने सर्व भारतीय सैनिक बराकीबाहेर बोलावून घेतले आणि त्यांना गोळ्याच घातल्या! जे पळून झोपड्यांतून लपले, त्यांना झोपड्यांसह जाळण्यात आले! जे भारतीय रस्त्यावर येत त्यांना सरळ फाशी चढविण्यात आले!! झाडाला टांगूनही कित्येकांस फाशी झाली. काशीला फाशींचा असा धुमाकूळ घालून नील प्रयागकडे गेला.

प्रयागमध्ये ११ जूनला नीलने जिकडेतिकडे क्रांतीचे झेंडे फडकलेले पाहिले. नीलची सूडभावना उफाळली. काळा माणूस दृष्टीस पडला की गोरा सैनिक त्याला गोळीच घाली. आसपासच्या खेड्यांत उठाववाले लपले आहेत, असे नीलला कळले की ती खेडीच नीलने जाळली. एका इंग्रज व्यापाऱ्यास उठाववाल्यांची यादी करावयास नीलने फर्माविले. तेव्हा त्या व्यापाऱ्याने आपल्या भारतीय सावकारांचीच नावे प्रथम घातली. ते सगळे फाशी गेले. प्रयागच्या चौक मोहोल्ल्यातील लिंबाच्या झाडावर आठशेहून अधिक निरपराधी भारतीय स्वर्गी गेले.

काशी व प्रयाग येथे लष्करी कायदा पुकारण्यात आला. म्हाताऱ्या-पोऱ्यांसुद्धा उठाववाल्यांसमवेत यमसदनाला पाठविण्यात आल्या. तीन महिनेपर्यंत आठ गाड्या रात्रंदिवस मुडदे हलविण्याचे काम करीत होत्या. सहा हजार लोक फाशी गेले, असा स्वत: लॉर्ड कॅनिंगचाच हिशोब आहे.

नीलच्या सैनिकशक्तीपुढे आणि मृत्युदण्डापुढे उठाववाले टिकाव धरू शकले नाहीत. उठाववाल्यांचा नेटका नेता लियाकतअल्लीही कानपुरास पळून गेला.

अलाहाबादमध्ये स्वत: डेरे देऊन ३० जून रोजी नीलने मेजर रेनाड यास अखेर कानपूरवर चाल करण्यास पाठविले. चारशे गोरे, तीस शीख आणि इतर एकशेवीस बहाद्दुरांची ही तुकडी होती. उठाववाल्यांनी जी गावे कब्जात घेतली आहेत तेथून त्यांचा नायनाटच करण्याबद्दल नीलने मेजर रेनाडला फर्माविले होते. उठाववाल्यांच्या नेत्यांना आणि त्यातही फत्तेहपूरच्या नेत्यांना फाशीवरच लटकावण्यास नीलने बजावले होते.

रेनाड हा नीलचा यमदूतच होता. चौदाशे गोरे शिपाई, साठ शीख आणि आठ तोफा घेऊन तो यमदूत फत्तेहपूर शहरात शिरला. क्वार्टर मास्टर टायलर उठाववाल्यांच्या टेहळणीसाठी घोडेस्वार घेऊन दौडू लागला. त्याचा पिच्छा उठाववाल्यांनी चांगलाच पुरवला! ब्रिगेडियर ज्वालाप्रसाद इंग्रजी सैन्याशी भिडला. दोन्ही सैन्यांत गोळागोळी सुरू झाली!! तीनशे वार पल्ल्याच्या तोफा इंग्रजाजवळ होत्या. उठाववाल्यांजवळ त्यामानाने काय होते? म्हणून ज्वालाप्रसादने घोडेस्वारांची पलटणच इंग्रजावर घालावयाचे ठरविले. इंग्रजांचा साथी नजीबखाँ घोडदळांच्या सामन्यात कामास आला. नंतर झालेल्या गोळागोळीत उठाववाल्यांचे दीडशे लोक मारले गेले. त्यांच्या बारा तोफा इंग्रजांच्या हाती लागल्या. खूप मातबर लढाई झल्यावर फत्तेपुरात गोरे सैनिक घुसले. त्यांनी लूटमार केली आणि शेवटी सर्व शहरच उद्ध्वस्त केले!!

कानपुरास ही बातमी कळताच नानासाहेब पेशव्यांनी आपला

भाऊ बाळासाहेब यास इंग्रजांबरोबर दोन हात करण्यास पाठविले. फत्तेहपूरच्या पश्चिमेस सव्वीस मैलांवर बाळासाहेबांनी आपले मोर्चे औंग गावाजवळ बांधले. आपल्या सैन्याचा एक पडाव बाळासाहेबांनी अशा ठिकाणी गंगेत घातला की तेथून शत्रूला नेमके गारद करता यावे! दोन तोफा आणि बगीच्याच्या दोन भिंती क्रांतिकारक सैन्याला संरक्षणासाठी लाभल्या होत्या.

हेवलॉक आणि बाळासाहेब यांच्या घोडेस्वारांचा सरळ सरळ सामना १५ जुलैस सुरू झाला. इंग्रजांची रसद लुटण्याचा बाळासाहेबांनी डाव टाकला. दोन तीन घंटे घनचक्कर युद्ध झाले. उठाववाल्यांनी रणकौशल्याची शर्थ केली. पण एन्फील्ड बंदुकांच्या माऱ्यापुढे त्यांना माघार खावी लागली.

⌘ ⌘

## २४. पाण्डू नदीवरील नामी विजय

पावसाळा सुरू झाला. पाण्डू नदीचे गढूळ पाणी दुथडी भरून चालले होते. नदी पार करावयास पूल हे एकच साधन होते. बाळासाहेबांनी आपले सैन्य पांडू नदीच्या पलीकडे हटवून दबा धरून बसविले. इंग्रजी सेना असहाय्य करण्यासाठी ऐनजिनसी पूल उडविण्याचा त्यांनी बेत केला.

हेवलॉकला या काव्याचा वास आला. पुलाच्या संरक्षणार्थ त्याने इंग्रजी सैन्य पुढे आणले. इंग्रजी सेनेने अशा ठिकाणी आपल्या पल्लेदार तोफा डागल्या की तेथून बाळासाहेबांच्या सैन्याच्या पिछाडीपर्यंत गोळ्यांचा मारा व्हावा. गोळागोळी सुरू झाली. क्रांतिकारकांनी पुलास सुरुंग लावले. पुलाच्या बुरूज भिंती कोसळल्या. पण पूल ठामपणे तसाच राहिला. याच सुमारास बाळासाहेब पेशव्यांच्या खांद्यावर गोळी टिचली गेली. त्यांनी घायाळ होऊन कानपुराकडे कूच केले. इकडे रेनाडच्या जांघेत गोळी बसली आणि दोन दिवसांतच रेनाड आटोपला!! इंग्रजांचे पुष्कळ सैनिक कामी आले, पण क्रांतिकारकांच्या तीन तोफा त्यांच्या हाती लागल्या!

बाळासाहेब नानांसमोर गेले. घडली घटना नानांना समजली. परिस्थिती आवाक्याबाहेर जात चालली म्हणून नानांनी आपल्या मंत्रिमंडळाची बैठक घेतली. फत्तेगड, ब्रह्मावर्त की कानपूर यापैकी कोठे आपली शक्ती इंगजाविरुद्ध केंद्रित करावी याबद्दल हमरीतुमरी झाली. शेवटी कानपूरलाच तो मान मिळाला.

⌘ ⌘

## २५. अहिरवाँ येथील अखेरी

आता लढाईची सूत्रे नानांनीच हाती घेतली. तात्या टोपे व ज्वालाप्रसाद यांस जय्यत तयारीची आज्ञा झाली. पाच हजार सैनिक व सात तोफा घेऊन इंग्रजाशी सामना करावयास ते कानपूरहून निघाले. या सैन्याचे पाडाव कानपूरपासून सात मैलांवर बसलेल्या अहिरवाँ या गावातून घालण्यात आले. लढाईच्या दृष्टीने हे गाव मोक्याचे होते. कानपूर छावणीपासून ग्रँडट्रंक रोडला येऊन मिळणाऱ्या सडकेच्या तोंडाशी मोर्चे बांधण्यात आले. येथे डाव्या बाजूस उंच टेकड्या होत्या, त्यावर चार तोफा सज्ज करण्यात आल्या. उजवीकडे व मध्यभागी दोन तोफा सज्ज ठेवण्यात आल्या. तोफखान्याच्या मागे पायदळ तयार ठेवण्यात आले. सगळ्यांच्या मागे घोडदळ सज्ज होते. सैन्याचा एकंदर व्यूह चंद्राकार होता. तात्या टोपेंची ही कुशलता.

हेवलॉकने हा व्यूह पाहिला, तेव्हा तो आश्चर्याने थक्कच झाला. हेवलॉकने काही घोडेस्वार रवाना करून त्या व्यूहाची ताकद टेहळली!! आसपासच्या गावांतही हेर हिंडवून तेथील भौगोलिक खंबिरीचा कयास घेतला.

नानाही घोड्यावर स्वार होऊन व्यूहाचे भक्कमपण पडताळून गेले. सामन्यास सरळ येणाऱ्या इंग्रजी सैन्यावर तीनही बाजूंनी हल्ला झाला तर यम दरबाराशिवाय त्याला गत्यंतरच नव्हते. इंग्रजी सेना पुढे सरकू लागली. तिच्यावर गोळीबार सुरू झाला. इंग्रजांची सेना खूपच दगावली. हेवलॉकने आपला मुलगा मेजर हेवलॉकला पुढे

चाल करून क्रांतिकारकांच्या तोफांचा कब्जा करण्यास फर्मांविले. गोळीबाराचा माराच मारा होत असतानाही चिरंजीवांनी डाव्या बाजूच्या मोर्चेबंदीतील तोफा हस्तगत केल्या! हेवलॉकने आपल्या सैन्यास आज्ञा दिली की क्रांतिकारकांच्या उजव्या बाजूकडील मोर्चे बंदीशेजारील बागांतून घुसून डावीकडील मोर्चेबंदीवर तुटून पडलेच पाहिजे. तिकडील तोफा लवकरच बंद झाल्या. कारण एकदम इंग्रजी सैन्य निकराने च त्यावर तुटून पडले होते. क्रांतिकारकांचा दम उखडला गेला!! नानांचा व्यूह विसकटला. हाती असलेला विजय हातून निसटला!!!

⌘ ⌘

## २६. नाव गेली! नाव गेले!



आता नानांनाच दम निघेना. त्यांनीच ब्रह्मावर्ताकडे सूंबाल्या केले. कारण कानपूरमधील सुरक्षितता कोलमडली होती. क्रांतिकारकांनी कानपूरमधील शस्त्रागार उडवून लावले कारण

इंग्रजांना त्यातील सामग्री मिळू नये. ब्रह्मावर्ताला नाना पोहोचण्यापूर्वीच नानांच्या पराभवाची वार्ता तेथे पोहोचली होती. 'अति विषमकाली कोण कामास येतो?' ब्रह्मावर्तही मग नानांस सुरक्षित वाटेना. नानांनी आपल्या वाड्यातील जडजवाहीर आणि मोलवान् जेवढे होते ते सर्व घेऊन आपल्या परिवारासह नाना तीन मैलांवरील पटकापूरच्या घाटावर उतरले. पेशवा परिवाराला निरोप देण्यासाठी गंगाघाटावर तुफान गर्दी लोटली होती. पेशवे परिवार नावेत बसला. स्वत: बाळासाहेब व रावसाहेब नाव वल्हवत होते. नानांनी नावेतील उजेडही बंद केला. घाटावरील लोक समजले की नाव बुडाली!! रात्रीच पेशवेपरिवार गंगापार होऊन अयोध्याप्रांती गेला.तो गंगेस मूल्यवान वस्तू अर्पण करूनच गेला. मोठ्या आदराने तेथील लोकांनी हत्तीवरून पेशवेपरिवारास फत्तेपूरचे तालुकदार भूपालसिंहाच्या गढीवर पोहोचविले.

⌘ ⌘

## २७. राक्षसी महत्त्वाकांक्षा

नील आणि रेनाड यांनी उभारलेल्या यमदरबारातील खाटिकखान्याची बातमी आता कानपुरातील घरोघर पोहोचली होती. त्यामुळे कानपूरची जनता इंग्रजांचा सूड घेतलाच पाहिजे, या भावनेने वेडी झाली होती. कानपूर येथील बिब्बीघरात ज्या युरोपीय महिला स्थानबद्ध होत्या, त्यांची व्यवस्था पाहात होती बेगम हुसेनी खानून. ही इंग्रजांची कट्टर शत्रू होती. तिने पहारेकऱ्यांना सांगितले की बिब्बीघरातील युरोपीय महिलांना त्यांच्या बालबच्च्यांसह कंठस्नान घाला. पहारेकऱ्यांनी इन्कार केला. 'हे काम पशूनाही शोभणार नाही.' असे त्यांनी उत्तर दिले. बेगमने चार पांच कसाई बोलावून त्यांच्याकडून आपली राक्षसी महत्त्वाकांक्षा पार पाडली. दुसरे दिवशी सकाळी शेजारच्या विहिरीत प्रेतांचा खच केला गेला.

⌘ ⌘

## २८. नाना 'आकाशीं-पाताळी' !!

कानपूरच्या बिब्बीघरातील हत्त्याकांडाला नानासाहेब पेशवे जबाबदार! ईस्ट इंडियाकंपनीने ही चीड घेतली. मग नील आणि रेनाड यांनी उभारलेल्या मृत्युतांडवाला नुसता लॉर्ड कॅनिंगच काय, पण ईस्ट इंडिया कंपनी का जबाबदार नाही?

अशा होत्या प्रतिक्रिया त्यावेळी भारतीय जनतेत! कारण मुहंमदअल्ली आणि ज्वालाप्रसाद यांनी फासावर लटकताना स्पष्ट बजावले होते इंग्रजांना- बिब्बी घराच्या हत्याकांडाशी नानासाहेब पेशव्याचा काही संबंध नाही! आणि तरीही नाना इंग्रजांना 'आकाशी पाताळी' दिसत होते. रडत्या मुलाला गप्प करण्याकरता, 'आला नाना' असे इंग्रज स्त्रिया दटावीत. नानाला आणि सर्वच भारतीय उठाववाल्यांना बदनाम करण्याकरता मग लंडन टाइम्सने बिब्बीघराच्या हत्त्याकांडाचे वर्णन एखाद्या रणांगणासारखे केले. बिब्बीघरात गुडघ्याइतका रक्तामांसाचा खच झाला होता व हे रक्तमांस कोणाचे? तर इंग्रजी बायकामुलांचे!! अशा वर्णनांनी इंग्रज सरकारच काय पण इंग्रज जनताही चिडली. काय वाटेल ते करून नानांची पाळेमुळे उखडलीच पाहिजेत, असा निश्चय करून प्रथम कानपूरचा कबजा करण्याच्या मार्गास इंग्रज लागले.

कानपूर शहरात इंग्रज सैनिक घुसले. पहिल्या झपाट्यात त्यांनी कमसेरियट विभागातील लुटालूट आरंभिली. तेथे सापडलेली सर्व दारू ते प्याले, पण त्यांची तहान भागली नाही. ते नंगानाच घालू लागले. त्या नंगानाचाची खुद्द हेवलॉकला इतकी भीती वाटली की वेताळांची आगच आग कानपुरात भडकेल. म्हणून त्याने गावात असलेली सारी दारू विकत आणून इंग्रज सैनिकांची बेहोषी साधली.

हेवलॉकचा अंदाज सपशेल ढासळला, कोलमडला. बेहोष झालेले इंग्रज सैनिक पिसाट नव्हे, तर पिशाच्च बनले. 'काळा आदमी' दिसला रे दिसला की त्याचा मुडदाच ते पाडू लागले. कारण प्रत्येक 'काळा आदमी' नानांचा साथी आणि उठाववालाच त्यांना भासे. म्हातारा, तरुण, बच्चा, स्त्री 'काळा आदमी' म्हणूनच बळी

घ्यावयाचा सपाटा त्यांनी चालविला. कमीत कमी दहा हजार तरी निरपराध जीव नाहक बळी पडले!! प्रत्येक मातब्बराच्या घरात घुसून तेथील लूटमार त्यांनी केली. इंग्रज सैनिकांच्या पिशाच्च-चाळ्यांनी कानपूरबाहेर लोक निघून जाऊ लागले!! काही काहींनी तर गंगापार होऊन अयोध्या प्रांतामध्ये जीव घेऊन व धरून बसण्याचे साहस केले.

जनरल हेवलॉकला चिंता पडली की कानपूरमधील हे थैमान लवकर शांत झाले नाही, तर लखनऊच्या रेसीडेन्सीच्या संरक्षणास धावावयाचें कसे? म्हणून हेवलॉकने एका 'प्रोव्होस्ट मास्टर' ची नेमणूक केली आणि त्यास फर्माविले की- कोणी सैनिक लूटमार वा हत्या करताना आढळला, तर त्याला सैनिकी पोशाखातच फाशी चढवावे!!

त्यामुळे कानपूरचा कबजा झाला. तेथे शान्ती डोकावू लागली. पण कानपूरच्या आवतीभोवतीच्या गावांत उठाववाले जोरातच होते. त्यामुळे कानपूरची शांती स्थायी करण्याकरताच, होते त्या सैन्याचा उपयोगही कदाचित् अपुरा पडावयाचा!!! तरीही त्याने मनाशी खूणगाठ बांधली होती की-

"मरणासी जो तयार ।. तोचि अरी करील ठार ।।"

⌘ ⌘

## २९. नानांचा नायनाट

फत्तेहपूरचा पूर्वीचा मामलतदार शेरर यास कानपूरचा कलेक्टर नेमण्यात आले. त्याने पुनः इंग्रजी राज्य कानपुरात प्रस्थापित झाल्याची दवंडी सगळीकडे पिटली. त्याने प्रतिष्ठित व्यक्ती, महाजन, व्यापारी यांची एक जाहीर सभा घेतली. शहरात शांतता राखण्यासाठी त्यांनी सहकार करावा अशी त्याने अजीजी केली. उठाववाल्यांना जे मिळाले नाहीत त्यांची वाहवा त्याने केली, पण पर्वा केली नाही. उठाववाल्यांना सामील झालेत त्यांना शिक्षा होणारच अशी तंबी देण्यासही शेररने कमी केले नाही.

कानपुरात सगळे सामसूम झाले. मग हेवलॉकच्या डोक्यात ब्रह्मावर्तचे वाटोळे करण्याचे आले. १९ जुलैला हेवलॉकने मेजर स्टेव्हिन्सनच्या नेतृत्वाखाली सैन्याची एक तुकडी ब्रह्मावर्तावर सोडली. ब्रह्मावर्त बिनविरोध इंग्रजाच्या ताब्यात आले. इंग्रजांनी तेथे कित्येक दिवस लूटमार केली. रस्त्यावर कोणी दिसला अगर तो नानांचा साथी आहे असा नुसता संशय इंग्रजाच्या मनाला चाटून गेला तरी, इंग्रज त्याला गोळी घालण्यास चुकत नसे. रस्त्यावर कोणी दिसलेच नाही तर इंग्रज घराघरांत घुसत आणि यमदण्ड करीत. लोक त्यामुळे गुपचुप घरेदारे सोडून जंगलात निघून गेले. नानांच्या वाड्यात अपार संपत्ती होती. नाना वाडा सोडून गेल्यापासून संपत्तीवर हात मारण्याचा उद्योग दिवाण नारायणराव सुभेदारापासून सगळ्यांनी आरंभिलाच होता. आता इंग्रजी सैन्याने त्या संपत्तीवर तावच मारला! त्यांनी जसे हजार लोक बळी घेतले तसेच सोनेचांदी दृष्टीस पडली रे पडली की तिच्यावर बिनदिक्कत हात मारलाच! नानांचे वाड्यातील तांब्यापितळासुद्धां सर्व मौलिक पदार्थ लुटून झाल्यावर, इंग्रज सैनिकांनी नानांच्या वाड्याची अक्षरश: होळी केली! शहराच्या वेशी जमीनदोस्त केल्या. सुंदर राममंदिराचा सत्यानाश साधला, आतील मूर्तीचे तुकडे तुकडे करून झाल्यावर!!

ब्रह्मावर्तात नानांची नामनिशाणी ठेवावयाची नाही, असा इंग्रजांचा निश्चय होता. गंगाकाठावर नानांचा एक रंगीबेरंगी बिलोरी आरशांचा गंगामहाल होता. त्यावर 'स्टीमर' मधून गोळ्या झाडून त्याची राखरांगोळी इंग्रजांनी केली. या गंगामहालाच्या पाठीमागे तात्या टोप्यांचा भव्य वाडा होता, त्यासही आगी लावल्या. अशाप्रकारे ब्रह्मावर्ताची कुबेर नगरी भणंगभिकाऱ्याची उजाड धर्मशाळा झाली!!

⌘ ⌘

## ३०. नीलचे अनाचार-अत्याचार

नील कानपुरात २० जुलैस आला. हेवलॉक २५ जुलैला लखनऊकडे रवाना होईपर्यंत नील स्वस्थ होता. पण ती वादळापूर्वीची

शांतता होती. हेवलॉक कानपूरबाहेर पडायचा अवकाश की नीलने आपल्या तोफाबंदुकांचा जबडा पसरलाच! बिब्बीघरातील हत्त्याकांड करण्यात भाग घेतला, असा कोणाबद्दल इंग्रजांच्या मनांत संशय डोकावला की त्या इसमाला लष्करी न्यायाने तोफेचे तोंड दाखविण्यातच येई! हजारो निरपराध तसे मृत्युमुखी पडले! त्यांपैकी कित्येक हिंदुमुसलमानांना प्रथम बिब्बीघरांतील सांडलेले इंग्रज महिलामुलांचे रक्त स्वतःच्या जिभेने चाटावयाची शिक्षा झाली होती.

कानपूर येथील क्रमांक दोनच्या घोडदळाने इंग्रजांविरुद्ध प्रथम उठाव केला होता. त्यामुळे त्या घोडदळावर इंग्रजांचा विशेष दात होता. म्हणून त्या सेनेचा दफादार सफदरअल्ली हाताशी लागताच, नीलने त्यास बिब्बीघराची रक्तरंजित जमीन जिभेने साफ करण्याची शिक्षा फर्मावलीच! सफदरअल्लीने तसे करण्यास नकार देताच, त्यास कोर्डे ओढण्यात आले. सहनशक्तीच्या पलीकडे मामला गेल्यावर नीलच्या सर्व आज्ञा मुकाट मानण्यात आल्या. पण नीलच्या या यमकर्माची चीड सफदरअल्लीचा मुलगा मजहरअल्ली याच्या मेंदूत एवढी रुतली की त्याने पुढे तीस वर्षांनी मध्यभारतातील 'आगर' छावणीत नीलच्या मुलाला कंठस्नान घालून आपल्या पित्यावरील अत्याचाराचा सूड उगविण्यास कमी केले नाही! नीलने दुसऱ्या एका सैनिकाला वाळूत गळ्याइतका पुरून त्याला गोऱ्या बाळांच्याकडून संगिनीने भोकसविले आणि मग त्याला उभा जाळला!! मुसलमान घोडेस्वाराला डुकराच्या कातडीत शिवून टाकावे अगर त्यांच्या अंगास डुकराची चरबी चोपडावी आणि हिंदूना गाईचे मांस चघळावयास लावावे, असेही अत्याचार नीलने केल्याचे रसेलच्या दैनंदिनीत नमूद आहे. ज्यांना अन्यायमूलक फाशी झाली ते शान्ती राखून देवाघरी गेलेले पाहून स्वतः नीलही स्तिमित झाल्याशिवाय राहिला नाही. नीलच्या अगर कोणाही इंग्रजाच्या पाया तर कोणी उठाववाला पडलाच नाही; छे! साधी शाब्दिक दयाही कोणी भाकली नाही.

ॐ ॐ

# ३१. कठिण समय येता कोण कामास येतो?



कानपूरला नानांचा पराभव झाला हे ऐकल्यावर, अयोध्येच्या हजरतमहल बेगमने आपले अधिकाऱ्यांना फर्मावले होते की नानांचे स्वागत त्यांच्या इतमामास साजेसे व्हावे. गंगापार झालेल्या नानांचे शाही थाटाने जेथे तेथे स्वागत झाले. पण एकही सरंजामदार नानांना आश्रय द्यावयास धजेना. रुइयाचा तालुकदार नरपतसिंह याने नानांना थारा द्यावयाचे नाकारले, तेव्हा त्याच्या आईनेच त्याचे कान उपटले. तेव्हा मग, फत्तेहपूर-चौरासीमधील भूपालसिंह चौधरींच्या गढीत मोठ्या सन्मानाने नानांला पोहोचविण्यात आले. नरपतसिंहाचे वडील जम्मासिंह नानांचे मित्र व सहकारी होते. कानपूरच्या घनचक्करीत नानांच्या बाजूने दोन हात करीत असतानाच, जम्मासिंहांना वीरगती मिळाली होती, हे लक्षात घेऊन नरपतसिंहाच्या वृत्तिचा विचार नानांनी केला नसेल काय? तथापि, नरपतसिंहांची आई ही नानांची खरी भावजय ठरली नाही काय? फत्तेहपूर-चौरासी ब्रह्मावर्तापासून केवळ

बारा तेरा मैलांवर लखनऊ-कानपूर-रस्त्यावरील वाहतुकीचा तेथून चांगलाच वास लागणारा, म्हणून तर नानांनी तेथील "जो एकरूप सुखदु:खपणी गडी" जम्मासिंह, त्याच्या घरी आश्रय धुंडाळला होता.

बेगम हजरतमहलने आपला प्रमुख अधिकारी जयलालासिंह याच्या बरोबर नानांच्याकडे १२ उंट, २९ बैलगाड्या, १० गाडे, २०-२५ हत्ती पाठवून नानांना मोठ्या सन्मानाने लखनऊस बोलावले. लखनऊमधे बेगमसाहेबांचे दोनशे घोडस्वारांनिशी दोन हत्तींवर चांदीचे हौदे टाकून, नसरतजंग बेगमसाहेबांच्या तर्फे नानास सामोरे गेला. लखनऊत नानांनी पाय टाकताच त्यांना अकरा तोफांची सलामी मिळाली. बेगमसाहेबांच्या तर्फे मीर अजीदअल्लीने नानांचे स्वागत केले. नानांनी अजीदअल्लीना एक दुशाल व एक फेटा यांची भेट दिली. बेगमसाहेबांच्या तर्फे नानांना एक भरजरी पोशाख, एक तलवार, एक ढाल, एक मोत्याचा कंठा, चांदीच्या हौद्यासह एक हत्ती व चांदीच्या जीनासह एक घोडा अशी भेट झाली. लखनऊत बेगमसाहेबासी खलबत करून नाना थोड्याच दिवसांत फत्तेहपूर-चौरासीस परतले.

क्रान्तीची योजना सूत्रबद्ध आखण्यात आली होती, पण केन्द्राकेन्द्रांतील कार्यकर्त्यांनी सहकार-समन्वयाचा जो जिव्हाळा राखावयास हवा होता, तो न राखता, स्वत:च्या केन्द्रापुरतीच दृष्टी ठेवल्यामुळे, दिल्ली, लखनऊ, झाशी, कानपूर, अलाहाबाद, बरेली येथून फिरंग्याना पिटाळून क्रांतिसत्ता प्रस्थापित झाली तरी केंद्राकेंद्रांतील नवसत्तांची साखळी बळकट बसली नाही. कानपूरला दाणादाण उडल्यावरही नानांनी फत्तेहपूर-चौरासीत नवे क्रान्तिकेंद्र उभारलेच. तात्या टोपेंनी काल्पीला तोच उद्योग केला. "बचेंगे तो और भी लढेंगे" ही १७६१च्या पानपतावरील दत्ताजी शिंद्यांची वृत्ती वारसाहक्काने शहाण्णव वर्षे अशी चालली. कानपुरात पुन्हा इंग्रजांना धूळ चारण्याची जबाबदारी तात्या टोपेंनी घेतली तर लखनऊच्या संरक्षणाची व तेथे इंग्रजांची उचलबांगडी करण्याचा विडा नानांनी उचलला.

सगळा अयोध्याप्रांत एकमेळ करून क्रांतिकारकांच्या या स्वातंत्र्ययुद्धात सामील झाला. ३० मे १८५७ पासून इंग्रजांच्याविरुद्ध कारवाई करता करता, अयोध्येच्या गादीवरून इंग्रजांनी उठविलेले नबाब वाजिदअल्ली आणि हजरत बेगमचे चिरंजीव विरजित कादर यांना क्रांतिकारकांनी नबाब म्हणून नव्याने घोषित केलेच केले. विरजित कादर अल्पवयीन, म्हणून हजरत बेगमने लखनऊचे क्रांतिकेंद्र व्यवस्थित चालविले होते.

मौलवी महमुदुल्ला याचे नेतृत्व लखनऊच्या क्रांतिकेंद्राची प्रभावी शक्ती होती. इंग्रजांच्या रेसिडेन्सीला एकशे सत्तावीस दिवसांचा घेरा देऊन शरण आणावयास तीच शक्ती कारण झाली होती. ९७२ इंग्रज स्त्रीपुरुष व ७६५ भारतीय त्यांचे नोकर यांच्याशी तो सामना होता. चार वेळा चौफेर कोंडी केल्यावरच इंग्रज शरण आले होते. म्हणूनच बेगमसाहेबांशी नानांचा खलबतखाना झाल्याची कुणकुण हेवलॉकला लागताच, नाना फिरून कानपूरचा कबजा करण्यास चुकणार नाही, अशी खंत हेवलॉकच्या मनाने खाल्ली होतीच! म्हणून नहर जेथे संगम करतो तेथे हेवलॉकने किल्ला मजबूत करून ठेवला.

⌘ ⌘

## ३२. पोलादी निश्चयाने निकराची लढाई

हेवलॉक २५ जुलै रोजी कानपूरहून गंगापार होणार होता. पावसाळा सुरू होऊन गंगा दुथडी वाहात होती. उठाववाल्यांनी सगळ्या नावा अदृश्य करून हेवलॉकला अडचणीत टाकले होते. पण हेवलॉकचे नशीब बलवत्तर! याच वेळी 'ब्रह्मपुत्र' नावाचे स्टीमर कानपुरात आले होते. त्यातून हेवलॉकने आपले सैनिक गंगापार नेले. वाटेत उन्नाव व बशीरतगंज येथे हेवलॉक व उठाववाले यांच्यात चकमकी झडल्याच! त्यात इंग्रजी सेनेची हानी काही कमी झाली नाही. नानांच्या घोडस्वारपथकाने इंग्रजी सेनेला इकडे तिकडे गंगाकाठी फिरकणेही अशक्य करून ठेवले होते. हेवलॉकची तारांबळ उडाली. तो आपले सैन्य घेऊन मगर-वारापर्यंत परत फिरला. तेथून

त्याने आजारी आणि घायाळ सैनिकांस कानपुरास रवाना केले. कानपूरहून आणखी कुमक घेऊन हेवलॉक मग लखनऊकडे सरसावलाच!

नानासाहेब पेशवेही काही कमी नव्हते. त्यांनी लखनऊजवळ ठाण मांडून इंग्रजी सैन्याला रसद मिळण्याचा मार्गच बंद केला. इंग्रजाला नानांच्या काव्यांचा वास लागलाच होता. नीलने कॅप्टन गार्डनला एका स्टीमरमधून लखनऊस रवाना केले. गार्डनने क्रांतिकारकांवर गोळीबार असा केला की, ते गंगापार सर्वत्र पांगले.

बशीरतगंजमध्ये हेवलॉक आणि क्रांतिकारक यामध्ये बेफाम सामना झाला. आता आपली सेना टिकाव धरू शकणार नाही, असा हेवलॉकचा कयास होताच, ६ ऑगस्ट रोजी तो मगरवारापर्यंत परत फिरला. लखनऊपर्यंत मजल मारण्याचा धीरच त्याला उरला नव्हता. आपल्याला एक हजार गोरे सैनिक व मेजर आल्फर्टसचा तोफखाना मिळेल तरच लखनऊची मजल आपण मारू असा त्याने वरिष्ठाकडे दिलासा सादर केला.

याच सुमारास सागर येथील बेचाळीस क्रमांकाच्या पलटणीने उठाव करून काल्पीमधून यमुना नदी पार करून कानपूर जिल्ह्यातील अकबरपूरचा कबजा केला होता. त्या सेनेच्या या पराक्रमाने शेरर यानेही तोंडात बोटे घातली. अकबरपुराहून या सेनेने फत्तेहपूर-चौरासीमध्ये नानासाहेबाकडे दूत पाठवून मार्गदर्शन करण्यास विनंती केली. नानांनी तात्या टोपेस पाठविले. तात्यांनी सुरुवातीलाच पांडूनदीवरील पूल उडवून लावला. नंतर त्यांनी संचेली गाठली. तेथील ठाणेदार उडविला. तेथून ती सेना सरळ ब्रह्मावर्तास गेली आणि ठाण मांडून बसली.

तेथे तात्या टोपे भीषण लढाईस सज्जच होते. त्यांना फत्तेहपूर-चौरासीहून सैन्य येऊन मिळाले. नीलने कर्नल गार्डनला एका स्टीमरमधून ब्रह्मावर्ताच्या रोखे धाडला. स्टीमरवर गंगाकिनाऱ्यावरून गोळ्या बरसतच होत्या. अखेर स्टीमरला परत फिरावे लागले. ब्रह्मावर्ताच्या परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणी उठाववाल्यांनी आता

बळकट मोर्चे बांधले होते. नील स्वतःच घाबरा झाला. पाच तोफांनिशी सज्ज असे चार हजार सैन्य उठाववाल्यांचे यावेळी ब्रह्मावर्तात होते. आता लखनऊत घुसण्याचा नाद सोडून देऊन हेवलॉक नीलची साथ करण्यास धावला.

हेवलॉकने कानपूरहून नीलच्या मदतीस सैन्य पाठविले. त्याच्याशी तात्या टोप्यांचे सैन्य भिडले. तेव्हा एक हजार गोरे सैन्य, अडीचशे शीख आणि काही तोफा घेऊन हेवलॉक स्वतःच त्या रणांगणावर उतरला. ब्रह्मावर्तातील तात्यांच्या मोर्चावर इंग्रजांचे गोळे वर्षू लागले. तात्यांच्या तोफाही गरजू लागल्या. क्रांतिकारकांच्या गोलंदाजीने हेवलॉक वेडापिसा झाला. गोलंदाजीत आपला निभाव लागणार नाही हे पाहून हेवलॉकने पवित्रा बदलला. आता संगिनींनी संग्राम सुरू झाला. पुष्कळ गोरे सैन्य यमसदनास गेले. हेवलॉकने शेवटी उठाववाल्यांच्या तोफा हस्तगत केल्या. उठाववाले मागे हटू लागले. तसा हेवलॉकने ब्रह्मावर्त शहरातच प्रवेश केला. पावलापावलाला आणि घराघरागणिक रणधुमाळी उठली. तात्यांच्या सैन्याने गाजविलेली मर्दुमकी हा हेवलॉकच्या कौतुकाचा विषय ठरला, कारण क्रांतिकारक पोलादी निश्चयाने निकराची लढाई देत होते. शेवटी इंग्रजांना या युद्धात वीस तोफा मिळाल्या. मग क्रांतिकारकांनी फत्तेहगडाच्या आणि शिवराजपुराच्या बाजूस काढता पाय घेतला.

⌘ ⌘

## ३३. यमुना परिसरात गनिमी छापे

कानपूर जिल्ह्याच्या उत्तरेस गंगानदी व पलीकडे अयोध्या प्रांत तर दक्षिणेस यमुनानदी व पलीकडे जालौन ज़िल्हा. या दोन्ही बाजूला उठाववाल्यांची क्रांतिकेंद्रे होती. गंगेपलीकडे फत्तेहपूर-चौरासीत नाना संघटना बांधीत होते तर यमुनेपार काल्पीतून तात्या टोपे कानपूररोखे चाल करू पाहात होते. फत्तेहपूर-शिवराजपूर यांच्यामध्ये अकबरपूर, बिल्हौर, ब्रह्मावर्त, जाजमऊ अशी क्रांतिकेंद्रे होती. यमुनेच्या परिसरात काल्पी, सिकन्दरा, भोगनीपूर, शिवली इत्यादी क्रांतिकेंद्रे संघटित

होती. छापे घालण्याचे पद्धतशीर शिक्षण येथे मिळत असे. या केंद्रांचा दरारा एवढा होता की कानपूरचा सर्वाधिकारी नरराक्षस ब्रूस याने लाख प्रयत्न करूनही तो दरारा हादरलासुद्धा नाही.

क्रांतिकारकांची गुप्तहेर-संघटनाही चतुरपणे चलाख होती. या गुप्तहेर-संघटनेच्या जोरावरच गंगायमुना परिसरातील छापेबाज क्रांतिकारक इंग्रजाच्या छावण्या-कचेऱ्या केव्हा बरखास्त करतील याचा नियम राहिला नव्हता!

ब्रह्मावर्त म्हणजे नानांची राजधानी. ती मातीला मिळवलीच पाहिजे असा ब्रूसचा कटाक्ष होता. म्हणून तेथे जंगी पोलिसठाणे त्याने निर्माण केले. ठाणेदार नारायण याने लोकांचा अनन्वित छळ आरंभला. २ ऑक्टोबर १८५७ रोजी त्याने विजयोत्सव केला. नाच-रंग व शराबपाणी मस्त झाले. एवढ्यात शिवराजपूरचे राजे सतीप्रसाद चंदेल यांनी ब्रह्मावर्तावर टोळधाडीसारखा छापा घातला. ठाणेदारासह काही सैनिक मृत्युमुखी पडले. जे वाचले त्यांना पळता भुई थोडी झाली.

फत्तेहपूर चौरासीचे क्रांतिकेंद्र ग्रांडट्रंक रोडवरील ये-जा अजिबात हटविण्यात डोळ्यात तेल घालून असे. गोरी सेना या रस्त्यावर पाळत ठेवून गस्त घालीत असे. तरीही क्रांतिदलाने कित्येक छापे तिच्यावर घालून लूट मारण्याचा उद्योग चालविलाच होता. यमुना परिसरात काल्पीतून होणारे छापे यमदूतांचे झपाटेच ठरत. घाटमपूर येथे २९ मार्चपासून ६ मे १८५७ पर्यंत झालेल्या छाप्यांनी कित्येक इंग्रज सैनिक कामास आले व खजिन्यातून हजारो रुपये गेले. त्यामुळे तेथे ठाणेदार वा तहसीलदार होऊन जावयास इंग्रजांतर्फे कोणी तयारच होईना. सरतेशेवटी इंग्रजांना घाटमपूर हातचे सोडावेच लागले होते.

सिकन्दराचे राजे भाऊ व भोगनीपूरचे कानूनगो माधवसिंह यांच्या नेतृत्वाखाली १० जानेवारी १८५८ रोजी झालेली छापेमारी ठाणेदार व बरकन्दाज यांचा बळी घेऊन बसली होती. तेथून छापा मंगलपूरवर येत आहे, असा सुगावा लागताच, तेथील इंग्रज अधिकारी 'देमाय

धरणी ठाय' म्हणत सुंबाल्या करीतच पळाले. मुसानगर ठाणेही थोड्याच दिवसांत इंग्रजांना खाली करावे लागले. भोगनीपूरपासून चिल्लातारापर्यंत इंग्रजांनी यमुना परिसरात कडक पहारे ठेवले होते. पण क्रांतिकारकांचे छापे असे बिनचूक होत की मोंगलांवर धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे छापे घालीत त्यांची आठवण लोकांस आल्याशिवाय राहात नसे.

⌘ ⌘

## ३४. लखनऊचा विजय नवलाखाचा

कलकत्त्यात इंग्रज सरकारची मुख्य सूत्रे. तेथेच बेचैनी झाली. जनरल औट्रॅमबरोबर विशाल सेना देऊन त्याला लखनऊकडे रवाना करण्यात आले. हेवलॉकच्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी असूनही, औट्रॅमने हेवलॉकच्या हाताखाली काम करण्याचे ठरविले. कारण हेवलॉकनेच आतापर्यंत लखनऊ-आघाडीचे नेतृत्व केले होते. आतापर्यंत तीन वेळा प्रयत्न करूनही लखनऊत हेवलॉकला प्रवेश मिळाला नव्हता. अयोध्येकडील क्रांतिकारकांचे पाणीच काही वेगळे आगळेच इंग्रजांना चाखावयास मिळाले होते. लखनऊत पुनः इंग्रजी सत्तेचा दिमाख प्रस्थापित करण्याअगोदर तेथे अडकलेल्या इंग्रजांची मुक्ती करण्यावरच भर द्यावयास लॉर्ड कॅनिंगने औट्रॅमला आग्रहिले होते.

औट्रॅम, हेवलॉक, नील असे रणपटू आता एकत्रित आले होते. मंगलबार, उन्नाव, बशीरतगड येथे त्यांनी क्रांतिकारकांशी मातब्बर लढाया केल्या. जालमबागपर्यंत इंग्रज पोहोचले. तेथून क्रांतिकारकांशी पावलापावलावर इंग्रजांनी आपला कचका दाखवला. चारबागच्या पुलावर तर घनघोर लढाई झाली. तीत जनरल नील गोळी लागून ठार झाला! जनरल हेवलॉक व औट्रॅम यांना रेसीडेन्सीत कसेतरी घुसून आत्मरक्षण करण्याचा प्रसंग गुदरला.

कलकत्त्याला हे वृत्त कळले! 'देवा तू तरी धाव।' अशा प्रार्थना इंग्रज सरकार करू लागले. इतिहासाची किल्ली म्हणून दिल्ली हस्तगत केली तरी लखनऊ 'स्वतंत्रच स्वतंत्र' राहिल्याने, इंग्रज

राज्यच असून नसल्यासारखे झाले!! तेव्हा सर सेनापती सर कॉलिन् कॅम्पबेल स्वत:च मोठे सैन्य घेऊन लखनऊस विजयास निघाला. राहावेनाच त्याशिवाय त्याला!!

सर कॅम्पबेल यासही क्रांतिकारकांनी आपला कचका दाखविण्यास कमी केले नाही. १४ नोव्हेंबरपासून २४ नोव्हेंबर अखेर क्रांतिकारकांनी कॅम्पबेलच्या सैन्याशी सामनेच नव्हे तर लगटीने लढाया दिल्या. सिकंदरा येथे झालेला सामना एवढा भीषण झाला की इंग्रजांचे कूपर आणि लॅन्सडन् हे बिनींचे लढवय्ये देवाघरी गेले क्रांतिकारकांनी प्राणावर उदार होऊनच इंग्रजी सेनेला हादरवून सोडले होते. तरी कॅम्पबेलची सेना पुढे सरकत चालली. रेसीडेन्सीपर्यंत ती आली, असा सुगावा लागताच, हेवलॉक व औट्रॅम यांनी बाहेर तोंड काढले. तुम्बळ युद्ध झाले. २४ नोव्हेंबरला हेवलॉकचा बळी पडला. पण कॅम्पबेल, लखनऊतील युरोपियनांना संरक्षण देऊ शकला!! त्यांना आलमबागच्या इंग्रजी छावणीत आणून ठेवण्यात आले. तरीसुद्धा क्रांतिकारकांच्या सेनेचा पराभव असा झालाच नव्हता! ते इंग्रजी सैन्यावर मारे व हल्ले करीतच होते. त्यामुळे लखनऊमध्ये सत्ता स्थापण्याचा नाद सोडून देऊनच इंग्रजाला आलमबागच्या छावणीतच समाधान मानावे लागले!!!

इतक्यात वार्ता आली की तात्या टोपेंनी कानपूरचा कबजा केला. तेव्हा लखनऊवरील मोर्चाची जबाबदारी औट्रॅमवर सोपवून कॅम्पबेल, आजाऱ्या-बेजाऱ्या-रोजगाऱ्यासुद्धा, कानपूरकडे कूच करू लागला. आलमबागमधील इंग्रजी सेना चातुर्मास करीत राहिली. दिल्ली आणि कानपूर येथे पाय पक्के रोवून झाल्यावर मगच इंग्रजी सेना लखनऊकडे पुन्हा वळली. कॅम्पबेलने आता सतरा हजार सैनिक, पाच हजार घोडेस्वार आणि चोवीस तोफा घेऊन लखनऊ डागावयाचे ठरविले. अनेक पराभवांचा सूडच त्याला उगवावयाचा होता. लोकांना दशहत बसविण्यासाठी गावेच्या गावे पेटवून बेचिराख करण्याचा सपाटा त्याने सुरू केला.

नेपाळच्या जंगबहादूरलाही सैन्य घेऊन इंग्रजांनी मदतीला

बोलावले. कपूरथाळ्याचे महाराणा अडतीसशे सैनिक, बाराशे घोडेस्वार, आणि दोन तोफा घेऊन कॅम्पबेलच्या साहाय्यास आले. मग लखनऊचे युद्ध म्हणजे 'संगर-ताण्डव' झाले, यात नवल काय? मौलवी अहमदशहाच्या सैनापत्याखाली क्रांतिकारक अशा ईर्षेने लढले की सतराशे एकसष्टमधील पानिपतावर मराठ्यांनी केलेल्या पराक्रमाची याद इतिहासाला झाली. हजरत (अयोध्या) बेगमही रणांगणावर उतरून आपल्या सैन्याचा उत्साह वाढवीत होती. आठवडाभर रात्रंदिवस इंग्रजांना पावलोपावली, गल्लीगल्लीत, आणि घराघरांत क्रांतिकारकांशी सामना करावा लागला, तेव्हा लखनऊत इंग्रजी सत्तेच्या पायाला धर लागला!!!

तो धर लागावयास, सर हेन्री लॉरेन्स, मेजर हडसन् आणि प्रहारपटू आणि हजारो सैनिक यांच्या आहुती इंग्रजास द्याव्या लागल्या. लखनऊ हातचे गेलेच, असा आभास होत असतानाच, हज़रत बेगम, मौलवी आणि दुसरे क्रांतिकारक अचूक निसटले होते. त्यामुळे त्यांना शिक्षा सुनवण्याची इंग्रजांची खुमखुमी तेथल्या तेथे जिरली!!! नवलाखाचा विजय मिळूनही 'मदोद्दंड उदंड दंड करिती, शाबास माझी धृति॥' असे इंग्रजी सत्तेला मिरवता आले नाही.

⌘ ⌘

## ३५ . कानपूर जिंकले

ब्रह्मावर्ताला ठोकर खाऊनही कानपूरवर कबजा करण्याचा तात्या टोपेंचा निश्चय डळमळला नव्हता. झाशीपासून शंभर मैलांच्यावर आणि कानपूरपासून पन्नासएक मैलांवर असलेल्या काल्पीच्या किल्ल्यातील सेनेने इंग्रजांविरुद्ध उठाव केला आहे असे समजताच, तात्या टोपे तेथे गेले व तेथूनच त्यांनी युद्धाची सूत्रे हाताळली. तात्या टोपेंनी हळू हळू वीस हजार सैनिक काल्पीत शिकवून तयार केले, कारण कधी शस्त्र न वापरलेलेच पुष्कळ लोक इंग्रजांविरुद्ध उठावासाठी जमा झाले होते. म्हणून लष्करी शिस्त, शस्त्रतरबेज सैनिक मिळवण्याच्या मागेही तात्या टोपे होते. ग्वाल्हेरचे शिपाई गडी

हे टोप्यांचे लक्ष्य होते.

ग्वाल्हेरला दहा हजार सैनिक होते. चार तोफखाने, घोडदळ, चार पाचदळे आणि वेढा घालण्याची साधनसामग्री टोप्यांना दिसत होती. अनेक युद्धांत साहसप्रियतेमुळे ते सैनिक विजयीच झाले होते. त्यांतील पुष्कळ ते अयोध्या प्रांताचे रहिवासी असल्यामुळे इंग्रजांचे कट्टे विरोधी होते. ग्वाल्हेरचा इंग्रज रेसिडेंट मॅकफर्सन् सदर सैन्याबद्दल साशंकच असे. त्याचा आधार काय तो ग्वाल्हेर नरेश जयाजीराव शिंदे व दिवाण दिनकरराव राजवाडे!

तात्या टोपेंनी ग्वाल्हेर सैन्याकडून उठाव करताच सगळे इंग्रज आगऱ्यास पळाले, 'मुरार' ची छावणी सोडून त्या सैन्याने जाऊ नये, म्हणून त्याने उठाव करून जयाजीराव शिन्द्याकडून मॅकफर्सनने त्यांचे तनखे चालूच ठेवले!! पण तात्या टोपेंनी जयाजीरावाला मागमूसही लागू न देता, ग्वाल्हेरच्या अफाट सैन्याला घेऊन काल्पी गाठली सुद्धा!! त्याच वेळी फारुकाबादचे नबाब तफज्जुल् हुसेन आणि चांदाचे नबाब अलीबहादूर आपल्या सेना घेऊन काल्पीत दाखल झाले. कानपूर लढविण्यासाठी लागणारी युद्धसामग्री निर्माण करण्याचा कारखानाही टोपे यांनी काल्पीत सुरू केला.

काल्पी केन्द्राचे सारे कारखाने नानासाहेब पेशव्यांच्या नावे चालत. लखनऊवर चालून येणाऱ्या इंग्रजांची रेवडी उडविण्यात स्वत: गर्क असल्यामुळे, नानांनी रावसाहेब पेशव्यांना आपला प्रतिनिधी म्हणून काल्पीस धाडले. बिहारचा क्रांतिवीर कुंवरसिंह चांदा येथे होता, त्यासही कानपूर संग्रामाची सुपारी दिली. तोही मग ससैन्य काल्पीस दाखल झाला.

इंग्रजसेना लखनऊकडे रवाना झाल्याचा मोका साधून कानपूर बळकावण्याचा टोप्यांचा मनसुबा होता. २ नोव्हेंबर रोजी कॅम्पबेल गंगापार झाल्याची बातमी घेऊनच दुसरे दिवशी टोपेंनी कानपूरकडे चाल केली. यमुना पार करताच ठिकठिकाणी मोर्चे बांधीत टोपे निघाले. भोगनीपूरच्या मोर्चावर बाराशे शिपाई व चार तोफा टोप्यांनी ठेवून दिल्या. शिवलीस तसाच मोर्चा बांधून इंग्रजांची रसद

तोडण्याची व्यवस्था झाली. शिवराजपुरापर्यंत मोर्चे बांधून झाल्यावर कानपूरवर आक्रमणाचा हुकूम देण्यात आला.

कानपूर संरक्षणाचा भार यावेळी सेनापती विंडहॅमकडे होता. त्याच्या भाग्याने याचवेळी पंचवीसशे गोरे सैनिक त्याला येऊन मिळाले. २६ नोव्हेंबर रोजी बाराशे पायदळ व तोफा घेऊन विंडहॅम कानपूरहूनच टोपे यांच्या सैन्याशी भिडण्यासाठी बाहेर पडला. पांडुनदीच्या पलीकडे टोपे सज्जच होते. क्रांतिकारकांचे सैन्य पंचवीसशे शिपाई, पाचशे घोडेस्वार व सहा तोफांचे होते. दोन्हीकडून तोफांचे आवाज झाले. धूमधडाक्यात टोप्यांच्या तीन तोफा बेकार होऊन इंग्रजांच्या हाती लागल्याच! मग युद्ध घनघोरच उठले. विंडहॅम् तात्यांच्या आघाडीनेच एवढा थरथरला की कानपूरच्या संरक्षणासाठी त्याने रणांगणातून काढता पाय घेतला. जुहीच्या मैदानापर्यंत परतल्यावर विंडहॅमने गंगेत पाडाव घातले. टोप्यांनी पिछाडीचे सैन्य बोलावून इंग्रज सैन्याचे उजवीवर घातले. स्वत: इंग्रजांच्या डावीवर टोपे चालून गेले. विंडहॅम् गांगरला तरी त्याने गोळागोळी सुरू केलीच. गोळ्यांच्या वर्षावातूनही टोप्यांचे सैन्य शहरात आणि किल्ले कडेकोटात घुसले. मग विंडहॅम किल्ल्यात ससैन्य दबकतच दडला!!

जेथे तो शिरला तो होता कोठीखाना. तेथे हाताला लागल्या दारूच्या बाटल्या. त्या तोंडाला लावून दारू ढोसता ढोसता विंडहॅम् आणि त्याचे लोक पाठमोरेच पळ काढूच लागले! मग नहरपाशी आणखी एक सामना झडला. त्यात गोऱ्या सैन्याला हार खावी लागली. ते आता जीव मुठीत घेऊन सैरावैरा धावू लागले. तेव्हा किल्ल्याचा एक शीख पहारेकरी म्हणाला देखील- 'अरे, खालसा सैन्यावर मात करून कब्जा करणाऱ्या इंग्रजांची औलाद तुझी नव्हे तर!!'

या युद्धात टोप्यांच्या हाती पुष्कळच युद्धसामग्री आली. अकरा हजार काडतुसे, शंभर तंबू, घोड्यांची जीने वगैरे पाच लाख किंमतीची सामग्री होती ती. असे सांगतात की या युद्धात टोप्यांनी सर्व मोर्चांची टेहळणी स्वत: चालवता चालवता एकदा ब्रह्मावर्तापर्यंत चक्करही

मारली होती.

एवढ्यात कॅम्पबेल कानपूर रोखे चालत आला. क्रांतिकारकांनी दुथडी भरून चाललेल्या गंगेवरील पूल अजून उद्ध्वस्त केला नव्हता, ही परमेश्वराची खैरच त्याने मानली. तात्या टोपेंचा मुलगा कॅम्पबेलच्या सैन्याला गंगापार करू देऊ नये म्हणून तोफखाना चालू करू लागला. तोच गंगेच्या पलीकडून पील याने एवढी आग क्रांतिकारकांवर सोडली की गोरे सैन्य गंगापार झाल्याचे क्रांतिकारकांना उमगलेच नाही!! विंडहॅम्च्या पराभवानंतर कानपूर शहरात नानासाहेब पेशव्यांचे राज्यही सुरू झाले होते. महत्त्वाच्या मोक्यावर सैनिकी चौक्या बसल्या होत्या. कानपुरात पाच हजार ग्वाल्हेरची सेना दुसऱ्या दहा हजार सैनिकांसह खुशाल होती. तिच्याशी सामना द्यावयास कॅम्पबेल, होपग्रँट, वॉलपोल, असे रणधुरंधर आता आखाड्यात उतरले.

⌘ ⌘

## ३६. कानपूर हरले! वैभव गेले!!!



नहरजवळच्या मैदानावर दोन्ही बाजूंनी आपापले व्यूह रचले! इंग्रजी सैन्याने प्रथम गोळीबार सुरू केला. टोप्यांच्या तोफा मग आग

ओकूच लागल्या. कॅम्पबेलच्या चटकन् लक्षात आले की टोप्यांच्या व्यूहाची डावी बाजू व मध्य कणखरपणे खंबीर आहे, म्हणून त्या व्यूहाच्या उजवीवरच हल्ला करण्याचे त्याने ठरविले. त्यायोगे ग्वाल्हेरचे सैन्य बाकीच्या सैनिक शक्तीपासून अलग पडावे, हा डाव होता. पीलने केलेल्या गोळीबाराने जिकडे तिकडे धुराचे लोटच्या लोट उठले. दिवसभर हातघाईचे सामनेच सामने झाले. क्रांतिकारक पराक्रमाची पराकाष्ठाच करीत होते. पण इंग्रजांच्या लांब पल्ल्याच्या तोफांपुढे ते तोटके पडू लागले. टोप्यांनी सैन्याला नेटके नेतृत्व दिले तरी त्यांच्या नशिबी माघार घेणे आलेच! होपग्रँट त्यांचा पाठलाग करीतच राहिला. सरैय्या घाटावर टोप्यांचे सैन्य नदीपार होऊन पाय टेकते न टेकते, तोच होपग्रँटने त्यांना तेथेच गाठून तुंबळ युद्ध केले. पंधरा तोफा तेथेच टाकून टोप्यांना काल्पीकडे कूच करण्याशिवाय गत्यंतर उरले नाही!! ग्वाल्हेरची अजेय ठरलेली सेनाही कानपुरात पराजित झाली, आणि बातमी आली की इंग्रजी सत्तेचे आसन उत्तर भारतात दिल्लीपासून सर्वत्र अढळ बसले आहे!!!

सरैय्या घाटावरील या विजयानंतर ब्रह्मावर्तातील खोल विहिरीत नानासाहेब पेशव्यांची जी संपत्ती गडप करून ठेवलेली होती, ती होपग्रँटने इंजिनियर विभागाच्या लेफ्टेनंट मालकमकडून बाहेर काढविली!!! १९ डिसेंबर ते २६ डिसेंबर अखेर उपसा चालू होता. तीस लाख रुपये रोकडीच्या पेट्या बाहेर निघाल्या. चांदीसोन्यांचे ढीग निघाले. सारा ढीग एक कोटीचा तरी असावा.

⌘ ⌘

## ३७. सूडाचा चूड नानासाठी!!

आता चोहोकडून आकाश फाटले होते. १९ फेब्रुवारी १८५८ पासून नाना मजल दरमजल करीत १९ मार्चला रामगंगा पार करून अलीगंजमार्गे २५ मार्चला रोहिलखंडाच्या राजधानीत- बरेलीत नाना सहपरिवार दाखल झाले. रोहिलखंडाचा क्रांतिनेता खानबहादूरखाँ याने नानांचे स्वागत केले तथापि आता यापुढे उठावाचे नेतृत्व

खानबहादूरनेच करावे, नाना त्याचे सहकारी राहतील, अशी दोघांची ठरोती झाली.

इंग्रजांनी यावेळी गोहत्त्येच्या प्रश्नावर रोहिलखंडातील हिंदुमुसलमानांत भांडण पेटविले. कॅप्टन गोबेन याची त्याच कामावर खास नेमणूक करून पन्नास हजार रुपये खर्चाचा अखत्यारही त्यास देण्यात आला होता. त्याने लाख प्रयत्न केले, पण शेवटी त्यास हात चोळत बसावे लागले. कारण नानासाहेबांनी ठाकुरांची व रोहिल्यांची समजूत काढून गोवधबंदीचा जाहिरनामाच काढवला. त्यामुळे ठाकूर लोक इंग्रजांविरुद्ध खानबहादूरची कड घेण्यास तयार झाले.

इंग्रज सरकार मग नानांना पाण्यातच पाहू लागले. नानांना जिवंत पकडून देणारास पन्नास हजारांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. तशा जाहिराती देशभर लागल्या. क्रांतिकारकाने नानांना पकडून दिले तर त्या क्रांतिकारकास सगळीच माफी मिळेल, असेही त्या जाहिरातीत म्हटले होते. त्यामुळे सगळीकडे सणसणाटी उठली! मात्र थोड्याच दिवसांनी त्या जाहिरातीत शोध घातला गेला की, काही झाले तरी फरुखाबाद, चांदा येथील नबाब, मैनपुरीचे राजे तेजसिंह, बरेलीचे खानबहादूरखाँ, मालगढचे बलीदाद यांना मात्र कसल्याही परिस्थितीत कसलीही माफी मिळणार नाही.

अडतीस वर्षांच्या पाच फूट आठ इंच उंचीच्या रुबाबदार पैलवानास पकडण्यासाठी लावलेल्या बक्षिसाचा थोडासुद्धा मोह जनतेला पडला नाही. तेव्हा २८ फेब्रुवारी १८५८ रोजी बक्षिसाची रक्कम एक लाखाची जाहीर करण्यात आली. नानांना पकडण्यासाठी यंत्रणा रचण्यात आल्या. तेव्हा नानाला 'गुप्त' राखण्यात क्रांतिकारकांना रोजचा अडीचशे रुपये खर्च येत राहिला, तरी त्यांनी तो आनंदानेच केला.

बरेलीतील दारूखान्याला २४ मार्च १८५८ रोजी आग लागली व तीत त्रेसष्ठ व्यक्ति मरण पावल्या. खानबहादूरही तापाने फणफणून निघाले. म्हणून नानांनाच तेथील मुख्य व्यवस्थेची जिम्मेदारीच घेणे भाग आले! कारभार करताना नानांनी क्रांतिकारकांत

मिसळून गेलेल्या बाजारबुणग्यांना बेताने बाजूला केले. लखनऊ पडल्यावर तेथून बरेलीला आलेल्या रणधीरांना नानांनी नेमून घेतले. बरेलीच्या आसपासच्या किल्ल्यांचीही तंदुरुस्ती नानांनी करविली, आणि त्यावर चार तोफाही सज्ज ठेवल्या.

मौलवी अहमदुलाखाँ, अयोध्येची बेगम हजरत महल हिच्या बरोबर सीतापूर जिल्ह्याच्या मोहम्मदी ठाण्यावर आले होते. मौलवीने शहाजहांपूरवर हल्ला चढविला होता; नाना व खानबहादूर यांनी त्यांना मदत केलीच होती. इंग्रजांच्या मनात ते शल्य सलत होतेच. बरेलीतून एक लाख क्रांतिकारक व बहात्तर तोफा यांच्या जोरावर शहाजहांपूर बळकावलेच होते, म्हणून सेनापती कॅम्पबेलने चारी बाजूंनी आक्रमण केले. गंगेच्या पश्चिम तीरावर सारी सफाई करून जनरल वॉलपोल चाल करून येतच होता. रुडकीहून ब्रिगेडियर जनरल जोन्सही धावत होता.

बरेलीपासून तेरा मैलांवरील फरीदपूर येथे मोर्चा बांधून नानांनी इंग्रजांना वाटेतच गाठले. पण बरेलीच्या रक्षणाचेच नानांचे धोरण क्रांतिकारकांना पसंत न पडून त्यांनी इंग्रजांची कायमचीच जिरवायची असे ठरविले. चकमकी झडत राहिल्या. पण ५ मे १८५८ रोजी इंग्रजी सेनेने बरेलीत प्रवेश मिळविलाच! खानबहादूरने इंग्रजांना चांगलाच हात दाखवला. क्रांतिकारकांनी 'गाझी' म्हणून कीर्ती कमावली. वॉलपोल व केमरॉन यांना चितपट व्हावे लागले. इतक्यात इंग्रजांना बाहेरून कुमक आली व युद्धाचा सारा रंगच पालटला.

बरेलीच्या पराभवानंतर नानांनी आपला परिवार नेपाळकडे रवाना करून आपण वनवास पत्करला. क्रांतिकारकांच्या समवेत शहाजहांपूरला इंग्रजांचा आणखी एक घनघोर संग्राम झाला. या संग्रामात मौलवी अहमदुल्लाने पराक्रमाची शर्थ केली. पुढे बन्नी येथे फिरून लढत झाली. तेथे मात्र क्रांतिकारक नामोहरमच झाले!! नानाही मग नेपाळकडेच रवाना झाले.

⌘ ⌘

## ३८. निपट नाही तरी क्रांती ओसरली

यावेळी तात्या टोपेच्या काल्पी केंद्राचेही भाग्य कोलमडून पडले होते. तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मी, रावसाहेब पेशवे, बांद्याचे नबाब, ग्वाल्हेरात काही काळ सत्ता गाजवू शकले तरी, सर ह्यू रोजने फार काळ त्यांना तोरा मिरवू दिला नाही. जयाजीराव शिंदे यांना इंग्रजांनी ग्वाल्हेरमध्ये पुन: प्रस्थापित केले. त्या आधीच झाशीची राणी रणांगणी वीरगती पावली होती. अयोध्या प्रांतीचे सारे गड क्रांतिकारकांच्या हातात राहिले नव्हते, तरी नानासाहेब पेशवे, खानबहादूर खाँ, बेगम हजरत हलम, राजा वेणीमाधव, नरपतसिंह, मेहदी हसन स्वत:ची जिरली असे मानावयास तयारच नव्हते. यांचे जवळ पंचवीस हजार सैन्य होते. एवढ्याशा क्रांतिकारक शक्तीची हाय इंग्रज खातच होते!!

म्हणूनच इंग्रजांचा सरसेनापती सर कॉलिन् कॅम्पबेल आता लॉर्ड क्लॉइड या पदवीने विभूषित होऊनही, क्रांतिकारकांना निपटून काढण्याच्या प्रतिज्ञेने बेहोष झाला होता. २ नोव्हेंबर १८५८ रोजी प्रयागपासून त्याने क्रांतिकारकांचा असा पाठलाग केला की क्रांतिकारकांस नेपाळमध्ये शिरण्याशिवाय मार्गच राहू नये!! नेपाळमध्ये मग शरणाईशिवाय क्रांतिकारकांना गत्यंतरच उरणार नाही, असा त्याचा विश्वास होता. उत्तरेकडून गुरखा सैन्य व दक्षिणेकडून इंग्रजी सैन्य यांच्या माऱ्यात क्रांतिकारकांना त्राणच काय?

लॉर्ड क्लॉइडने सर्व प्रथम अमेठीवर आक्रमण करून तेथील राजास दाती तृण धरावयास लावले. पण अमेठीच्या सैनिक दलाने इंग्रजीसेनेतील कित्येकांना कंठस्नान घालून आपण स्वतंत्र असल्याचे जगजाहीर केले. तेव्हा क्लॉइडने शंकरपूर येथे अमेठीच्या सैनिक दलास घेरले. तेथील राजा वेणीमाधव आपल्या सैन्यासह इंग्रजांच्या हाती तुरी देऊन केव्हा व कसा निसटला, याचा पत्ताही इंग्रजास लागलाच नाही!! पण ती बातमी कळताच क्लॉइडने चपळाई करून त्यानांही नेपाळकडेच तोंड फिरवण्यास भाग पडले.

मग बहराइचमध्ये राहून इंग्रजांनी काहीच हालचाल केली नाही. क्रांतिकारकांच्या पैकी प्रत्येकांचा वनवासच वनवास व्हावा हा त्यात हेतू होता. थोड्याच दिवसांत क्लाइडला बातमी मिळाली की क्रांतिकारक नानपारा येथे एकजूट झाले आहेत. क्लाइड तेथे चालून गेला; त्या अगोदरच त्याची चाहूल लागल्यामुळे क्रांतिकारकांनी नेपाळचा मार्ग सुधारला होता. तेव्हा आंतरराष्ट्रीय कानूप्रमाणे क्लाइडला नेपाळात घुसखोरी मात्र करता येत नव्हती!

नाना पाराहून निसटून नानासाहेब व त्यांचे साथींनी चर्दा राज्याच्या बरोदिया किल्ल्याचा आश्रय घेतला होता. इंग्रजी सैन्याने तो किल्ला उद्ध्वस्त केला! पण क्रांतिकारकांचा एक उंदीरही त्यांचे हाती लागला नाही!! ते बंकीकडे असल्याचे समजताच त्यांच्यावर रात्रीच हल्ला करून क्लाइडने बंकीस त्यांचा थोडासा समाचार घेतलाच. तरीही क्रांतिकारक त्यांच्या तडाख्यातून निसटलेच निसटले!

आता इंग्रजांची त्रेधातिरपिट होऊ लागली. त्या प्रदेशाचा त्यांना पूर्वपरिचय नव्हता. संपत्तीच्या गडगंज मोहानेही तेथील लोक क्रांतिकारकांचा पत्ता द्यावयास तयार होईनात. नेपाळच्या सीमेवर इंग्रजी सैन्य हिमालयावरून कोसळणाऱ्या बर्फाच्या रांगाच तेवढया निरखीत होते. पहाडाच्या उताराशेजारी अयोध्या प्रांताची सीमा सुरू होत होती! मध्यंतरीचे जंगल एवढे घनदाट की तेथे घुसणे महाकर्म कठीण होते. तरीही ३१ डिसेंबर १८५८ रोजी क्रांतिकारकांचा इंग्रजांचा सामना चकमकीनेच झडला!! नाना, हजरत बेगम, मेंहदी हसन् सारे हत्तीवर बसून सामना चालवीत होते. दोन्ही बाजूचे सैनिक जोराची धार असलेल्या राप्तीनदीच्या प्रवाहातच रणगर्जना करून हल्लेप्रतिहल्ले चढवीत होते.

दोन्हींकडे हानीच हानी झाली. रात्र होताच युद्धही बंद झाले. क्रांतिकारक नेपाळच्या तराईत सटकले. सहा महिने क्लाइड जिवापाड धडपडला. पण क्रांतिकारकांचा निपट त्याला साधलाच नाही. निराशेने मग तो लखनऊच्या वाटेस लागला.

क्रांतिकारकांचा निखालस निपट झाला नाही, तरी नानासाहेबांना

लांबूनही यशाचा किरण दिसेनासा झाला. त्यांनी आपले हृद्गत बोलून दाखवले. मग मात्र पुष्कळच क्रांतिकारक समजले की "परमेश्वराचे अधिष्ठान नसल्यामुळेच, यश हाती येत नाही." ते सर्व परमेश्वराचे अधिष्ठान मिळवण्याच्या निश्चयाने, आपापल्यापरी तपश्चर्येला लागले. नेपाळच्या सीमेवर गुरखा सैनिकांनी प्रतिकार केल्याने राजे वेणीमाधव परलोकी गेले!! क्रांतीचा उफाळा ओसरला!!!

⌘ ⌘

## ३९. राणीचा जाहीरनामा ! नव्हे एक भुलावण !!

सूक्तासूक्त मार्गांनी इंग्रज क्रांतिकारकांचे मागे होते. त्यातील आणखी एक युक्ती इंग्रजांनी काढली. इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरिया यांनी आता ईस्ट इंडिया कंपनीकडील राज्यसत्ता काढून घेतली. हिंदुस्थानात तसा जाहीरनामा लागला. १ नोव्हेंबर १८५८ रोजी तो ठिकठिकाणी वाचण्याचे दरबार व सभाही झाल्या. "प्रजेचा संतोष तेच आमचे पारितोषिक" अशी राणीची घोषणा होती. पण भारतीय प्रजेने त्या जाहीरनाम्याचे थंडे स्वागत केले!! सगळीकडे इंद्रसभाच झाली. प्रयागमध्ये स्वत: लॉर्ड कॅनिंगने जाहीरनामा वाचूनही कोणी पुसले नाही. तेथे इतरांचा काय पाड असेल? कंपनीसरकारच्या ऐवजी राणीसरकार आल्याने, अन्यायाने गिळंकृत केलेली राज्ये जोपर्यंत ज्या त्या राजांना परत केली नाहीत, तोपर्यंत अन्याय हा अन्यायच राहिला, असे स्पष्ट लोकमत होते. चुन्याला 'अमृत' नाव दिले, तरी चुना तो चुनाच! राणीच्या जाहीरनाम्यातील सर्वांना सारख्या वागणुकीचे आश्वासन हलाहलाच्या कांडीच्या तोंडाशी लावलेले साखरेचे बोट असून गोरासाहेब काळ्या माणसाला आपल्या बुटाखाली दाबणार नाहीच असा त्या जाहीरनाम्यात उल्लेखही नाही!!

कानपूरचा गुलाबसिंह ठाकूर एक क्रांतिकारक होता. कानपूर येथील हार झाल्यावर तो यमुनापार झाला होता. सार्वत्रिक क्षमेची जाहीरनाम्यातील घोषणा ऐकून तो कानपुरात परत आला. तो परत

आल्याचे कळताच इंग्रजांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. गुलाबसिंह ठाकूरला पकडण्यासाठी त्याच्या घराला पोलिसांचा वेढा बसला. पण गुलाबसिंहाच्या समोर उभे राहण्याची एकाही शिपायाची हिंमत नव्हती. पोटासाठी ती हिंमत जीव मुठीत घेऊन करणे ठाणेदाराच्याच कपाळी आले. हाती तलवार घेऊन तो गुलाबसिंहासमोर जाऊ लागला. गुलाबसिंह ते पाहताच, पिसाळलाच. त्याने आपले पिस्तूलच ठाणेदारावर झाडले. गोळी ठाणेदाराच्या मर्मस्थानी लागली! पण मरता मरता ठाणेदारानेही आपली तलवार चालविली आणि गुलाबसिंहाला आपला सहप्रवासी केले!!! राणीच्या जाहीरनाम्यातील 'क्षमा' क्रांतिकारकांच्या बाबत ही अशी होती!

⌘ ⌘

## ४०. हा मार्ग बरवा मानापमाना

भारतीय क्रांतिकारक नेपाळमध्ये घुसले. त्यांना नेपाळेश्वरातर्फे जंगबहादूरांनी म्हणण्यासारखा विरोध केलाच नाही. कारण त्या व्यवहारचतुराचे अंतःकरण क्रांतिकारकाकडे होते, पण धोरण इंग्रजांशी वाकुडपण न आणण्याचे होते. इंग्रजांनी वरचेवर जंगबहादूरला तगादा लावला की भारतीय क्रांतिकारकांना नेपाळातून हद्दपार करावे. जंगबहादूरने जाहीरनामा लावला की, "भारतीय क्रांतिकारकांनी नेपाळबाहेर चालते व्हावे!" बुटबलचे प्रदेशपाल बद्रीनरसिंह यास राणा जंगबहादूरांनी बेगम हजरतकडे धाडले. बेगमने नेपाळ निवास करावयास काहीच हरकत नाही असेही त्या उभयतांचे बोलणे झाले. नानासाहेब पेशव्यांचा सल्ला याच्या उलट पडला. तेव्हा बद्रीनरसिंहानी राणा जंगबहादूरना विचारले की लष्कराकडून बेगमची हकालपट्टी करण्यास परवानगी आहे काय? राणा जंगबहादूरनी कळविले की - 'मागे अहल्याबाई होळकरांनी रघुनाथरावदादा पेशव्यांना, लढाई देण्यासंबंधी उत्तर दिले होते. त्यापासून आपण धडा घेतला पाहिजे. महिलेला हटविण्यात पुरुषार्थ काय? आणि डाव उलटलाच तर फजिती केवढी?" बेगमने शरणाई

दिली तर इंग्रज तिला सन्मानाने वागवतील, असा राणा जंगबहादूरामार्फत इंग्रजांचा निरोपही बेगमला मिळाला. पण शत्रुशरण होण्याचे नाकारून उत्तर दिले की, "कोणता मनुष्यप्राणी मरणशरण नाही?" नानासाहेब पेशव्यांचा काटा काढण्याबद्दल इंग्रजी राज्य राणा जंगबहादूराचा पिच्छाच पुरवीत होते. इंग्रजी सैन्याची एक तुकडी हार्सफोर्डच्या हाताखाली नानांना पकडण्यासाठी नेपाळात तळच देऊन होती. या सेनेचा व नानांच्या सेनेचा एकवेळ सामना झडलाच! पण त्या जंगली लढाईत नानासाहेब पेशव्यांनी इंग्रजांना पळता भुई थोडी केली!

नानांच्या हाती काही इंग्रजी महिला आहेत, त्यांना सोडविण्याच्या मिषाने नानांना धरून आणण्याचा डावही इंग्रजांनी टाकला. राणा जंग बहादूरांनी नानांचा शोध घेण्याची कामगिरी सिद्धमनसिंह यांच्याकडे सोपविली. नानांच्याकडे इंग्रज महिला नव्हत्याच! पण सिद्धमनसिंहाच्या भेटीचा फायदा नानांनी करून घेतला. त्यांनी पेशवे परिवारातील स्त्रियांच्या सुखरूपतेची व्यवस्था अपेक्षिली. ते सिद्धमनसिंहाकडून कळताच राणाजींनी त्या महिलांची व्यवस्था तारागढीमध्ये मोठ्या सन्मानाने केली.

⌘ ⌘

## ४१. नानांच्या नशिबाची शिक्कामोर्तब

इंग्रज सरकारने राणीचा जाहीरनामा काढून जाहीर माफी दिली. इंग्रज स्त्रिया मुलांचे हत्याकांड उभारणाऱ्या मम्मुखा, फर्रुखाबादचे नवाब यांना माफीत काढण्यात आले. पण नानासाहेब पेशवे व तात्या टोपे यांची नुसती आठवण झाली की इंग्रजांना विंचू डसत. नानांचे नाव निघताच इंग्रज डरपोक ठरत. याचे कारण नानासाहेब पेशवे इंग्रजापुढे हात बांधून उभे राहावयास तयारच नव्हते. वरचेवर सामने झाले तरी प्राणावर उदार होऊन ते करावयाचे, पण इंग्रजाला नमावयाचे नाही असा नानासाहेब पेशव्यांचा अढळ निश्चय होता.

इंग्लंडच्या महाराणीच पांडीचरीच्या अगर पॅरिसच्या

मुत्सद्द्यामार्फत अथवा स्वतंत्र वकील पाठवून आपल्याशी तडजोडीची भाषा करतील, तरच माणुसकीने इंग्लंडशी बरोबरीच्या नात्याने बोलणे करावयाचे, अशा नानासाहेबांच्या दृढ निश्चयापुढे कोण झाले तरी काय करणार? इंग्रजांची व नानासाहेबांची आता कायमचीच जुंपली असे जग समजून चुकले होते. तेव्हा १३ मे १८५९ रोजी भारत सरकारचे मंत्री बर्डिन याने सर्वत्र ग्वाहीच फिरवली की - 'ज्या अर्थी नानासाहेब पेशवा व्हिक्टोरियाराणीच्या जाहीरनाम्याचा काहीच फायदा घेऊ इच्छीत नाही, त्याअर्थी जेथपर्यंत नानांच्या व्यक्तीचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध येत असेल तेथपर्यंत दयामाया काही भाषाच नाही. नाना शरण येवो, पकडला जावो, किंवा कोणी त्याला हजर करो. त्याच्यावर रीतसर लष्करी खटला भरला जाईल व त्यास शिक्षाच होईल.'

⌘⌘

## ४२. मरणात खरोखर जग जगते

नेपाळमध्ये नानासाहेब पेशवे, बेगम हजरत प्रभृती क्रांतिकारकांनी जो अज्ञातवासासह वनवास काढला, तो अंगावर रोमांच उभे करणाराच आहे. ना अन्न, ना वस्त्र, ना आसरा अशा हालात त्यांनी दिवस काढले, पण भाग्याचे नावही यांच्या वृत्तीत नव्हते. नाना व त्यांचे बन्धू वरचेवर आजारी होऊ लागले. अशा तापत्रयात १८५९ च्या जून मध्ये बुटबलच्याजवळ डोकर भागात गंगाधरराव उर्फ बाळासाहेब यांस देवाज्ञा झाली. पुढे चार महिने सुद्धा सरळ गेले नाहीत, तोच नानांचा साथी अजीमुल्लाखाँ याना पैगंबरांचे बोलावणे आले. नानांना हे धक्क्येच होते. आता नानांनाही जगण्यात राम वाटेनासा झाला. शेवटी २३ ऑक्टोबर १८५९ रोजी नेपाळातील डांग व देवखुरी जवळील तारागढीत महाराष्ट्राच्या या महान् सेनानीचा शेवट झाला!! आणि त्याच्याच बरोबर, नानाला पकडून त्याला फाशी व तोफेच्या तोंडी देण्याच्या इंग्रजांच्या खुमखुमीचाही शेवट झाला!! वार्ता सर्वत्र पसरली.

पण दैवगती विचित्र! नानांच्या 'गुप्त' होऊन वावरण्यातील तो एक गनिमी काव्याचा प्रकार आहे असे लोक व इंग्रज कित्येक वर्षे समजत राहिले.

⌘ ⌘

## नेपाळातील पेशवाई

सन १८५७-५९ चे नानासाहेबांचे बंडानंतर नेपाळचे अधिपती महाराजा जंगबहादूर पेशवे-कुटुंबातील कोणा पुरुषाला उघड उघड थारा देत नव्हते. कारण इंग्रजांना ते खपणारे नव्हते व इंग्रजांचा रोष ओढवून घ्यावयाची महाराजांची तयारी नव्हती. तरी पण पेशवे कुटुंबातील महिला मंडळींना महाराजांनी घरच्या माणसासारखाच आश्रय दिला. धोंडोपंतनाना पेशव्यांचा शेवट २३ आक्टोबर १८५९ ला झाल्यावर नेपाळात, नानांच्या दोन मातु:श्री सईबाई व मैनाबाई (दुसरे बाजीरावांच्या पत्नी), स्वत: नानांच्या पत्नी कृष्णाबाई (रावसाहेब यांना काकू म्हणत म्हणून सर्व लोकही काकू म्हणूनच ओळखत), नानासाहेबांची भावजय व बाळासाहेबांची पत्नी काशीबाई, नानासाहेबांची सून आणि रावसाहेबांची पत्नी रमाबाई, नानासाहेबांची बहीण व बाजीरावांच्या कन्या कुसुमावती (पुढे बयाबाई आपटे), अशी पेशवे कुटुंबातील महिला मंडळी नेपाळातच राहात होती. त्यांच्या दिमतीला नानासाहेबांची दासी भीमा, दोन मोलकरणी, मीर मुन्शी बाळाराम, कारभारी रामभाऊ आणि कोठीवाला परशुराम असा परिवार होता.

जंगबहादुरांनी या पेशवे परिवाराची राहण्यासवरण्याची व्यवस्था थापाथली या विभागात केली होती. त्यांना कसलीही अडचण पडू नये म्हणून एक सुभेदार नेमण्यात आला होता. शिवाय सोळा गुरखे पहारेकरी दिले होते. रात्रौ नऊची तोफ झाल्यावर कोणाही पुरुषाला पेशवेमहालात प्रवेशच नव्हता!!

पेशवे परिवारात वडिलकीचा मान सईबाई यांचाच होता, म्हणून त्याच सर्व कारभार हाकीत. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पत्नी आणि

संभाजी महाराजांच्या मातु:श्री सईबाईची चतुराई आठवावी, अशीच चंतुराई बाजीरावांची पत्नी सईबाईच्या जवळ होती. नेपाळेश्वरांच्या कृपेत काही दिवस काढल्यानंतर सईबाईंनी आपल्या जवळचे काही जडजवाहीर मोडून आठ गावे खरेदी केली. गोविंदपूर, सिरसिया, धनगढवा, सिमखडी, मदनपूर कट्टी, देरिया कट्टी, वरवा आणि पोखरिया अशी ती गावे होती. याशिवाय काठमांडूच्या परिसरात शेती खरेदी करून परिवाराच्या अन्नपाण्याची व्यवस्था केली. सईबाईच्या या सर्व मिळकतीवर कसलाही कर नेपाळेश्वरांनी ठेवला नाही. आपल्याच संरक्षणाखाली सईबाईच्या त्या मिळकतीला राणीगंज हे नाव देऊन सईबाईंनी स्वतंत्र पेशवाई कारभार सुरू केला. तो नेपाळेश्वरांनी चालू दिला. नेपाळचे लोक सईबाईंना 'दक्षिणी राणी' म्हणूनच ओळखत. राणीगंजातील सर्व दिवाणी फौजदारी कारभार स्वत: सईबाईच पाहात. त्यांनी गोविंदपुरात एक नवा वाडा बांधवला. ब्रह्मावर्तातील पेशवे वाड्याच्या धर्तीवर त्याच वाड्यात नव्याने पेशवाईची गादी चालविण्यात आली. घोडे, गाड्या, शिपाई, स्वार सर्व काही लवाजमा व सरंजाम थाटण्यात आला. विष्णुकली नावाची एक हत्तीण रोज पेशवेगादीला सकाळी सोंडेने कुर्निसात करण्यात चुकत नसे. सईबाईची ती आठगाव पेशवाई त्यांच्यापुरती राज्यकारभाराची हौस भागविण्यास पुरेशी होती.

इंग्रजी सत्तेला गदगदा हलविणाऱ्या नानासाहेब पेशव्यांची आई जंगबहादूर देवतेसमान मानीत असल्याकारणाने ते त्या माऊलीचा समाचार व रोजच्या रोज दर्शनपूर्वक घेण्यास चुकत नसत. सईबाई राजवाड्याबाहेर पडल्याच तर त्यांच्यावर सोन्याची मूठ असलेले छत्र बिनचूक धरण्यात येत असे. महाशिवरात्री दिवशी पशुपतेश्वराचे दर्शन करण्याचा सईबाईंचा नेमच असे. छत्रचामरे ढाळतच त्यांची स्वारी निघे. गोविंदपुरात सईबाईंनी रोजच्या दर्शनाची सोय लक्ष्मीनारायणाचे मंदिर बांधून आणि त्याच्या पूजाअर्चेची व कथाकीर्तनांची व्यवस्था लावून थेट पुणेरी थाटाने केली होती.

तात्या टोपे यांचे बन्धू रघुनाथ पांडुरंग हे आठगाव पेशवाईंचे

कित्येक दिवस कारभारी होते. त्यांच्या मृत्यूनंतर ब्रह्मावर्तांचे हरिपंत रिसबुड हे सईबाईंचे लेखनिक होते. हरिपंताचे पश्चात् त्यांचे पुतणे कृष्णाजी बलवंत रिसबुड सईबाईंच्या हाताखाली काम करीत. सन १८९६ मध्ये सईबाई या पेशवे परिवारातील शेवटच्या महिला दिवंगत झाल्या. पेशवे परिसरातील कोणाच्याही मृत्यूनंतर त्याचा अग्निसंस्कार पशुपति नाथाच्या मंदिराचे परिसरातील देवपाट्यामध्ये स्वतःच्या राजघराण्यातील व्यक्तीच्या इतमानाने जंग बहादूर घडवीत. तसाच सईबाईंचाही दहनसंस्कार झाला.

सईबाई या व्यवहारकुशल असल्यामुळे पेशवे परिवारावरील महान् संकटकाळी आणि आणीबाणीच्या प्रसंगी त्यांनी समयसूचकतेने पेशवेपरिवारातील महिलांची प्रतिष्ठा तेजस्वीपणाने सांभाळली. त्यांना शस्त्रविद्या अवगत होती आणि घोड्यावर स्वारी करणे ही त्यांची सहजलीला होती. त्यांनी आपल्या बाणेदार पण स्निग्ध वागण्याने लोकप्रियताही संपादन केली होती. नानांची पत्नी कृष्णाबाई या सुनेने सईबाईंचा कित्ता गिरवून आपल्या विनयाने पेशवेकुळातील 'विनयवती कांता' परंपरा उज्वलतेने सांभाळल्यामुळे ती आपली सासू सईबाई व जनता या दोघांसही आदर्श वाटे. जंगबहाद्दूर पेशवेपरिवारासंबंधी जिव्हाळाच जिव्हाळा बाळगत असले तरी पेशवेपरिवारातील महिलांनी एका पैचीही तोशीस नेपाळेश्वराला लावली नाही. आपल्या जवळचे साठ हजारांचे दागदागिने नेपाळेश्वराच्या मध्यस्थीने मोडून व बिगर लाचारीने सईबाई व पेशवेपरिसरातील महिला गुजराण करून राहिल्या. सईबाईच्या परलोकवासानंतर नेपाळमधील आठगांव-पेशवाई मालमत्तेसह नेपाळशासनात अन्तर्धान पावली.

नेपाळातील ही पेशवाई छत्तीस वर्षे स्त्रीराज्य होते. रावबाजीच्या मृत्यूनंतर सईबाई पंचेचाळीस वर्षे जगल्या. नानांनी १८५१ पासून १८५८ पर्यंत रावबाजीचा वारसा चालवून इंग्रजी सत्तेला आकाश फाटल्यासारखे व धरणी दुभंगल्यासारखे १८५७-१८५८ मध्ये केले. त्यामुळे इंग्रज नानांच्या मृत्यूसंबंधी चांगले १८९६ पर्यंत संशयग्रस्त

होते. त्याचा फायदा घेऊन कोणी भारतीयांनी पुन्हा इंग्रजांविरुद्ध उठाव केलाच तर त्यांना उत्तेजित करण्यासाठीच सईबाईंनी नेपाळमध्ये पेशवाईला अज्ञात वारसात सांभाळली होती. त्या सईबाईंच्या आणि पेशवाईंच्या समाप्तीला १९७१ साली पाऊणशे वर्षे होतात. म्हणून त्या स्मृतिशेष इतिहासाला हे विनम्र अभिवादन. कारण सईबाईंचे धोरण ध्येयनिष्ठ होते. म्हटलेच आहे की

तावन्महतां महति यावतकिमपि हि न याच्यते लोक: ।
बलिमनुयाचनसमये श्रीपतिरपि वामनो जात: ॥

⌘ ⌘

## लोकभ्रमातही अढळ लोकश्रद्धा

'बंडखोर' धोंडोपंत नाना पेशव्यांनी नेपाळात वनवास पत्करला व हालात दिवस काढले. १८५९च्या जूनपासून दोषिक तापाने नानाला हैराण केले. त्यातच बुटवलच्या जवळ डोकर नामे विभागात बाळासाहेब पेशवे जूनमध्ये (१८५९) परलोकवासी झाले. त्यांच्या मृत्यूला चार महिने झाले नाहीत तोच अजीमुल्लाखाँही पैगंबरच्या पायापाशी गेले. या मृत्यूंचा नानांच्या मनावर व प्रकृतीवर फार मोठा परिणाम झाला. आणि? १८५९च्या ऑक्टोबरच्या २३ तारखेस देवखुरीजवळ नानाही दिवंगत झाले. चौदा महिन्यांचा वनवास संपला. पण नाना दिवंगत झाले, यावर इंग्रजांचा विश्वासच बसेना. शिवाजी महाराज वारले त्यावेळी तरी त्या वार्तेवर इंग्रज विश्वास कोठे ठेवीत होते? नानाला जिवंत पकडून आणून त्यांचे हाल हाल करून त्यांना मृत्यूच्या जबड्यात द्यावयाची खुमखुम, नानाच्या मृत्यूची बातमी समजूनही, इंग्रजांच्या मनातून गेली नव्हती.

⌘ ⌘

## न लोको पारमार्थिक: ।

### १. नानांची हजामत

धुंडोपंत बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे २३ ऑक्टोबर

१८५९ ला निवर्तले. तरी लोक समजत असत की ते 'गुप्त' होऊन राहिले आहेत आणि अनुकूल काळाची वाट पाहात आहेत. कानपूरच्या इंग्रजावरील झालेल्या अत्याचारासंबंधी उठाव मोडून विजयी झालेले इंग्रज सरकार चौकशी करू लागले, तेव्हा नानांच्या एका न्हाव्याची साक्ष झाली. त्यास विचारण्यात आले -

'तू नानांची हजामत बनवीत असेस ना?'

'कोणाची हजामत?' प्रतिप्रश्न.

'नाना पेशव्यांची?'

'ओ हो! त्या नीच नानाची? अहो, त्याची हजामत मी नेहमीच करायचा!'

'एका आठवड्यात किती वेळा करीत असतोस?'

'त्या बेट्याची ना? आठवड्यातून दोन वेळा!'

'उलटी सुलटी?'

'पार उलटी सुलटी! पण आता हजामत बनवून घ्यायची त्याला गरज आहेच कुठे?'

'का बरे? नाना खरोखर मेला, असेच तू मानतोस काय?'

'हो तर ! नाना खास मेला आहे. त्याच्यासारख्याने मरणे हेच योग्य होते.'

'का बरे?'

'माझ्या सारख्याने त्याचे डोके भादरले तर फक्त केसच जात. पण आपल्यासारख्या शत्रूच्या हाती तो सापडता तर त्याचा जीवही जायचा अन् कीर्तीही जायची!! तुमची हजामत नानासारख्याला खपणारी नव्हे!'

⌘ ⌘

## २. नैमिषारण्याचे कैलाशन बाबा

लोक १८८५-८६ पर्यंत समजत की नैमिषारण्यातील कैलाशनबाबा म्हणजे नानासाहेब पेशवेच. कारण लोक पाहात की कैलाशन बाबा जानकी-कुंडावर राहात. त्यांच्याजवळ धन तर विपुल

असे. त्यांनी ललितादेवीमंदिराचा जीर्णोद्धार केला. पैशाची चणचण झाली की ते दाट जंगलात घुसत आणि कोठल्यातरी संकेताच्या जमिनीतून द्रव्य घेऊन येत. त्यांच्या हातील दण्डातही पुष्कळ हिरेमाणके असत, म्हणे! लहान मुलांवर निरतिशय प्रेम करून त्यांना मिठाई वाटण्यात ते धन्यता मानीत.

⌘ ⌘

## ३. मीरा सरायचे बाबा

फर्रुखाबादच्या मीरा सराय या भागात विश्वनाथाचे एक प्राचीन मंदिर होते. तेथे पिशाच्चांची वसती आहे असे म्हणत. एक दिवस एक संन्यासी या ओसाड मंदिराजवळ आला. त्याने पुकारा केला की जोपर्यंत विश्वनाथ मंदिरातील विहीर साफ केली जात नाही, तोपर्यंत आपण पाण्याचा एक थेंबही घेणार नाही. भाविक लोक मग जमले आणि त्यांनी त्या संन्याशाच्या इच्छेप्रमाणे सारे काही केले! मंदिर व विहीर स्वच्छ होताच त्या संन्याशाने त्या देवळात मुक्कामच ठोकला. त्याने मंदिराची तन्दुरुस्ती केली व देवळात फरशीही केली संगमरवरी! त्या संन्याशाचा खर्चिकपणा पाहून लोक त्याला नानासाहेब पेशवाच समजत.

पुढे गावात एक बालहत्या घडली. न्यायमंदिरात लोकांच्या दबावामुळे त्या संन्याशाने खोटी साक्ष दिली! त्याला मग चैनच पडेना! 'लोक हा ओक धरता धरवेना!' असे निमित्त करून एके रात्री बाबांनी प्रयाण केले. नानां ही समजूत असलेल्या त्या काळचा पापभीरुपणा लोक त्या अज्ञानावस्थेतही वाखाणीत.

⌘ ⌘

## ४. पितरतिथीला रक्तदान

काठेवाडात राजकोट येथे वैशंपायन नावाचे एक भिक्षुक उपाध्याय होते. एक दिवस त्यांचेकडे एक रुबाबदार व्यक्ती घोड्यावर बसून आली. आपल्या पितरांचे श्राद्ध करावयाचे आहे असे तिने

वैशंपायनांना सांगितले. त्याप्रमाणे श्राद्ध झाले. श्राद्धसंकल्पांत पितरांच्या नावांचा उच्चार झाला. ते सर्व पितर नानासाहेब पेशव्यांचे निघाले.

ही वार्ता चहूकडे पसरली. इंग्रजांच्या अधिकाऱ्यांपर्यंत तिने चाल केली. इंग्रजांनी नानांना पकडण्यासाठी जाळे पसरण्यास सुरुवात केली. नानाला पकडून द्याल तर सरकार मोठे इनाम देईल अशी वैशंपायनाला लालूच दाखविण्यात आली.

ठराविक तिथीला 'नाना' पुढल्या वर्षीही वैशंपायनांच्याकडे आले व दुसरे दिवशी श्राद्धाची तयारी ठेवण्यास सांगून गेले. वैशंपायनांनी इंग्रज अधिकाऱ्यांना खबर दिली. श्राद्धासाठी पाच ब्राह्मण पाठविण्याची जबाबदारी इंग्रज अधिकाऱ्यांनी स्वीकारली.

श्राद्धादिवशी 'नाना' पुढल्या वर्षीही वैशंपायनांच्याकडे आले. श्राद्धाची तयारी दिसली पण ब्राह्मण येण्याची वाट पाहावी लागली. खिडकीतून रस्त्याकडे नजर जाताच 'नानाला' पाच गोरे ब्राह्मण रेशमी सोवळी नेसून लष्करी चालीने येताना दिसले! नाना काय समजायचे ते समजले.

ब्राह्मण आले. त्यांचे स्वागत झले. त्यांना मंडलाकार बसवून नमस्कारपूर्वक प्रदक्षिणा घालण्यासाठी 'नानां' नी त्यांना देवध्यानमग्न व्हावयास सांगितले. प्रदक्षिणा घालताना 'नाना' त्या ब्राह्मणांच्या पाठीशी गेले. खुंटीवर म्यान अडकवून ठेवलेली तलवार त्यांनी काढली व डोळ्याचे पाते लवायच्या आत त्या ब्राह्मणांच्या माना उतरवून नानांनी पितरांना रक्तदानाचे तर्पण केले!!

लगेच, नानांनी वैशंपायनाला बजावले, 'गुरुजी, पुन्हा असा देशद्रोह कराल तर खबरदार!'

आणि? 'नाना' पसार झालेसुद्धा. हा फरारी, रावसाहेब पेशवा असावा असा एक तर्क आहे.

⌘ ⌘

## तोतयांचे दुसरे बंड

('बंडवाल्या' नानासाहेब पेशवे यांच्याबद्दलच्या इंग्रजांच्या

डोक्यातील संशय-पिशाच्चाने उभे केलेले' तोतयाचे' बंड, सदाशिवराव भाऊ पेशव्याच्या तोतयांच्या बंडापेक्षा दोन वर्षे अधिक चालले. सदाशिवराव भाऊंच्या तोतयाचे बंड मराठी साम्राज्य बुडविण्यासाठी व स्वत:च्या स्वार्थासाठी मराठेशाहीच्या शत्रूंनी उभे केले होते तर इंग्रजी संशयाने नानासाहेब पेशव्यांचे बदला उभारलेले तोतयांनी स्वातंत्र्य प्रेमाने, जीवंत असतील तर नानासाहेबांस स्वातंत्र्य संग्राम उभारणीस वाव मिळावा म्हणून समर्पित जीवन-योग साधला.)

'बंडवाले' नानासाहेब पेशवे म्हणजे धोंडोपंत बाजीराव यांचा दरारा इंग्रजांवर केवढा होता व भारतीय जनतेत नानासाहेब किती लोकप्रिय होते, याचे मूल्यमापन इंग्रजांच्या संशयपिशाच्चाने पकडलेले गृहस्थ आणि त्यांनी सोसलेले हाल यांच्यावरून कोणाही अभ्यासकाला करता येण्यासारखे आहे.

नानासाहेब नेपाळमध्ये दिवंगत झाले या गोष्टीवर इंग्रजसरकारचा १८७५ पर्यंत तरी विश्वासच नव्हता. अनुकूल काळाची वाट पाहात नानासाहेब नेपाळमध्ये गुप्त होऊन राहिले असावेत, अशी इंग्रज सरकारची समजूत होती. शिवाजी महाराजांच्या मृत्यूसंबंधी पाश्चिमात्य वखारवाल्यांचा असा पुष्कळ दिवस अविश्वास होता, तसाच प्रकार नानासाहेब पेशव्यांचे मृत्यूसंबंधीही राज्यसूत्र धारण करणाऱ्या इंग्रजी सत्तेचा होता. आपल्या गनिमी काव्याने व मुत्सद्देगिरीने त्याचप्रमाणे तलवार बहादुरीने शत्रूच्या मनात केवढा दरारा त्या स्वातंत्र्योपासकांनी निर्माण केला होता, हे खरोखरच अभ्यासण्यासारखेच आहे.

नेपाळमध्ये इंग्रज सरकारने आपले गुप्तहेर पेरून नानासाहेबांची छेड काढण्याचा प्रयत्नच प्रयत्न केला. पण तेंथे निराशा आणि अपयश यांच्याशिवाय काही हाताला लागेनासे झाल्यावर इंग्रजाला भारतातही नानासाहेब दिसू भासू लागला. मोंगलांच्या घोड्यांना पाणी पितानाही धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांच्या तलवारीचे पाणी चमक मारताना दिसे, तशीच गत इंग्रजांची झाली. फकीर, साधू, यात्रेकरू यांच्या तांड्यातही इंग्रजांनी गुप्तहेर मिसळवून नानाची छेड

काढण्याचा प्रयत्न केला. आग्र्याहून निसटलेले छत्रपती बैराग्याच्या वेषाने औरंगजेबशाहीच्या हातावर तुरी देऊन रायगडी नव्हते का सुखरूप पोहोचले? तो दाखला इंग्रजांच्या मेंदूवर चांगलेच ठाण देऊन बसला होता. इंग्रजांनी तात्या टोपे आणि नानासाहेब पेशवे यांच्या नावाने कितीतरी व्यक्ती पकडल्या. चौकशी अंती सोडून दिल्या वा त्यांना बेलाशक देहदंडापर्यन्त शिक्षा करवल्या. त्यापैकी तीन नमुन्यांनी उदाहरणे अचूकपणे लक्षातच राहतात. पहा -

⌘ ⌘

## १. हरिजी भाई

सन १८६१ च्या ३० नोव्हेंबर रोजी द्वारकेची यात्रा करून कराचीला येणाऱ्या दोन व्यक्ती इंग्रजांनी पकडल्या; एक नाना म्हणून आणि दुसरी नानांचा नोकर म्हणून ! नानाजवळ एक कानफाट्या नोकर आहे, अशी इंग्रज गुप्तचरांची बातमी त्यावेळी होती. तीस अनुसरून एक कानफाट्या नोकर असलेला मालक इंग्रजांनी गिरफ्दार केला. त्यांची हजेरी डेप्युटी कमिशनरसमोर लावण्यात आली. त्यांनी त्या दोघांचे जबाब घेतले. आपण नानासाहेब पेशवे नसल्याचे मालकांनी ठासून बजावले. तेव्हा, मालक नोकरांची अंग झडती झाली. अंग .झडतीत मालक नोकरांच्या खाणाखुणा गुप्तचरांच्या 'रपोटा'शी मिळत्याजुळत्या आढळल्या, तेव्हा डेप्युटी कमिशनरांनी आपला अभिप्राय मुंबई सरकारकडे रवाना केला. मुंबई सरकारला यावर निश्चित निर्णय घेणे कठीण पडले! तेव्हा नाना जेथे वाढले, वावरले त्या कानपूरकडेच कैद्यांना रवाना करून तेथेच परीक्षा व्हावी अशी योजना मुंबईसरकारने आखली. मुंबईहून कलकत्त्यापर्यंत समुद्रमार्गे कैद्यांना पाठविण्यात आले. तेथूनच त्यांना कानपूरला पोचवावयाचे होते. कलकत्ता त्यावेळी भारताची राजधानी! तेव्हा आपणच आपल्या अखत्यारीत सर्व चौकशी करण्याचा निर्णय इंग्रजांच्या सार्वभौम सत्तेने घेतला.

कलकत्त्याच्या पोलिस कमिशनरकडे ती कामगिरी सोपविण्यात

आली. त्यांनी चार साक्षीदारांची तपासणी केली. हे चारही साक्षीदार पूर्वीपासून नानाला ओळखणारे होते. त्यांतील एक हरमोसजी मोदीच होते. याच हरमोसजी मोदींना नानासाहेब पेशव्यांनी आपल्यातर्फे वकिली करून वडिलांच्या सरंजामासह सर्व इतमाम व पेन्शन आपणास मिळावे अशी खटपट करण्यास पाठविले होते. दुसरा साक्षीदार कानपूर सेनेचा बँडमास्तर होता. तिसरा कानपूरचा ईश्वरी प्रसाद हा 'रईस' होता व चौथा होता मेजर सेटन! सर्वांनीच पकडलेली व्यक्ती नानासाहेब नसल्याची खातरजमा केल्यामुळे, बंद्यांना कानपूर येथे पाठविण्याची आवश्यकता सार्वभौम सत्तेला वाटली नाही; म्हणून परत कैद्यांना आल्या मार्गाने मुंबईस पाठविण्यात आले व पुढे सोडून देण्यात आले. नानासाहेब म्हणून पकडलेला द्वारकेचा यात्रेकरू 'हरिजी भाई' हा व्यापारी होता.

⌘⌘

## २. अप्पाराम

इंग्रजांच्या संशयपिशाच्चाने नानासाहेब पेशव्यांचा उभा केलेला दुसरा तोतया म्हणजे अप्पाराम. २२ जून १८६३ रोजी अजमेरच्या डेप्युटी कमिशनराने म्हणजे मेजर डेव्हिड्सन्‌ने, गुप्तहेरांच्या रिपोर्टावरून तीन व्यक्ती पकडल्या. त्यांतील एक नाना मानला गेला व दुसरे दोन त्यांचेच साथीदार. पकडल्याबरोबर या कैद्यांना लष्करच्या नजर कैदेत ठेवण्यात आले. पहारा तर युरोपियन सोजिरांचाच!! डेविड्सन् याने पकडलेल्या व्यक्तीत आणि नानासाहेब पेशव्यांच्या' निशाण्यां' त बरेच साम्यही आढळले. अजमेरच्या सिव्हिल् सर्जनने कैद्यांना तपासले व अभिप्राय केला की कैद्यांच्या अंगांवरील निशाण्या नानांच्या निशाण्याशी मिळत्याजुळत्याच आहेत. कानपूरमध्ये नानाचा परिचित असलेला मेजर वाड्‌किन्सन् याने कैदी हा नानाच असल्याची ग्वाही दिली. पण कैद्याने आपले नाव अप्पाराम दामोदर असल्याचे शपथेवर सांगितले. आपण एलिचपूरकर असल्याचेही त्याने निवेदन केले.

ही सारी हकीकत वायव्यसरहद्द प्रांताच्या सरकारकडे सादर करण्यात आली. त्या सरकारने अप्पारामास कानपूर येथे पाठविण्याचा हुकूम केला. २२ ऑगस्ट १८६३ रोजी अप्पारामाची रवानगी कानपुरास झाली. तेथील नानाचे वैद्यरत्न सिव्हिलसर्जन डॉ.चेके याने कैद्याला तपासून अभिप्राय दिला की कैदी नानापेक्षा पंधरा वर्षांनी वडील आहे!! त्याचा वर्णही नानापेक्षा काळा-काळा आहे. त्याचप्रमाणे नानाच्या अकलेच्या पासंगालाही कैद्याची अक्कल पुरणार नाही. ज्याच्या खानावळीत नाना उतरत-सवरत त्या नूरमहम्मदाने आणि नारायणराव सुभेदारानेही कैदी खासच नाना नाही असे निक्षून सांगितले. त्यामुळेंच शेवटी अप्पारामादिकांची मुक्तता झाली.

⌘ ⌘

## ३. जमनादास

नानासाहेब पेशवेच समजून ग्वाल्हेरमध्ये जमनादास या नावाच्या व्यक्तीला गिरफदार केल्यावर त्याचा गवगवा 'नाना सापडला, नाना सापडला' अशा हिंदुस्थानातच नव्हे तर सर्व जगभर झाला. इंग्रज तर एवढ्या खुशीत होते की 'कानपूरचा खुनी' नाना! इतका वेळ हुडकता हुडकता सापडला एकदाचा चांडाळ !! इंग्रजांशी द्रोह करण्याचे चांगलेच बक्षीस त्यास द्यावयाचे अशी खूणगाठ इंग्रजांनी मनाशी बांधून ठेवली होती. पण जमनादासासंबंधी शोध जसा जसा खोलात जाऊ लागला तसा तसा तो जमनादास नानासाहेब पेशवे नसल्याबद्दलचा संशयाचा काळोखच दाट दाट होऊ लागला!! जमनादासाचा मामला भलताच रोमांचकारी ठरू लागला!!

ग्वाल्हेरच्या जवळील मुरार गावी दरवर्षी दुर्गापूजा म्हणजे नवरात्राचा उत्सव प्रचंड प्रमाणावर होई. १८७४च्या महोत्सव प्रसंगी जमलेल्या अलोट समाजातून नानासाहेब पेशवे म्हणून, एक व्यक्ती बंदीवान करण्यात आली. यावेळी ग्वाल्हेरमध्ये जेम्स रट्लेज नावाचा एकच इंग्रज नानाला पाहिला आणि सवरलेला होता. त्याने नानाच्या

धरपकडीचे वर्णन केले ते असे- ' दुर्गापूजेच्या उत्सवात साधू-फकिरांचे अनेक तांडे मुरार गावी लोटले होते. यात नानादेखील एका तांड्यात साधुवेषाने होता. जयाजीराव शिंद्यांच्या एका शिपायाने त्याला ओळखले व 'नाना!- म्हणून हाकही मारली. फकिराने आपण नानाच असल्याचे कबूल केले आणि ग्वाल्हेरच्या जयाजीराव शिद्यांना पत्र लिहिले की - 'अनेक वर्षे जंगलात भटकत असल्यामुळे मला कष्ट झालेच पण मी आता फार थकून गेलो आहे. आता मी आपल्या आश्रयाला राहू चाहतो. आपली आज्ञा होईल तसे मी करीन.- हे पत्र पावताच जयाजीराव शिंदे घोडेस्वारांची एक पलटण घेऊन मुरार गावी आले आणि त्या जमनादास नामक नानासाहेबाला भेटले. महाराजांनी त्यास विचारले की - 'काय, मी कोण आहे हे तू ओळखतोस?' जमनादासाने उत्तर दिले - 'न ओळखायला काय झाले? आपण तर महाराज जयाजीराव शिंदे!' त्यावर शिंद्यांनी विचारले - तू स्वतः नानासाहेब पेशवाच आहेस, अशी माझी खात्री पटविणारा एखादा प्रसंग मला सांगशील का?'

'न सांगायला काय झाले?' फकीर उत्तरला. 'महाराज आपणास आठवत नाही का? एका समारंभ प्रसंगी आपण मला मी मानाचा मुजरा करताच तलवार दिली नव्हती काय?' या उत्तरानेच जयाजीराव शिंदे एवढे खूष झाले की त्यांनी त्या जमनादास नामक फकिराचे रूपाने वावरणाऱ्या त्यांचे दोन सेवक प्रेमराज आणि अन्य यांना बंदिवान करून रेसिडेंट आसबोर्न याच्या हाती सोपविले. मुरारच्या लष्करी छावणीतील ते नजरकैदी गुण्यागोविंदाने दिवस कंठीत होते.

रेसिडेंटने जमनादास उर्फ नानाचा तलास घेतला. नानाच्या बहिणी (बयाबाई साहेब) चे सासरे बाबासाहेब आपटे, नानाचा पुतण्या अण्णा बाबा भट यांच्या साक्षी झाल्या की कैदी हाच नानासाहेब आहे. रेसिडेंटने आपल्या रिपोर्टात लिहिले की 'सदर व्यक्ती नाना असण्याचा बहुतसा संभव आहे. भारत सरकारने आज्ञा दिली की सदर व्यक्तीची अखेर करण्यासाठी तिला कानपूरला न्यावे, व तेथे सदर व्यक्ती नानाच असल्याची प्रथम खात्री करून घ्यावी व

मग खटला चालवावा. शेवटी जमनादासाला आणि त्याच्या बरोबरीच्यांना कानपुरास नेण्यात आले. तेथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट डेनियलने शोध घेतला. पकडलेल्या व्यक्तीने जबाब दिला की आपले नाव जमनादास उर्फ हणमंता आहे. आपण मराठा क्षत्रिय जातीचे आहोत. आपला जन्म काशीस झाला व इन्दोर महाराजांचे राजगुरूजवळ आपण दहा वर्षे दीक्षा घेतली. तेथपासून लांब लांबच्या यात्रा करीत असून आसामातून बाहेर पडल्यावर ग्वाल्हेर करून इन्दोरास जाऊ इच्छितो. ग्वाल्हेरीस आपण महन्त अयोध्यानाथाच्या धर्मशाळेत राहातही होतो. तेथेच आपणास अटक झाली व इंग्रजी अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले.

डेनियलने अनेक लोकांच्या साक्षी घेतल्या. नारायणराव सुभेदार, नानांची रक्षा अदला, नानांचे वैद्य केशवराव, पेशव्यांचे प्रमुख सेवक सदाशिवराव शास्त्री, जुगलकिशोर जोहरी, हरमोसजी मोदी, यांपैकी एकानेही कैदी खास करून नानाच आहे, अशी खातरजमा केली नाही! कर्नल मावे टॉमसन् यांच्या सांगण्यावरून कैद्याची दाढीमिशी उतरवण्यात आली आणि त्याला महाराष्ट्रीय पद्धतीचा पोषाख चढविण्यात आला. इतके करूनही टॉम्सन्ला निर्णायक मत देता आले नाही, तेव्हा डेनियलच्या मेंदूने घेतले कैदी काही नाना नाही! मग डेनियलने आपला अभिप्राय वायव्यसरहद्द सरकारकडे व त्याच्या द्वारा भारतसरकारकडे सादर केला! भारतसरकार आपल्यापरीने असे भ्याले की नाना हाताशी लागूनही नानाला मोकळा सोडल्याचे पातक आपल्या हातून घडले, असा दोष देतील म्हणून भारतसरकारने स्वतःच फेरचौकशी करण्याचे ठरविले.

कायदा कोळून प्यालेले म्हणून ज्यांची ख्याती त्या फिट्झ रुल्ला यांच्याकडे चौकशी देण्यात आली. ते कानपूर, ग्वाल्हेर येथे समक्ष गेले. झाल्या होत्या त्या साक्षींचा खोल अभ्यास केला. काही नव्या लोकांच्याही जबान्या त्यांनी घेतल्या. सत्तावीस साक्षी झाल्या, त्यात जमनादास हा नाना असल्याचे निश्चितपणे हमी कोणी घेईना. डॉ.ट्रेसिडर, मुसम्मात अदला, सद्दाक पैलवान, पंडे गंगापुत्र अशा

तोलामोलाचे साक्षीदार होते. डॉ. ट्रेसिडरनी तर नानावर एकदा शस्त्रक्रिया केलेली होती, पण जमनादासच्या शरीरावर त्या शस्त्रक्रियेचा मागमूसही त्याला आढळला नाही!! यावेळी नानांचे आयुष्य पन्नास वर्षांच्या पुढे असावयाचे ते कैद्याचे फक्त पस्तिशीत घुटमळत असण्याचा डॉक्टरांचा अभिप्राय पडला. नाना आपल्या कानात सोन्याची भिकबाळी घालीत असे. पण जमनादासाचे कान टोचलेले नव्हते. पकडला जाण्यापूर्वी जमनादासने जयाजीराव शिंद्यांना जे पत्र लिहिले होते ते नारायणराव सुभेदाराने पाहताच हस्ताक्षर नानाचे नसल्याचेच निश्चितपणे सांगितले.

भारतसरकारच्या देण्याघेण्याच्या व्यवहारखात्यात नानांची सही होती, तिच्याशीही त्या पत्रांतील हस्ताक्षर जुळते नव्हते.

या आधारावर फिट्झरल्डने निकाल दिला की गिरफदार केलेली व्यक्ती नाना नाहीच नाही! भारत सरकारने हा निर्णय स्वीकारला आणि हुकूम केला की बंदीवानाला जयाजीराव शिंद्यांच्या स्वाधीन करावे!

सुप्रसिद्ध इतिहासकार कर्नल मालिसन याने लिहिलेल्या देशी संस्थाने या ग्रंथाच्या पहिल्या भागाचे भाषांतर मराठीत १८९१ साली कृष्णाजी बल्लाळ गोडबोले यांनी प्रसिद्ध केले. त्यांच्या प्रस्तावात म्हटले आहे की - 'नानाच्या नावाने अनेक लोक पकडले गेले आणि त्यांच्यापैकी कित्येक तोफेच्या तोंडीही दिले गेले! फाशीतर अनेकानेक झाले! इतके करूनही इंग्रज सरकारला कायमचा भ्रम झाला होता की नाना अजिबात पकडलाच गेला नाही!! जयाजीराव शिंदे यांनी नानांच्या नावे एक व्यक्ती पकडली, तिला इंग्रजांच्या स्वाधीन केले; तिची चौकशीही झाली. महाराष्ट्रापर्यंत त्या व्यक्तीचे फोटोही प्रसिद्ध झाले. कोल्हापूरच्या पोलिटीकल एजंटाचे द्वारा तो फोटो नानाचे मेव्हणे (सांगलीच्या गुंजूमामा करमरकरांचे चिरंजीव पांडुरंग करमरकर यांनाही दाखविण्यात आला, पण शेवटी शिंद्यांनीच त्या कैद्याला (जमनादासला) नाना समजून फाशी चढविला.'

जमनादासासारखी माणसे मुकाट फाशी का गेली, का तोफेच्या

तोंडी चढली, का अनेकानेक हाल काढीत बसली? त्यांनी विचार केला की इंग्रजांच्या भ्रमाप्रमाणे (२३ ऑक्टोबर १८५९ ला नाना नेपाळमध्ये न मरता) खरोखर जिवंत असला, तर हिंदुस्थानचे स्वातंत्र्ययुद्ध फिरून सुरू करावयास त्यास वाव अगर संधी मिळावी. या दृढ समजुतीमुळेच सातारचा अनंत (भट) बाळकृष्ण बापट ह्या कृष्णेश्वराच्या पुजाऱ्याचे हाती उत्तरेचा खलिता मिळून 'शिंद्याने दगा दिला, युद्धाचा रंग संपला!' असा मजकूर त्या रंगो बापूजी गुप्त्याच्या साथीने वाचताच, तो काशीस जाऊन व संन्यास घेऊन १८६१ पासून १८७१ पर्यंत नानासाहेब पेशव्यांचा शोध घेत होता. दहा वर्षांच्या खटाटोपाला यश न आल्याने, संन्यासी अनंतभट बापट परत साताऱ्यास आला आणि माहुलीस आपला देह अनंतात विसर्जित करून बसला. त्याचे नंतरही हणमंता उर्फ जमनादासचे प्रकरण झाले आणि शिंद्यांनी नानासाहेबाला जसा दगा दिला तसाच तो आपणासही देईल हा इंग्रजांचा संशय दुणावला, त्यामुळेच इंग्रजांच्या शत्रूचे आपण शत्रू आहोत, हे इंग्रजांना पटविण्यासाठीच हणमंताला म्हणजेच जमनादासला शिंद्यांनी फाशी दिला! या असल्या दिमाखदारीने इंग्रजही फसला नाही व भारतीय जनताही फसली नाही.

( फर्वेस मिचेल प्रभृतीचे ग्रंथ पहा.)

⌘ ⌘

# बंडवाले नानासाहेब

## पु. पां. गोखले

बंडवाले नानासाहेब म्हणजेच दुसरे नानासाहेब पेशवे.

१८५७ साली सुरु झालेल्या स्वातंत्र्य समराचे नेते. त्यांनी इंग्रजांविरुध्द उठाव केला व त्यांना सळो की पळो करुन सोडले. मोडेन पण वाकणार नाही असा त्यांचा मराठी बाणा होता. स्वाभिमान आणि पराक्रमाच्या जोरावर ते इंग्रजांशी अखेर पर्यंत लढले.

धन्य ते नानासाहेब, ज्यांनी आपल्या स्वतःच्या उदाहरणाने जनमानसात त्यागाची आणि स्वातंत्र्य लढ्याची ज्योत पेटवली.